म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0000547
REFBK-0000547

३१८५ ४०२

# अभिनवकाव्यमाला

## भाग पहिला

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

अलंकारप्रकाश, पद्यमंजरी, काव्यसौंदर्य, गद्यरत्नसमुच्चय, पद्यरत्नसमुच्चय, महाराष्ट्रभामिनीविलास, महाराष्ट्रसौंदर्यलहरी, मेघदूत काव्याचें समवृत्त मराठी भाषांतर, इत्यादि पुस्तकांचे कर्ते

यांनीं तयार केला

तो

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापिला.

( सर्व हक्क शारदाप्रसादनमंडलाकडे आहेत. )

REFBK-0000547

REFBK-0000547

किंमत आठ आणे.

प्रकाशकः—लक्ष्मण गणेशशास्त्री लेले, ४८९, सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रकः—नटेश अप्पाजी द्रविड, आर्यभूषण प्रेस, पुणें.

# प्रस्तावना.

गेल्या वसंतामध्यें पुणें येथें कांहीं मराठी कवि जमले होते. त्यांनीं 'शारदाप्रसादनमंडल' या नांवाची एक संस्था स्थापन केली. लहान लहान पुस्तकांच्या रूपानें आधुनिक मराठी पद्यात्मक वाङ्मय प्रसिद्ध करावें असा या मंडलाचा हेतु आहे. हें पुस्तक त्या हेतूचें पहिलें दृश्य फल आहे.

उद्दिष्ट पुस्तकमालेला मंडलानें 'अभिनवकाव्यमाला' असें नांव दिलें आहे. या मालेचा हा पहिला भाग आहे. मंडलाच्या वतीनें आह्मी हा भाग सर्व महाराष्ट्रवाचकांस प्रेमपूर्वक अर्पण करितों. अभिनवकाव्यमालेचा हा खंड सरस आहे कीं नीरस आहे, गंधवान् आहे किंवा गंधहीन आहे, सुदर्शन आहे अथवा दुर्दर्शन आहे याविषयीं आह्मीं लिहिणें प्रशस्त नव्हे. तें काम अर्थात् काव्यरसज्ञांचें आहे.

सुसंस्कृत मनुष्याच्या मनोवृत्ति उत्तेजित करून त्या उद्दाम करून सोडणारी जी वाणी तिला काव्य अशी संज्ञा आहे. असें काव्य प्रसवणारी जी दिव्य शक्ति तिला प्रतिभा ह्मणतात. अशा प्रतिभेनें संपन्न जो पुरुष त्याला कवि ही पदवी आहे. परमेश्वराचा कृपाकटाक्ष ज्यावर पडतो तो प्राणी मूळचा कितीही हीन असला तरी तत्काल महाभाग्यशाली बनतो. तद्वत् कवीची प्रतिभा ज्या वस्तूवर पडते, ती वस्तु कितीही क्षुद्र असली तरी दिव्य दिसूं लागते ! असा त्या प्रतिभेचा विलक्षण प्रभाव आहे. वर सांगितलें हें खऱ्या काव्याचें लक्षण आहे आणि तें अनेक प्रसिद्ध व रसिक पंडितांना मान्य आहे. जगद्वन्द्य महाकवींच्या लोकोत्तर कृतींत अशा काव्याचे नमुने दृष्टीस पडतात. असे कवि व अशीं काव्यें फार विरळ असतात.

तथापि 'कवि' आणि 'काव्य' यांच्या लक्षणांची व्याप्ति आपण पुष्कळवेळां अधिक मानितों. ह्मणजे पूर्वोक्त काव्याच्या कसोटीला सर्वथा उतरणारी कविता नसली तरी देखील आपण तिला 'काव्य' समजतों व तिच्या प्रणेत्याला 'कवि' ह्मणतों. याचें कारण असें आहे कीं, त्याच्या कवितेंत कांहीं तरी चमत्कारावह सौन्दर्यसामग्री सिद्ध असते व तिच्या योगानें आपलें मन प्रसन्न होतें.

तेव्हां कोणतेंही काव्य घ्या; चमत्कृति त्याचें बीज आहे. जेथें कांहीं चमत्कार नाहीं, सौंदर्य नाहीं किंवा रंजनाचें साहित्य नाहीं तेथें मात्र काव्यशब्दाची व्याप्ति नाहीं.

काव्याचा प्रधान हेतु रंजन आहे. तदनुषङ्गानें कवि बोध करितो व सृष्टींतील अनेक रहस्यें व तत्त्वें प्रकाशित करितो. यावरून काव्य ही वस्तु उच्च प्रतीची करमणूक असून मानवजातीची उपकर्त्री आहे हें उघड आहे. अशा प्रकारच्या वस्तूचें योग्य प्रकारें संरक्षण करणें हें समाजाचें एक पवित्र कर्तव्य आहे.

ऐतिहासिक दृष्टीनेंही काव्यसंग्रहाचें काम महत्त्वाचें आहे. कवींच्या कृतींत पुष्कळ वेळां देशकालपरिस्थितीचें प्रतिबिंब पडलेलें असतें. पेशवाई-च्या अखेरपर्यंत झालेल्या मराठी कवींना आपण जुने मराठी कवि सम-जतों. त्यांपैकीं मुक्तेश्वर, रामदास, तुकाराम, निरंजनमाधव इत्यादिकांच्या काव्यांत मधून मधून त्या त्या कालच्या धार्मिक, नैतिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीच्या भावना उमटल्या आहेत. इतिहासकाराला त्यां-पासून बरीच मदत होण्यासारखी आहे. जुन्या मराठी कवींच्या कृतींचे आजपर्यंत अनेक संग्रह झाले आणि अद्यापिही कांहीं चालू आहेत ही गोष्ट वरील दृष्टीनें फार प्रशंसनीय आहे.

इंग्रजी राज्याबरोबर नवीन मराठी कवितेचा उदय झाला. राजक्रांती-बरोबर भाषा, विचार, व्यवहार इत्यादिकांचीही क्रान्ति होत असते. तशा प्रकारचें स्थित्यन्तर आपण सध्यां अनुभवीत आहों. या संक्रमण-स्थितीचें प्रतिबिंब अर्वाचीन मराठी काव्यांत विविध रूपांनीं पडलेलें आहे. ' काव्यरत्नावली, ' मासिकमनोरंजन, ' ' विविधज्ञानविस्तार, ' इत्यादि मा-सिक पुस्तकांचे अंक चाळून पाहिले असतां या विधानाची यथार्थता प्रत्ययाला आल्यावांचून रहात नाहीं. पुढील इतिहासकाराला या वाङ्मयाची चांगली मदत होण्यासारखी आहे. याकरितां त्याची परंपरा कायम ठेवून तें चिरस्थायि करणें अवश्यक आहे. असलें वाङ्मय ग्रंथरूपानें प्रकाशित करून त्याचा प्रसार करणें हाच तें चिरस्थायि करण्याचा राजमार्ग आहे.

याप्रमाणें उच्चप्रतीचें करमणुकीचें साधन व ऐतिहासिक उपयुक्त वाङ्मय अशा दोन दृष्टींनीं काव्याचें महत्त्व आहे; आणि ह्मणूनच त्याचा

संग्रह अत्यंत अवश्यक आहे. ' विविधज्ञानविस्तार, ' ' काव्यरत्नावली, ' ' मासिकमनोरंजन ' इत्यादि मासिक पुस्तकांतून व कित्येक वृत्तपत्रांतूनही आधुनिक मराठी काव्यें प्रसिद्ध होत आहेत. ही गोष्ट फार उपयुक्त व इष्ट आहे आणि ह्मणूनच मोठ्या संतोषाची आहे. तथापि मासिक पुस्तकें आणि वृत्तपत्रें यांच्यापेक्षां स्वतंत्र ग्रंथाला चिरस्थायित्व कांहीं अंशीं अधिक असतें. अशा दृष्टीनें ' काव्यमाधुर्य, ' ' अर्वाचीन कविता, ' ' कुसुमगुच्छ, ' ' काव्यदोहन, ' अशांसारखे प्रयत्न जितके होतील तितके थोडेच आहेत. शारदाप्रसादनमंडळानें याच दिशेनें प्रस्तुत अल्प प्रयत्न आरंभिला आहे.

कोणत्याही समाजांत जुन्याविषयीं फार आदर असतो, व नव्याविषयीं प्रायः औदासीन्य किंबहुना उपहासबुद्धि दिसते. ही प्रवृत्ति आजकालची नाहीं; फार पुरातन आहे. हिच्या मुळाशीं अज्ञान, दुराग्रह किंवा मत्सर असतो. या विकारांचें पटल दूर करण्याचें सामर्थ्य कालामध्यें आहे. अशा दृष्टीनें पाहिलें असतां आधुनिक मराठी कवितेची खरी योग्यता कालान्तरानेंच निर्णीत होणार यांत संशय नाहीं.

आतां प्रस्तुत पुस्तकाच्या स्वरूपासंबंधानें दोन शब्द लिहितों. यांत एकंदर अठरा कवींचीं लहान मोठीं ११५ काव्यें आलीं आहेत. कवींमध्यें दोन स्त्रिया, एक लहान विद्यार्थी व इतर प्रौढ गृहस्थ आहेत. कवींपैकीं चिपळूणकर, केशवसुत व घाटे हे गत असून बाकीचे सर्व विद्यमान आहेत. कवि कालक्रमानें घेतले आहेत. एका कवीचे उतारे संपले ह्मणजे दुसरा, त्याचे झाले ह्मणजे तिसरा अशी व्यवस्था केली आहे. प्रत्येक कवीच्या नांवाखालीं त्याचा जन्मसन व तो गत असल्यास मृत्युसनही देऊन त्याच्या खालीं त्यानें केलेल्या काव्यांची यादी दिली आहे. उताऱ्यांतील आशय, अवश्यक वाटला तेथें, उताऱ्याच्या आरंभीं दिला आहे. टीपा कवींच्या आहेत. पुस्तकांतील काव्यें बहुतेक वृत्तात्मक असून कांहीं पदरूप आहेत. संस्कृत वृत्तें बहुश्रुत वाचकांच्या बहुतेक परिचयाचीं असल्यामुळें त्यांचीं नांवें दिलीं नाहींत. एकादें दुसरें अपरिचित वृत्त आलें तेवढें मात्र दिलें आहे. संस्कृत वृत्तात्मक पद्यावर फक्त ' श्लोक, ' किंवा ' गीति ' असल्यास ' गीति ' असें लिहिलें आहे. प्राकृत वृत्तांचीं दिंडी, साकी अशीं नांवें दिलीं आहेत. पदांवर बहुतेक ठिकाणीं प्रसिद्ध चाली दिल्या आहेत. उतारे घेतांना विषय, विचार, भाषा

व वृत्त यांच्या वैचित्र्याकडे लक्ष पोंचविलें आहे. शिवाय ग्रंथाचें बाह्यांग चांगलें करण्याविषयीं यत्न केला आहे. तथापि यांत न्यूनाधिक राहिलें नाहीं असें ह्मणवत नाहीं. त्याबद्दल सहृदय वाचक क्षमा करितील अशी आशा आहे.

अभिनवकाव्यमालेच्या दुसऱ्या भागाचें संपादकत्व शारदाप्रसादनमंडलानें सुप्रसिद्ध महाराष्ट्रकवि रा० नारायण वामन टिळक यांजकडे सोंपविलें आहे. आधुनिक कविमंडळ त्यांच्या विनंतीस मान देऊन त्यांस योग्य ती मदत करील असा भरंवसा आहे.

सदाशिव पेठ, पुणें.<br>डिसेंबर, इ. स. १९०९.

**लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.**

---

# सूचना.

१. 'सुताविरह' या नांवाच्या काव्याला या पुस्तकाच्या ६३ व्या पानावर आरंभ झाला आहे. या काव्याला विषयीभूत झालेली कन्या श्रीमंत पंतसचिव यांचे प्रस्तुतचे कारभारी रा० ब० श्रीधर आबाजी सातभाई यांची नात असून रा० रा० विष्णु बाळकृष्ण चंद्रचूड, एम्. ए., यांची गतपत्नी होय. हिचें माहेरचें नांव 'कमला' व सासरचें 'सौ० रमाबाई' असें होतें. वरील काव्य छापून तयार झाल्यावर ही माहिती मिळाली. ती जिज्ञासु वाचकांकरितां येथें दिली आहे.

२. ८६ व्या पानावर कृष्णाजी केशव दामले यांचा जन्मसन १८६५ असा दिला आहे तो १८६६ असा समजावा.

३. याशिवाय दुसरे कांहीं मुद्रणदोष राहिले आहेत त्यांबद्दल सहृदय वाचक क्षमा करितील अशी आशा आहे.

**संपादक.**

# अनुक्रमणिका.

## कवि आणि उतारे.


पृष्ठांक.

१. कृष्णशास्त्री चिपळूणकर.
- (१) अलकावर्णन ... १
- (२) यक्षमंदिर ... ३
- (३) यक्षस्त्रीवर्णन ... ४
- (४) यक्षसंदेश ... ५
- (५) विरहिविलाप ... ७

२. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर.
- (१) भक्ताचा टाहो ... १०
- (२) करुणापंचक ... १०
- (३) गृहिणीविरह ... ११
- (४) पत्नीव्रताचे अश्रु ... १३
- (५) धैर्य व तलवार यांची गाळण १४

३. विष्णु मोरेश्वर महाजनि.
- (१) तरुण जनांच्या इच्छा १५
- (२) सुशील भार्या ... १६
- (३) वसंतसमय ... १६

४. गणेश जनार्दन आगाशे.
- (१) अलीकडील हरिदास १८
- (२) मकरसंक्रांत ... १८
- (३) मुलीचें लग्न ... १९
- (४) उपवर कन्या ... २०
- (५) कवि आणि काव्य ... २१
- (६) न्या. महादेव गोविंद रानडे २२
- (७) रूढिमहिमा ... २४

५. कोऽपि.
- (१) नामावलि ... ... २७
- (२) ईशप्रार्थना ... ३०

६. गोविंद वासुदेव कानिटकर.
- (१) चंद्रकलेचा ग्रास ... ३२
- (२) राईतील पक्षी ... ३३
- (३) नारळीच्या झाडांतील चांदणी ... ... ३३
- (४) खिडकींतील कुसरी अथवा रानजाई ... ... ३४

पृष्ठांक.

- (५) प्रेम ... ... ३५
- (६) अरुणोदय ... ३५
- (७) कै. डॉ. आनंदीबाई जोशी ३५
- (८) संशय तूं मनिं न धरीं. ३६
- (९) वासंतिक बालचंद्र ... ३६
- (१०) कन्येचें स्मरण ... ३७
- (११) कन्याविरहस्मरण ... ३८
- (१२) बालकाचें पहिलें विरहदुःख ... ... ३९
- (१३) प्रातःकाळ ... ४०
- (१४) महालाचें वर्णन ... ४१
- (१५) कृष्णाकुमारीचा जन्म, बाल्य आणि तारुण्य. ४२
- (१६) कृष्णाकुमारीचा अंत ! ४३

७. विद्याधर वामन भिडे.
- (१) विंध्यवेदना ... ४६
- (२) विरक्तवाणी ... ५०

८. महादेव हरि मोडक.
- (१) बैरागी ... ... ५७
- (२) सुताविरह ... ... ६३

९. नारायण वामन टिळक.
- (१) नाममहिमा ... ... ७२
- (२) कवि ... ... ७३
- (३) सारीं फुलेंच फुलें ... ७४
- (४) स्वदेशप्रेम ... ... ७५
- (५) तो आह्मांला भ्याला!... ७५
- (६) नर्तन ... ... ७६
- (७) कुणास्तव कुणी तरी ... ७७
- (८) एक अमेरिकन मुलगी... ७८
- (९) विरह ... ... ७९
- (१०) वृक्षान्योक्ति ... ७९
- (११) कोण सांगेल नांव ? ... ८०
- (१२) महारथी ... ... ८०
- (१३) एक सुंदर कवी ... ८१
- (१४) पर्वतारोहण ... ... ८२

पृष्ठांक.

(१५) माझे दशावतार ... ८४
(१६) सत्संग ... ... ८५
(१७) सर्व शास्त्रांना मान्य अशा गोष्टी ... ... ८५

१०. कृष्णाजी केशव दामले.

(१) सतारीचे बोल ... ८६
(२) कल्पकता ... ... ८७
(३) भाव, मूर्ति आणि कवीचा आत्मा ... ८८
(४) रांगोळी घालतांना पाहून ८९
(५) फुलपांखरूं ... ९०
(६) थकलेल्या भटकणाराचें गाणें ... ... ९१
(७) कविता आणि प्रीति ... ९२
(८) भृंग ... ... ९३
(९) दिवस आणि रात्र ... ९४
(१०) मनोहारिणी ... ९४
(११) चिरावियुक्ताचा उद्गार ९६

११. सौ० लक्ष्मीबाई टिळक.

(१) करंज्यांमध्यें मोदक कशाला ? ... ९७
(२) जळगांवच्या कविसंमेलनास निरोप ... ९८

१२. काशिनाथ हरि मोडक.

(१) स्मृतिचित्र ... ९९
(२) कृष्णाकोयनांचा संगम. १००
(३) फुलांचा शेला ... १०१
(४) दीपविसर्जन ... १०२
(५) मूर्तिकार ... ... १०३
(६) कुबडीतीर्थ ... १०४
(७) काल, कीर्ति आणि विस्मृति ... ... १०५
(८) अळवावरचें पाणी ... १०५
(९) रामविलाप ... १०६
(१०) पंचवटीवास ... १०७
(११) जीवितसाफल्य ... १०८
(१२) प्रियेचे अश्रु ... ११०

१३. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

(१) छत्रीचे उपकार ... १११

पृष्ठांक.

(२) मृत आपत्याचें शेवटचें चुंबन ... ... ११२
(३) अनुपम सुख ... ११३
(४) सुखकर जागृति ... ११४

१४. नरसिंह चिंतामण केळकर.

(१) मराठा वीरस्त्रीचें गाणें १२२
(२) गंगास्तोत्र ... ... १२३
(३) माझा आवडता फकीर १२४
(४) वनदेवीचें मंदिर ... १२५
(५) गंगातटाकावरील उषःकाल ... ... १२६
(६) सरस्वतीचा वाल्मीकिकवीस आशीर्वाद ... १२७
(७) काजव्यास निमंत्रण १२८
(८) वेषभूषा ... ... १२९
(९) प्रेमाचे प्रश्न ... १३०
(१०) कांटेरी गुलाब ... १३०
(११) अपूर्व देणगी ... १३१
(१२) महानुभावप्रशस्ति ... १३१
(१३) रंगदेवतास्तवन ... १३२
(१४) दुर्योधनाचे शेवटचे उद्गार १३३
(१५) देशमातेला शेवटची विज्ञप्ति ... ... १३५

१५. बाळकृष्ण अनंत भिडे.

(१) वीराचें स्वप्न ... १३६
(२) चैत्रीचा बळी ... १३८
(३) करुणालहरी ... १४०
(४) आमची मांजरी ... १४२
(५) ईशस्तवन ... ... १४४

१६. दत्तात्रय कोंडो घांटे.

(१) बघसी अंत किती राजसे ! १४५
(२) मुग्ध कलिका ... १४६

१७. श्रीमती हिराबाई पेडणेकर.

(१) कवि आणि गुलाबकळी १४८
(२) प्रेमाला उद्देशून ... १४९
(३) उद्यान ... ... १४९
(४) रुष्ट प्रियकरास ... १५०

१८. बालकवि लक्ष्मीनंदन.

(१) गोंडेदार चाबूक ... १५०

# अभिनवकाव्यमाला.

## भाग पहिला.

### कृष्णशास्त्री चिपळूणकर.

जन्म—इ. स. १८२४; मृत्यु—इ. स. १८७८.

या विख्यात रसिक पंडिताचा पद्यरत्नावली या नांवाचा एक अतिसुंदर लहानसा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे. यांत मेघदूताचें साकीबद्ध भाषांतर, अन्योक्तिकलाप, विद्याप्रशंसा, प्रश्नोत्तरावली आणि विलाप अशीं पांच निरनिराळीं प्रकरणें आहेत. यांतील विद्याप्रशंसा आणि प्रश्नोत्तरावली हीं काव्यें बहुतेक स्वतंत्र आहेत आणि बाकीचीं संस्कृतांतून मराठींत उतरलीं आहेत. हा ग्रंथ अत्यंत सरस व रमणीय असून अलीकडील महाराष्ट्रकाव्यांचें मोठें भूषण आहे. पुढील पहिले चार उतारे शास्त्रीबोवांच्या प्रसिद्ध मेघदूतभाषांतरांतून घेतले आहेत. मेघदूताचें संविधानक बहुश्रुत मराठी वाचकांच्या परिचयाचें आहे.

### १. अलकावर्णन.

**साक्या.**

विलासिनीच्या[1] हस्तीं तेथें[2] कमलें, कुंदकळ्याही
शिरीं शोभती, मुखीं पांडुता येई लोध्ररजांहीं; १
कर्णीं विलसे शिरीष सुंदर, केशीं कुरबक साजे,
नीपपुष्पही दिसतें भांगीं सुचवी घनागमा[3] जें. २

---

१ या षष्ठीचा संबंध शिर, मुख, कर्ण, केश व भांग या सर्वांकडे लावावयाचा. सहाही ऋतु त्या नगरींत एका वेळीं वास करितात हें दाखविण्याकरितां येथें प्रत्येक ऋतूंत होणाऱ्या एकेक पुष्पाचें वर्णन केलें आहे. कमलें शरदृतु सुचवितात. कुंदपुष्पें शिशिर दाखवितात. लोध्रफुलें हेमंतांत येतात. कुरबक ( कोरांटी ) वसंतांत व शिरीष ( जवस ) ग्रीष्मांत फुलतात. नीप ( कळंब ) पावसाळ्यांत फुलतो हें तर खालीं कवीनेंच वर्णिलें आहे. २ अलकावनींत. ३ मेघांचें येणें, पावसाळा.

जेथें नित्य फुलूनि तरू त्यांवरी गुंगती भृंगें,
नित्य डोलती विकसुनि नलिनी कलहंसांच्या संगें; ३
नित्य नाचती मोर उभारुनि सुंदर थोर पिसारे,
प्रकाशुनीयां नित्य चंद्रही उजळी प्रदेश सारे. ४
अन्य हेतुंनीं न अश्रु जेथें, तें केवळ आनंदें,
दुजा न जेथें, कामज्वरची निवार्य जो स्वच्छंदें; ५
प्रेमकलहचीं, दुजें न भांडण जेथें विदित जनांला,
तारुण्याविण अन्य वय नसे ठावें कधिंहि तयांला. ६
मधुर मृदंगादिक वाद्यांचे ध्वनी ज्यांत उठताती,
तळीं जयांच्या बिंबुनि तारा फुलांपरी दिसताती, ७
अशा मंदिरीं रत्ननिर्मितीं यक्ष बसुनि आनंदें,
सवें प्राशिती विलासिनींच्या मधुर मधु स्वच्छंदें. ८
गंगातीरीं कल्पतरुतळीं सुटतां मंजुळ वारें,
क्रीडति धन्या किन्नरकन्या जेथें बहु प्रकारें. ९
कोणी कोणी कनकवाळुकेमाजीं लपविति रत्नें,
शोधुनि काढावया लागती कोणी तीं अतियत्नें. १०
क्रीडारंगीं दंग सुंदरी होतां कांतासंगें,
दृढालिंगनादिकें करूनी उबलीं अपुलीं अंगें. ११
शीतळ व्हाया गळां घालिती चंद्रकांतमणिहार,
पडुनि चांदणें वरी जयांतें सुटती पाझर गार ! १२
अखंड लक्ष्मी नित्य करितसे वास जया नगरींत,
किन्नर सुस्वर गाती जेथें धनदस्तुतिपर गीत; १३
जेथिल उद्यानीं कामीजन तरुण अप्सरांसंगें,
परोपरीचे विलास करिती होउनि दंग अनंगें; १४
ठायीं ठायीं फुलें सुटोनी वेण्यांतुनि पडलेलीं,
कोठें कोठें सुवर्णकमलें कर्णींचीं गळलेलीं; १५
तशीं विखरलेलीं मोतींही तुटुनि गळ्यांतिल हार,
दाविति जेथें रात्रीं झाला तरुणींचा संचार ! १६
कुबेरमित्रत्वास्तव जेथें करितो शंकर वास,
भयें तयाच्या चाप धराया नसे धैर्य मदनास; १७
तथापि करिती विलासिनींचे कटाक्ष काम तयाचें,
अचुक टाकिती हृदय वेधुनी जे कीं कामिजनांचें.
वस्त्रें उत्तम, सुगंध सुमनें, मदिरा मधुरहि फार,

परोपरीचीं रत्नकंकणें, तसेंचि मौक्तिकहार. १९
लाल कराया पाय रंगही, उटी तशी अंगास,
सर्वहि देई कल्पवृक्षची एक जिथें वनितांस !

---

## २. यक्षमंदिर.

### साक्या.

त्या नगरींत धनेशगृहाच्या उत्तरेस दिसतें जें
दुरूनि सुंदर मंदिर मोठें, तेंच जाण घर माझें; १
नानारत्नीं खचित जयाचें द्वार उंच बहु साजे,
अपूर्व शोभा पाहुनि ज्याची इंद्रचापही लाजे. २
असे जवळ त्यां[1] एक नवीनचि कल्पवृक्ष सुकुमार,
थोर फुलांचे गुच्छ येउनी जो लवलासे फार; ३
प्रिया करांनीं नित्य घालुनी पाणी सायंकाळीं
अतिकनवाळूपणें जयाला मुलासारिखा पाळी. ४
आहे सुंदर तळेंहि तेथें लहानसें, ज्यामाजीं
नित्य शोभती बहुत फुलोनी सुवर्णकमळें ताजीं. ५
पाचेच्या पायऱ्या सभोंतीं असाति त्यांत उतराया,
जयांत नेमस्तचि जळ असतें क्रीडा स्त्रीस कराया. ६
वर्षाकालहि येतां तेथें[2] हंस सुखें वसताती,
जवळहि असतां मानस[3] तिकडे कधींहि ते नच जाती ! ७
त्याच तळ्याच्या कांठीं आहे क्रीडापर्वत, ज्याचें
नीळमण्यांचें चमके सुंदर उंच शिखर तें साचें; ८
ज्याच्या भोंतीं सुवर्णकदली झळकति चित्रविचित्रा,
विजे[4]सहित तुज देखुनि मजला आठवतो तो, मित्रा ! ९
मध्यें मंडप मधुमालतिचा, गुलाब शोभति भोंतीं,
काय वर्णुं तीं सुखें, त्या स्थलीं जीं अनुभविलीं होतीं ! १०
त्या कुंजाच्या जवळ बकुळिचा एक सुबक तरु आहे,
तसा तांबडा अशोक तेथें चंचलपल्लव पाहे. ११
पहिला[5] मजपरि तुझ्या सखीच्या वदनांतिल मदिरेतें

---

१ त्या घराच्या. २ त्या तळ्यांत. ३ या नांवाचें सरोवर. ४ विजेचें व सुवर्णकदलीचें साम्य, तसेंच मेघाचें व नीलमणिघटित क्रीडापर्वताचें साम्य विवक्षित आहे. ५ बकुलवृक्ष. तरुण स्त्रियांनीं या झाडावर मद्याच्या गुळण्या टाकल्या म्हणजे त्याला फुलें येतात असें कवि मानितात.

वांछी, दुसरा[1] तिच्या इच्छितो वामचरणघातातें. १२
असें मांडला पाचमण्यांचा पिंजरा तेथें थोर,
बसे त्यामध्यें कनकयष्टिवर रात्रीं असुचा मोर; १३
प्राणांची मम धनीन शिकवी नाचायास जयातें
रक्तकंकणीं युक्त करांनीं धरूनियां तालातें. १४
जेथें ऐशीं सकल लक्षणें, मित्रा ! तुज दिसतील,
ज्याच्या द्वारीं शंखपद्महीं, लिहिलेले असतील, १५
तेंच आमुचें गृह, नसल्यानें मी जें उदास भासे;
सहस्ररश्मी[2] गगनीं नसतां कैसें कमल विकासे ? १६

---

## ३. यक्षस्त्रीवर्णन.

### साक्या.

अंग जयेचें पातळ, रंगहि चंपककुलासमान,
दंतपंक्ति कीं कुंदकळ्यापरि दिसते विराजमान; १
जेविं तोंडलें पिकलें तेवीं ओंठ खालचा लाल,
विरहें असती शुभ्र जाहले जीचे नाजुक गाल; २
विशाळ चंचळ काळे डोळे जे कां विलासखाणी,
मनांत झुरती हरिणबालकें बघुनि जयांचें पाणी ३
मत्तगजापरि मंद चालणें, उणें न कोठें कांहीं,
विधिच्या हातुनि दुसरें ऐसें रूप उतरलें नाहीं ! ४
घना ! या खुणांवरुनि ओळखी अपुल्या, बा ! वहिनीला,
मुख्य सहावा प्राणचि आहे जी या मम शरिराला ! ५
भाषण जीचें परिमित, मंजुल, सरस आणि हितकारी,
मी नसल्यानें जवळ एकटी पडुनि झुरे जी भारी. ६
वर्षाकाळीं मज आठवुनी क्षणोक्षणीं दुःखानें
वाळुनि गेली असेल जी बहु, नलिनी जेंविं हिमानें ! ७
रडुनि रडुनियां सुजले डोळे असतिल खचित तियेचे,
उष्णश्वासें कोमल ओंठहि सुकले असातिल साचे. ८
गाल टेंकुनी हस्ततलावरि जी चिंतातुर बैसे,
अलक लोंबती मुखावरी तें, कमलीं मधुकर जैसे. ९

---

१ तांबडा अशोक. तरुणींनीं चरणताडन केलें ह्मणजे याला फलें येतात अशी कवींची समजूत आहे. २ सूर्य.

किंवा तूंची घना, झांकिशी जेवीं शशिबिंबाला,
तीच साजते बरवी उपमा म्लान तिच्या वदनाला! १०
पहाशील तूं तिला कदाचित् देवातें पुजितांना,
किंवा ध्याउनि माझी मूर्ती चित्रपटीं लिहितांना; ११
असेल अथवा पिंजऱ्यापाशीं उभी पुसत मैनेला,
'कां गे ! आठवतो तुजला तो प्राणसखा रंगेला ?' १२
घेउनि हातीं सारंगी वा काळक्रमण कराया,
स्वयें रचियलीं मजविषयींचीं लागे गीतें गाया ! १३
तैं डोळ्यांतुनि गळुनि अश्रुजळ जाई भिजोनि तार,
स्वयें घेतला मधेंच विसरे अलाफ वारंवार ! १४
किती लोटले विरहदिवस हें कळावयाकरितां जीं
ठेवियलेलीं फुलें प्रतिदिनीं पुनः पुन्हां तीं मोजी. १५
किंवा ध्यानीं मजला आणुनि माझा मानससंग
अनुभवुनी त्या परमानंदीं झाली असेल दंग! १६
बहुतकरूनी, घना, सुंदरी काळ कंठितां यावा,
ह्मणुनि यापरी करिती, जवळी नसतां प्राणविसावा! १७

---

## ४. यक्षसंदेश.
### साक्या.

खिडकित पाहुनि तुला, चकित ती होतां विस्मयभावें,
यापरि मधुरस्वरें तिला तूं आश्वासुनि बोलावें:— १
" पतिव्रते, मी तुझ्या पतीचा जिवलग मित्र असोनी,
आलों आहें येथें त्याचा निरोप तुज घेवोनी २
प्रवासिकांतें स्वगृहीं जाया त्वरा करुनियां नित्य,
तज्जायांतें सुखित करावें आहे हें मम कृत्य." ३
यापरि भाषण तुझें परिसुनी आनंदुनि ती फार,
सीता जेवीं वायुसुता[१]चा, करिल तुझा सत्कार. ४
आयकेल ही तुझ्या मुखांतुनि कुशलमयी मम वार्ता,
निरोप पतिचा आणि गांठ हीं सम गणिती विरहार्ता. ५
सांगावें मग तिला " तुझा पति रामगिरीवर राहे,
खुशाल अससी कीं ? ऐसें तुज त्यानें पुशिलें आहे. ६
तुह्मांसारखे बहुत गांजले जन जे दुर्दैवानें,

---

१ हनुमंताचा.

त्यांनीं कुशलप्रश्नचि करिजे परस्परां पहिल्यानें. ७
वाळुन गेला असे फार तो, तूंही कृश झालीस,
विरहज्वर भाजितो तयातें, तूंहि तशी जळतसि. ८
जसें तयाच्या तसें तुझ्याही न खळे जळ डोळ्यांचें,
तुह्मां उभयतां उत्कंठेचें दुःखहि समान साचें. ९
अशी सर्वथा समदुःखा तूं प्राणसखी, तुज गे तो
दूरस्थहि मम सखा मनेंची दृढालिंगना देतो. १०
सख्यांसमक्षहि उघडपणें जें वचन कथायाजोगें,
तें सांगाया चुंबनलोभें जो तव कानीं लागे, ११
दुर्दैवें तो प्रियकर आजी फार दूर पडल्यानें,
प्रेमभरित हें भाषण तुजला बोलत मद्वदनानें:– १२
कोमल वेलींमधें भासतें अंग तुझें सुकुमार,
तसा पिसाऱ्यामधें शिखींच्या दिसे तुझा कचभार; १३
हरिणबालकांजवळ उमगती चंचळ डोळे काळे,
मंद नदीच्या लहरींमाजीं तव भृकुटींचे चाळे; १४
लावण्य तसें तुझ्या मुखाचें अढळे पूर्ण शशांकीं,
मत्त मतंगीं मंदगती ही तुझी दिसते लोकीं. १५
यापरि, सखये, दृष्टी पडतें कोठें कोठें कांहीं,
परंतु तुलना पूर्ण तुझी ज्या, ऐसें एकहि नाहीं ! १६
सखे प्रीतिच्या कलहें जणुं तूं मजवरि फार रुसोनी,
बसलिस ऐसें चित्र शिळेवर रंगांनीं काढोनी. १७
समजावाया ठेवुं लागतों जों पायांवर डोई,
अश्रुजळें तों नयन भरूनी दिसेचनासें होई ! १८
किती दुष्ट तरि दैव असावें न शकें वदावया हें !
याहि परीची, सखे, आपुली भेट जयास न साहे ! १९
स्वप्नीं पाहुनि तुजला, सखये, प्रेमें कवळायास
घट्ट उरीं, मी लांबवितांना आकाशांत करांस. २०
देखुनि वनदेवता दयेनें द्रवती चित्तीं फार,
लतापल्लवीं[1] अश्रु तयांचे गळती वारंवार ! २१
हिमाचलाच्या वनस्पतींचा घेउनि मधुर सुगंध,
तेथुनि वायू दक्षिणेस जो वाहे निष्प्रतिबंध. २२

---

1 झाडांच्या पानांवर जमलेल्या दंवावर वनदेवतांच्या अश्रूंची कल्पना केली आहे.

तयास आलिंगितों, प्रिये, मी नित्य बहु प्रीतीनें,
कीं तो तुजला स्पर्शुनि आला असेल या बुद्धीनें ! २३
लांब रात्र ही, क्षणासारखी लहान होइल केवीं ?
तीव्र उष्णता दिवसाची ही लयास जाइल तेवीं. २४
ऐशी चिंता उगिच करूनी त्यांत नसे फळ कांहीं,
जरी जाणतों असें, तथापी ती मज सोडित नाहीं. २५
जरी होतसे तुझ्या वियोगें मजला दुःख अपार,
धीर धरितसें, पुढिल सुखाचा चित्तीं करुनि विचार. २६
सखे शाहणी असशी, यास्तव विवेक करुनी तूंही,
अपुल्या आश्वासशील हृदया नानाविध हेतूंहीं. २७
सदा कोण गे दुःखी ? अथवा कोण सुखी या लोकीं ?
सुखदुःखें हीं चक्रन्यायें[१] येती हें अवलोकीं. २८
कार्तिकमासीं शाप संपतो माझा, तुज हें ठावें,
चार मास हे मिटूनि डोळे कैसे तरि कंठावे. २९
नंतर, सखये, यथेच्छ पुरवूं मनिंचें सर्वहि कोड,
करुनि विलासां, पूर्वंवियोगें होतिल जे अति गोड." ३०

---

## ५. विरहिविलाप.

जगन्नाथरायपण्डित यांचा भामिनीविलास हा ग्रंथ फार प्रसिद्ध व रसिकमान्य आहे. यांत करुणविलास ह्मणून एक प्रकरण आहे. त्याचें हें मराठी रूपांतर आहे. कोणा एका रसिकानें आपल्या परमप्रिय गुणसंपन्न पत्नीविषयीं यांत विलाप केला आहे.

### श्लोक.

अहा कैसा झाला अवचित विधी निष्ठुर असा !
प्रिया एकाएकीं अमरसदना गेलि सरसा !
मना आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा ?
सुखाच्या शब्दांनीं कवण निववूं तापहि तुझा ? १
घरातें मी येतां दचकुनि उठोनी हंसुनियां,
विशाला नेत्रांहीं अमृतरसवृष्टी करुनियां;
न कां चित्ता आजी मधुरवचनीं हर्ष करिशी ?

---

१ चाकाचा प्रत्येक भाग जसा केव्हां केव्हां खालीं जातो व केव्हां केव्हां वर येतो तसें मनुष्यास कधीं कधीं चार दिवस दुःखाचे येतात तर चार सुखाचे येतात.

असे झाली माझ्या अगळिक करें कोणति अशी ? २
बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवचिया,
अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां.
जिचे डोळे काळे बघुनि मृगबाळेंहि झुरती,
वसे चित्तीं देवीपरि सतत ती मात्र सुदती. ३
निघोनीयां जातां अवचित सखी [1]सुक्तिसदना,
दयाशीला, वाटे, विसरलि दयाही सुवदना !
कटाक्षांहीं नीलांबुज[2]मदहरांहीं मजवरी,
कृपालेशातेंही प्रकट ह्मणुनी आज न करी ! ४
पडायाच्या भीतीस्तव मम करातें धरुनियां
विवाहीं पाषाणीं[3] चढलिस, सखे, तूं जपुनियां,
कशी ती तूं आजी चढशि मज सोडोनि, गगनीं,
करी ऐशी शंका हृदय शतधा, येउनि मनीं ! ५
तुझें जाणें, प्राणेश्वरि, परिसुनी स्वर्गभुवनीं,
अलाक्षातें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं;
निमाली चिंताही सकल कमलांची अजि अहा !
कशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधलि, पहा ! ६
सखे विद्युल्लेखास्फुरण[4]चपला देउनि मला,
सुरेंद्राच्या कांहीं दिवस उपभोगांस अतुलां[5],
अहा ! मंत्रभ्रष्ट क्षितिपतिस लक्ष्मी त्यजि जशी,
लया पुण्यें जातां, त्यजुनि तशि गेलीस मजशी. ७
असोनि त्वां भूमीवर चढविलें ज्या सुरपदीं,
प्रिया, नाथा, ऐशा अतिमधुर संबोधनपदीं,
तया मातें, कैशी धरणितलधूलींत सखये,
दिवस्था[6] होऊनी ढकलिशि; दया कां तुज न ये ? ८
अपूर्वा लावण्या, अनुपम सुशीला, सुविनया,
अपारा चातुर्या, अगणित कलांतेंहि, सुनया,
गुणां ऐशा कोणा निरविशि, सखे, आणि मजला ?

---

१ मुक्तिरूप सखी तिच्या घरीं. २ हें कटाक्षांचें विशेषण. निळ्या कमळांचा गर्व हरण करणाऱ्या. ३ नवऱ्यामुलीला साहणेवर उभी करण्याचा एक संस्कार आहे, याला अनुलक्षून हें वर्णन आहे. ४ विजेच्या चमकण्याप्रमाणें चंचल. हें उपभोगांचें विशेषण. ५ हेंही उपभोगांचेंच विशेषण. ६ स्वर्गवासिनी.

नसे थारा त्यांतें, मजहि दुसरा, ज्ञात तुजला. ९
प्रभापावित्र्यांहीं स्वसम तुज पाहून, रदना
अला वाटे हेवा मनिं बहुत त्या कृष्णवदना,
तयानें त्या रोषें, मज गमतसे जाळिलि तुला;
दया त्या क्रैची ! जो स्वजननें[1]निहि खाऊं न चुकला ! १०
सुधास्पर्शें जेवीं निवति नयनें जीस बघुनी,
जिचा कंठीं वाटे कर कमलहारापरि मनीं,
करी जी उल्हासा अतुल, कविता सुंदर जशी,
तुला नाहीं कोठें मनुजभुवनीं योग्य तिजशी. ११
नँ पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा,
स्पृहायुक्तें चित्तें, जितकमल[2]नालोत्तमभुजा,
सुशीला तूं ऐशी, परपुरुषें[3] जो निर्गुण[4], तया
कशी पाहूं जाशी, हरिणनयने, सत्वर तया ? १२
गुणांनीं[5] जी पूर्णा, अणुसम नसे दोषहि जिला,
अलंकारीं साजे, रस वसतसे जींत पहिला,
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां,
वसे ती पद्माक्षी जशि हृदयिं माझी सुकविता. १३
न जाणों दुर्दैवें अगळिक असे काय घडली,
जिच्या योगें ऐशी तव मनिं अढी थोर पडली,
ह्मणोनी सोडोनी मज, रुसुन गेलीस सदनीं
सखीमुक्तीच्या तूं असुनि विमला कीर्तिहि जनीं. १४
सुधातुल्यें हास्यें करुनि अभिषेकास मजला,
कटाक्षांनीं वर्षे जणुं मजवरी नीलकमलां.
मृगाक्षी, मांगल्यप्रद[6]विधिविधात्री, सुवदना,
न सोडी चित्तातें क्षणभरिहि ती कुंदरदना. १५
बसोनी पर्यंकीं दयितगुण गातां निजमुखें
दिनें नाहीं झालीं बहु निरखुनीयां तुज सखे !

---

१ अग्नि आपली आई अरणी हिला जाळतो या गोष्टीकडे येथें लक्ष आहे. २ कमलाच्या देंठास जिंकणारे उत्तम भुज आहेत जिचे. ३ पतीहून अन्य, पक्षीं ईश्वर. ४ मूर्ख, ईश्वरपक्षीं सत्त्व, गुण व तम यांहीं रहित. ५ या पद्यांत गुण, दोष, अलंकार, रस आणि वर्ण हे शब्द श्लिष्ट असून ते पद्माक्षी आणि सुकविता यांजकडे सारखेच लागू पडतात हें बहुश्रुत रसिकांच्या सहज लक्ष्यांत येईल. ६ मंगल कृत्य करणारी. वरील दोन चरणांतील अभिषेक व कमलवृष्टि हीं मंगलकृत्यें समजावीं.

न कां आजी देशी प्रतिवचनही एक मजला ?
असा कां माझ्याशीं अवचित अबोला धरियला ?
स्वरूपें काव्याच्या अजवरि सखे, जे प्रकटले,
विलास प्रीतीचे सरस अमृतातुल्य घडले,
तयांचा दुर्दैवें अवचित असा नाश घडतां,
पुढें आतां कैची मधुर मम होईल कविता ! १७
तीं भाषणें मधुर जीं अमृतासमान, लावण्य तें रतिहि देत जयास मान,
तें शील ज्यास तुलना न मिळेचि कोठें, कोणास हर्ष गुण हे स्तवितां न वाटे ! १८

---

## कान्होबा रणछोडदास कीर्तिकर.

जन्म–इ. स. १८४९.

लेफ्टेनंट कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, आय.एम्.एस्., ह्यांचीं भक्तिसुधा, विलापलहरी आणि इंदिरा अशीं तीन काव्यें प्रसिद्ध आहेत. ह्यांची इतर स्फुट कविताही थोडीशी आहे.

### १. भक्ताचा टाहो.

पद.

चाल—धांव विभो करुणाकर माधव—

येइ प्रभो ! सुखकारक तारक, नतजनपालक अखिलदुरितहर ! ध्रु०
निर्वाणींचा प्राणसखा तूं, ह्मणुनि शरण तुज हा तव किंकर.
ध्यान भजन हें जीवन ज्याचें, इतर सकलही भासे नश्वर.
पडतां मजवरि संकट कांहीं, धांव लवकरी त्यांतुनि उद्धर.
धरुनी हृदयीं तव पदकमलां, प्रेमें गुण मी गाइं निरंतर.
देउनि मजला ठाव तव पदीं, मोक्षपदा ने हे करुणाकर !

---

### २. करुणापंचक.

श्लोक.

अनुदिन तुज देवा शुद्धभावें नमावें,
तव विमल गुणांच्या गायनीं म्यां रमावें,
न कधिं विषयसौख्या सेवुनी गुंग व्हावें,
परि चिरसुखशांती मेळवाया झटावें. १

तुजसि शरण आलों सर्वभावें दयाळा,
अशरण तव कंठीं अर्पितों प्रेममाळा;
पदरिं मजसि घे हें मागणें तूजपाशीं,
तुजसम न दुजा या लोकिं कारुण्यराशी. २
दृढतर मन लागो पायिं तूझ्या उदारा,
घडिभरि विसरो हें सर्व संसारभारा,
क्षणभरि तरि होवो मंगला ! भेट तूझी,
हृदयिं तुज धरावें आवडी हेचि माझी. ३
तव शुचि यश गातां चित्त संतोष पावे,
प्रियतम गमशी तूं नाम जेव्हां जपावें;
सतत मजसि लाधो बा तुझी पादसेवा,
तव पदरजिं मोठें मानिं मी सौख्य देवा ! ४
नामाचा जयघोष होतु, सदया देवा, तुझ्या सर्वदा,
वत्सांच्या हृदयीं सदैव रम तूं, हे वत्सला, शर्मदा !
कोठें ठाव मिळो न एक पळही दुर्वासनेला कदा,
बंधुप्रेम महीवरी जनमनीं वाढो, टळो आपदा. ५

## ३. गृहिणीविरह.

### श्लोक.

इंद्राचें धनु दिव्य शोभत असे आकाशपंथावरी,
सौंदर्यें भरल्या दिशा, विलसती तें रंग नानापरी,
झाली शीतल मेघवृष्टि, फुलल्या गंधी फुलांच्या कळया,
होतां तुष्ट धरा वनीं विकसल्या रम्या लता कोंवळया. १
वारा वाहुनि मंद मंद खुलते ही सर्व देखा रसा,
तेणें शांति चहूंकडे पसरुनी आनंदवी मानसा,
ऐसा रंग जिथें तिथें विलसतो. मी मात्र शोकानलें
जाईं होरपळोनि हाय सदनीं ! हें काय हो जाहलें ! २
अंगाची बहु काहली, मनहि हें आंतोनि पेटे अहा !
केली वास्तव कीं तये निशिं, विभो ! पर्जन्यवृष्टी महा ?
ते सारेहि पयोनिधी तनुवरी या ओतियेले जरी
होई दाह न शांत ती परतुनी आल्याविना सुंदरी ! ३
हे मृत्यो ! तुज वाण काय पडली ? घाला इथें घातला !
प्रेमोत्कर्ष, तुझ्या मनास, अमुचा कां अंतका जाचला ?

नाहीं मोल असेंचि दुर्मिळ महा चोरोनि नेलें धन,
शोभा मंदिरिंची हरोनि करिशी ओसाड त्याचें वन ! ४
अंतर्याम न भिन्न तें; जरि दिसों देहें निराळें जना,
केलें नाहीं कधींहि जें न रुचलें दोघांचिया गे मना;
आतां यापरि एकलाचि जरि मी राहें तुझ्या मागुनी
नाहीं मी करणार अप्रिय तुझें चित्तेंहि गे मानिनि ! ५
गेलीस त्यजुनी सुखास सहसा ! चित्तीं असें कीं अढी ?
जातां त्वां आपुल्यासवें ह्मणुनि कीं नेलासि ना सौंगडी ?
कंठूं काळ कसा सखे ! तुजविणें या मंदिरीं राजसे !
येथें शून्य तसें उदास सगळें आतां मला गे दिसे. ६
सौभाग्या तव रक्षिलें प्रभुवरें हा लाभ झाला भला,
सोसावें सखि दुःख मींच; न तुवां; हें योग्य वाटे मला;
मी आहें रणशूर; शांत अबला तूं भीरु गे कोमला !
हा चिंताज्वर शोकजन्य सखये गे सह्य आहे मला. ७
संग्रामांगणिं या जना प्रभुवरें संरक्षिलें सुंदरी !
होता सन्निध काळ फार कपटालागीं परी नाचरी !
पाठीं रक्षक सत्कृपाकवच तें घालोनि राहे उभा,
टाळीलें अशुभा, तुझ्या पदरिं गे बांधोनि दिव्या शुभा. ८
भ्यालों नाहिं रणीं, पराङ्मुख कदा झालों न मी संगरीं,
धिक्कारोनि तुला, न भीति धरिली मृत्यो ! तुझी अंतरीं;
होतों मानित युद्धिं धैर्य धरुनि त्रैलोक्य म्यां जिंकिलें;
हा हा ! शेवटिं तूंचि जिंकुनि मला दुःखार्णवीं लोटिलें ! ९
घरा यावें तेव्हां मज दिसतसे चंद्रवदना,
अतां कोठें गेली ? कुणि लपविली कुंदरदना,
पहावें धुंडोनी सकल गृह खालीं वर तरी
दिसेना ती कोठें ! अनिश उठती दुःखलहरी ! १०
कुठें पाहूं आतां सुमुखि, तुझिया हास्यवदना ?
प्रिये ! सांगे कोठें मधुर तव ऐकेन वचना ?
तुझ्या येती कांते प्रणयरसगोष्टी मम मनीं,
विझाली ती ज्योती अहह ! सहसा वात सुटुनी ! ११
अहोरात्रीं जीवा तळमळ, न कांहींच करमे,
न कोठेंही कांते स्वमन लवही हें उपरमे;
अकालीं जायाची तुज सखि कशी गोष्ट रुचली ?

तुझ्या संगें आर्ये सकलकुलशोभा हरपली ! १२
रडोनी स्फुंदोनी नयन सुजती, अश्रु गळती,
निशीं निद्रा नाहीं, तनु विरहवह्नींत जळती,
ह्मणावें गेलीस त्यजुनि मशि दावा धरुनियां,
कसें तेसें होई तुजसम न शान्ता भुवनिं या. १३
सदा जी चित्ता दे सुख मधुर वाणी वदुनियां,
महा माया लावी सतत सकलां दावुनि दया;
बहु ज्ञाती स्त्री ती परि तिज नसे गर्व तिळही,
गुणां गाई तीच्या सकल बहु संतोषित मही. १४
महा मिथ्या माया, सकळ जग सांचें मृगजळ,
उलाढाली होती विविध, परि त्या सर्व विफळ,
प्रभा जीची पूर्णा शशिसम पडे नित्य सुखदा
तिथें आतां झालें तिमिरमय, मी भोगिं विपदा. १५

---

## ४. पत्नीव्रताचे अश्रु.

### अंजनीगीत.

गेलिस मजवरि रुसुनियां कां ? कोठवरीं मी मारूं हांका !
कंठ शोषला ! असह्य शोका, वळि पडलों भार्ये ! १
तळमळ ! तळमळ ! तळमळ सारी ! फिरलों जरि मी दारोदारीं,
भिक्षा ह्मणुनी तुजला पदरीं, टाकिल कां कोणी ? २
झाली पुरती तनुची होळी ! तुजसाठीं मी घेतों झोळी,
मिळवाया तुज आळोआळीं, फिरतों गे भार्ये ! ३
त्या मातेला पडला घोर, भावंडांना दुःखहि थोर,
मम नयनां ये अश्रूपूर, जातां तूं भार्ये ! ४
तूं स्वर्गींची सुधाच गोड ! नित्य नवें पुरवावें कोड,
झाला ऐन उमेदिंत मोड, माझा गे भार्ये ! ५
शब्द कठिण मम तोंडावाटे, निघतां, उघडुनि स्वर्गकपाटें,
अक्षय सौख्याचें त्वां साटें, केलें कां भार्ये ! ६
कां न राहिलिस थोडे दिवस ! संसाराची पुरविलि हौस ?
झाला प्रीतीरसविध्वंस, कैसा हा भार्ये ? ७
कां न ठेविलें एकहि बालक, प्रेमजनित तें प्रेमस्मारक !
जाणे स्वकला तो जगचालक, एकचि गे भार्ये ! ८

काळ गणींना रंक किं-राजे ! दुःख दावितो वदवेना जें;
हृदयीं माझ्या काहुर माजे ! दुःसह गे भार्ये ! ९
काय प्रभूला पडली वाण ? नेलि सुखाची माझी खाण !
हृदय विंधिती वियोगबाण, रात्रंदिन भार्ये ! १०

## ५. धैर्य व तलवार यांची गाळण !

कृष्णाकुमारीच्या बापानें जोबनसिंग नामक आपल्या एका सेवकाला तिचा वध करण्याकरितां पाठविलें होतें. तो सेवक आपली तलवार कृष्णाकुमारीवर चालवूं लागला, तेव्हां कृष्णाकुमारीची धीरोदात्त मूर्ति व प्रकृति पाहून त्याचें धैर्य व तलवार हीं एकदम गलित झालीं ! तो हा प्रसंग आहे.

श्लोक.

जी तर्वार रणांगणांत समरीं वीरापुढें गाजुनी,
योद्ध्यांतें करवी सचैल रुधिरस्नाना शिरें छेदुनी,
छेदाया अबले अरक्षित अशा व्हावें पुढें कां तिणें !
मी हातीं तिजला धरून निरर्वीं ! धिग्धिग् ! जळो हें जिणें ! १
आहे अंकुश कां गजा त्यजुनियां मुंगीस हाणावया ?
व्याघ्रा सोडुन पारधी टपत कां शेळीस छेदावया ?
कौमार्यें सजली गुणी मधु कळी ही शुद्ध हो सर्वथा !
मारोनी हिजला कुठें किति सहूं मी पातकाच्या व्यथा ! २
हिंसेला असल्या अगा नरकही साजे न तो शासन;
देवा भाग पडेल शासन मला योजावया नूतन !
हें होवो कधि मृत्यु नेइल तधीं ! आधींच ह्या यातना
भोगाया नच सिद्ध मी ! प्रलय हा वाटे गिळी मन्मना ! ३
वाटो योग्य मला अयोग्य अथवा; दुष्कर्म हें तों खरें !
मारावें असतीं अरक्षित तयां हें कोण बोले बरें ?
जे होती रणशूर वीर समरीं, हिंसा तयांतें अशी
दात्री जांचणिची ! अनंतपरिंनीं चित्ता न जाळी कशी ? ४
चित्ताला जळणूक मी अशि कशी लावून घेऊं सदा ?
माझें पाप मदर्थ हें उपजवी कैसें न हो आपदा ?
कन्येच्याहि जिवावरी जनक तो झाला उदार स्वयें !
पाणी सोडुन मींहि शांतिवर कां व्हावें तसें निर्दयें ? ५

# विष्णु मोरेश्वर महाजनि.

जन्म–इ. स. १८५१.

रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम. ए., यांचा कुसुमांजलि या नांवाचा एक काव्यग्रंथ आहे. त्यांत एकेचाळीस लहान लहान स्फुट प्रकरणें आहेत. तीं सर्व अनेक प्रसिद्ध इंग्लिश कवींच्या काव्यांच्या आधारानें रचिलीं आहेत. याशिवाय रावबहादुरांची थोडी स्फुट कविताही आहे असें समजतें.

## १. तरुण जनांच्या इच्छा.

लावणी–साधी चाल.

इह[1] लोकींचें जन्म फुकाचें मनांत ऐसें आणुं नये,
आपआपलें कर्म कराया सजिलीं ईशें तनु सदयें ॥ ध्रु० ॥
वरतें वरतें लौकर जाऊं, जाऊं वैभव शिखराला,
मागें ठेवूं कीर्ति आपुली, ठेवूं कविला गायाला,
देशाचें हित करण्यासाठीं अर्पूं विशंक जीवाला,
यश द्यायाला अनन्यभावें प्रार्थूं त्या जगदीशाला. १
खोल खोल हो जाऊं, सेवूं रत्नाकर तो ज्ञानाचा,
सृष्टीचे ते धर्म आकळूं, रस चाखूं या विद्येचा,
विद्यापीठीं अर्थ मिळे जो, आहे तो बहु मोलाचा,
येर अर्थ तो अनर्थ झाला, नाहीं कवण्या कामाचा. २
पुढें पुढें हो चला गड्यांनो, पंथ न सोडूं धर्माचा,
नीतीहुनि तें अन्य नसे सुख, पाया त्या सत्कर्माचा,
अपुला आत्मा दिव्य असे हा, उतरुनि आला स्वर्गींचा,
इहलोकींही दिव्य सुखाचा अनुभव घेऊं या सांचा. ३
जवळि जवळि या प्रेमबंधनें दृढतर सारीं होऊं द्या,
घरचें सुख जरि आहे तरि मग किती विपत्ती येऊं द्या,
कशास भीतां ? वारुनि टाकूं, धैर्य निरंतर राहूं द्या,
घरचें सोडुनि अन्यसुखातें शोधिति त्यांना जाऊं द्या. ४

---

१ ही कविता जेम्स माँटगॉमेरीनामक कवीच्या 'Aspirations of youth' या चुटक्याचें भाषांतर आहे.

## २. सुशील भार्या.

### दिंड्या.

१इष्टिविषया जेधवां प्रथम आली, मुर्ति मोदाची गमे मला आली,
नयनसुख कीं देण्यास पाठविली, देवकुमरी, पाहोनि दृष्टि धाली. १
नेत्रकांती ती तारकासमान, कृष्ण कुंतल ते कृष्णरात्रि मान;
परी जाणें तीं इतर सर्व अंगें, साच मधुनें निर्मिलीं कीं अनंगें ! २
रूप अनुपम, लावण्य तयीं नाचे, मोह घाली ते भ्रमवि चित्त साचें;
जाय तेव्हां हरुनीहि हृदय नेते, कशी स्त्रीची मोहनी कळों येते ? ३
रूप जैसें मन दिव्य दिसे तैसें, कसा प्रणयें वदनेन्दु तो विकासे,
सत्त्वशीला गति, धर्मपरा बुद्धि, मानसाचीही लाभलीच सिद्धि ४
सत्य भाषण, आचरण सत्य तीचें, मुखीं झळके प्रेमही मानसींचें;
मला वाटे भवसागरा तराया, दिली देवें कीं हीच तरी जाया. ५
क्षणिक दुःखें ती बोध करुनि वारी, प्रणयकलहीं आणिते नयनिं वारी;
नर्म वचनें, स्मित मंद, मधुर वाणी, असे सर्वांची अहा प्रिया खाणी !
पूर्ण अवगत हो तिचें हृदय आतां, नसे अवतरली साच अशी कांता ६
अतुलधैर्या ती शांत सहनशीला, हो न कष्टी भोगितां दुःखमाला. ७
दूरदृष्टी औदार्य विनय अंगीं ! काय चातुर्य शोभते कृशांगी :
निर्मिली ही संपूर्णगुणनिधान, बोधवचनें करण्यास समाधान ! ८
जरी विसरे पति आपुला पुमर्थ, तरी आकळण्या त्यासही समर्थ,
देवकन्या जरि साच भासताहे, स्वस्थचित्तें ती तरी दुःख साहे. ९

---

## ३. वसंतसमय.

### साक्या.

पाहीं२ ! आला मन्मथसख हा वसंत, सुमनें फुलली !
वनराजी ही शांता आतां अलिगीतें गजबजली ! १
आम्रीं कोकिलरव तो परिसुनि हुंकृति देती रावे,
गायन शिकवी कोण तयांना ? जेणें कर्ण भरावे ! २
कुसुमापासुनि सुगंध हरुनी झाले जड जे फार
सुखकर शीतल मंद अनिल ते करिति नभीं संचार. ३

---

१ ‘She was a phantom of delight’ या वर्डस्वर्थ कवीच्या काव्याचें हें रूपांतर आहे. २ ‘Ode on the spring’ या टॉमस ग्रेच्या कवितेवरून.

रसालतरूंची जेथें निबिडा छाया पसरे दूर,
अथवा जेथें वितान करि तो वटशाखाविस्तार, ५
अथवा निर्झरतीरीं जेथें वेतस वाढे मृदुल,
हरितशाद्वलीं ध्यान करावें पसरुनि आंगें शिथिल. ६
कवीस येथें कळोनि येतें जीवदशेचें सार,
लोभें भ्रमती जन ते कैसे, करिती श्रम अनिवार, ६
कुलधनविद्यागर्वें फुगले लघु ते कैसे दिसती,
आख्या ज्यांची गुणिजन ऐशी, तेथें गुण ते नसतीं. ७
पहा ! रवीचा प्रभाव ! विरमे शांत कृषीवल आतां,
सेवुनि छाया पशुही करिती रोमंथा अभ्यस्ता. ८
गुंजारव षट्पदगण करितो, भरवी सर्व दिशांतें,
मधुरस चाखायातें उत्सुक सेवी तो सुमनातें. ९
अर्धपीत तें सुम टाकुनियां दुसरें सेवी हर्षें,
परि चंचलमति होतो कैसा स्थिरतर सुगुणोत्कर्षें ! १०
पतंग गर्वें दावी शोभा पक्षगता रंगाची,
नरही खुलतो भूषणवसनीं, काय कथा इतरांची ! ११
पतंगजीवितसम नरजीवित वाटे तत्त्वज्ञाला,
सान थोरही धूळिस मिळती, जेथुनि उद्भव झाला ! १२
उद्योगीं रत राहो जन कीं, विषयासक्त असो कीं,
जीवितदिनभरि करितो लीला दैवाधीन विलोकीं ! १३
येतां संकट, वयें वांकडीं होतां अंगें सारीं,
लीला सरती, गमजा तुरती, मृन्मय नर अवधारीं ! १४
भ्रमर न गुंजारव करिती हे, करिती मदुपालंभा,
ह्मणती वाटे ' भल्या शाहण्या, व्यर्थचि करिशी दंभा ! १५
' क्रीडा करण्या नाहीं तुजसी रमणी सुखैकधामा,
' सुखमधुनें तुज भरलें गृहसुम न मिळे उपरतकामा ! १६
' उंचीं वसनें नसती तुजला भूषविण्या देहाला !
' घालविलें अविचारें यौवन, काल न येई गेला ! १७
' आयुष्याचा वसंत गेला तदुपरि चारी ऋतुही,
' शिशिर पातला, शीर्णपर्ण हा झाला त्वद्द्रुम पाहीं १८
' अमुचा आहे वसंत अजुनी, क्रीडा कां न करावी ?
' तत्त्व सांगतों, कविजनचित्तें मत्सरिता न वरावी. ' १९

---

# गणेश जनार्दन आगाशे.

जन्म—इ. स. १८५२.

रा. सा. गणेश जनार्दन आगाशे, बी. ए., यांनीं अनेक स्फुट प्रकरणें रचिलीं असून त्यांपैकीं कांहीं विविधज्ञानविस्तार, काव्यरत्नावली, डेक्कन कॉलेज क्वॉर्टरली इत्यादि पुस्तकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. बाकीचीं अमुद्रित आहेत.

## १. अलीकडील हरिदास.

### श्लोक.

जो खरोखर असे हरिदास, त्यास ढोंग बडिवार कशास ?
कासया मधुर गायन, पेटी, सुप्रसन्न करण्या जगजेठी ? १
भक्तिचा ह्मणति देव भुकेला, त्यासि भक्तिरस केवळ भेला;
शुद्ध चित्त, करुणामृदु वाणी, भाव निर्मलचि तो मनिं आणी. २
गीतवादनवशें नर मोहे, श्लेषबद्ध वच त्या प्रिय आहे;
आवडे बहु विनोद मनुष्या, काय आवडति हीं अविनश्या ? ३
काय ढोंग करितात बिचारे ! काय हे नटविती स्वशरीरें !
रंगभूमिवरि नाटकपात्रें, तेविं दाविति कथेंत चरित्रें ! ४
सूक्त काय वदण्यासि कथेंत, कोणतें न वदणेंच असूक्त.
भेद हा न करिती धनलोभी, यांस पाप करितां न गमे भी. ५
नामकीर्तन पवित्र सुकर्म, जाणती नच तयांतिल वर्म;
भक्तिचें अमृत मिष्ट सांडिती, येर तें विषसमान सेविती. ६
श्रोतृरंजनचि इष्ट मानुनी, नाटकी करिति हे चतावणी;
सांगुनी विषयसेवनगोष्टी, साधिताति जनमानसतुष्टी. ७

---

## २. मकरसंक्रांत.

### पद.

चाल—अभिनवमधुलोलुप हे—

भोगुनि धनुराशि मकरिं सूर्य पातला,
गगनिं आज उत्तरपथ धरुनि चालला. ॥ ध्रु० ॥
रजनी संकोच धरुनि, दिवसमान वाढवुनी,

हिमपीडा संहरुनी· निजताप प्रकटवुनी,
हरुनि रोग सुखवित हा सकल भूतला. १
अभ्यंगस्नान करुनि, आभरणें अंगि खचुनि,
पुरमार्गीं नटुनि थटुनि, सान थोर नारी जन,
हर्षें सौभाग्यवाण लुटित चालला. २
पर्वकाळिं पुरुष न्हाति, तिळ अंगा लाविताति,
सतिल अन्न सेविताति, भिक्षुकांसि वाण देति,
' मधुर वदा, ' वदुनि असें वांटिती तिला. ३

## ३. मुलीचें लग्न.

### पद

चाल—रुचती का तीर्थयात्रा—

पालटलें वर्ष नाहीं कन्येला आठवें,
तों वाटे मंगलाचें कौतुक तें पाहावें ॥ ध्रु० ॥
गेलें जों नाहिं तीचें भाषण तें बोबडें,
नसतांही काज कांहीं जी हांसे ओरडे,
आईला सोडुनी ना पळ जीला राहवें,
खेळाचे नादिं जीला नच कांहीं आठवें. १
समजेना काय आहे संसारीं काज तें,
उमजेना कांहिं नातें परि लटकी लाजते,
रागाचा शब्द जीला नच अगदीं सोसवे,
आईचा प्रेमराशी मनिं जीच्या सांठवे. २
धर्मादी अर्थ चारी जोडिन मी पतिसवें,
शपथेसी घेववीती परि अर्था नेणवे,
जातांना सासऱ्याशीं काळिज तें कालवे,
घळघळ तीं वाहताती नेत्रींचीं आसवें.
दैवानें चांगलीशीं मिळतां तीं माणसें,
नच वाटे बंधुवर्गा दुःखहि तें फारसें.
दुष्टांशीं योग येतां नच दुःखा पाहवें,
नच धर्मे जोडियेल्या संबंधा तोडवे. ४
निपजे तो कोवि लोकीं कन्येचा नोवरा,
हा लागे नित्य पोटीं सर्वांच्या धोसरा,

निघतां तो सुज्ञ होतें कौतुक तें गोडवें,
नाहीं तो भोग तीचा अपुलाही ओढवे ! ९

---

## ४. उपवर कन्या.

### श्लोक.

लग्नाला जी जाहली योग्य तीचे, होती जे जे सोहळे कीं सुखाचे,
ते वानावे हीच इच्छा धरून, हातीं घेतें लेखणी मी जपून. १
माझ्यासाठीं सुस्थळा शोधण्यातें, बाबा गेले जेधवां गे पुण्यातें,
नेलें मातें तेधवां दाखवाया, केला वाटे शीण तो व्यर्थ वाया. २
कोठें मेली पत्रिका ती पटेना, कोठें माझें रूप हें आवडेना,
कोणी मोठी, सान कोणी गणीती, होते बाई काय सांगूं फजीती ! ३
कोणी बोले नाक हें नीट नाहीं, डोळ्यांमाजी तो दुजा व्यंग पाही,
कोणी कांहीं खोड काढी नवीन, स्त्रीजातीचीं ही स्थिती हीन दीन ! ४
कोणी कोणी पुस्तकें वाचवीती, कोणी बोले ही नवी चालरीती,
कोणी प्रश्ना घालुनी बोलवीती, कोणी उंची मोजुनी माप घेती ! ५
कोणी सांगे छानसें गीत गाया, कोणी हातीं सूय देती शिवाया !
ज्याची त्याची वेगळाली परीक्षा, देती वाटे काय ही घोर शिक्षा ! ६
गे बाजारीं गाय घोडे विकाया, येतां जैसे लोक येती पहाया;
ह्या कीं बाला आणियेल्या विकाया, नोहे कां ही श्रेष्ठ गे मर्त्यकाया ?
जीचे पोटीं भास्कराचार्य यावे, ज्यांनीं ज्योतिर्मण्डला आक्रमावें,
जी कीं वीरां पंडितां जन्म देते, ती स्त्री येथें विक्रया काय येते ! ८
शीला किंवा लौकिका गेणताती, द्रव्या किंवा सुस्वरूपा पहाती;
‘ही कोणाची?’ हें पुसे कोण बाई ! ‘हुंडा देतीं काय ?’ हा प्रश्न येई. ९
कोणी लक्ष्मीपुत्र कोणी भिकारी, दोघे हुंडा मागती दुर्विचारी,
कोठें पैसा जोडिला पूर्वजांनीं, कोठें नाहीं अर्थ कांहीं ह्मणोनी ! १०
झाला पैसा खाउनी एक थोर, कोणी ठेवी दाबुनी थंडगार;
कोणाची गे वोखटी चालरीती, वाटे त्यांची भेट घ्यायास खंती. ११
नाहीं ज्याच्या मान कांहीं कुलाला, तोही पावे पुत्रयोगें पदाला !
विद्येचा गे गंध सातां पिढ्यांत, नाहीं तोही पुत्रयोगें कृतार्थ ! १२
आचारी वा पाणक्या कां असेना, तोही पुत्रें पावतो थोर माना !
जो जन्माचा राहियेला करंटा, मानापाना घालितो तोहि तंटा ! १३
जो तो पाहे नोवरा सुस्वरूप, कोणी पाहे नोवऱ्याचें न रूप !

राहो मोठा खेंवडा लेंबडा वा, तो पोरींना सर्वथा आवडावा ! १४
ऐशा सांगूं काय बाई ! अपेष्टा, स्त्रीजातीच्या जाणतो कोण कष्टा ?
हा लग्नाचा लागतां पाठिं धोशा, पोरींना हा जीव होतो नकोसा! १५

---

## ५. कवि आणि काव्य.

कविताशक्ति ही ईश्वराची देणगी आहे. ती श्रमानें प्राप्त होणारी गोष्ट नव्हे. काव्याचें बहिरंग म्हणजे अनुप्रास, यमक इत्यादिकांचा थाटमाट, मंजुल वृत्तांची निर्दोष रचना इत्यादि ठाकठिकीच्या गोष्टी, श्रमसाध्य आहेत. परंतु रस हा कवितेचा आत्मा आहे, ह्मणून रसयुक्त जें काव्य तें खरें काव्य व असें काव्य करणारा तो खरा कवि होय. हें तत्त्व या उताऱ्यांत कवीनें प्रतिपादिलें आहे.

### श्लोक.

प्रतिभा स्फुरते न अंतरंगीं, नच बुद्धी अपरोक्षमार्ग लंघी,
नचि निर्मि नवीन रम्य सृष्टी, दिधली ती विधिनें न दिव्य दृष्टी. १
न फुटे हृदयीं कधीं उमाळा, बघतां दुष्कृति जीव हो न गोळा,
फुटती न अपाप शब्द वाचे, बघतां कौतुक भूतलीं अजाचें. २
पडलें श्रवणीं न मंजु गीत, भरुनी जें उरलें असे क्षितींत;
मन आत्मिक सौख्य तें न चाखी, जगिं आनंदघना न जें विलोकी. ३
'ट'सि मी जुळितों कसा तरी 'ट,' कवि तो मानिति रामदास 'धीट'.
यमक्या गणिलेंहि वामनाला, कवि व्हाया मज हाव ती कशाला ? ४
भवभूति कवी नगापगांतें, रडवी, बोलवि दंडकावनातें;
अनुभाव तदीय त्यासि ठावा, मजला तो उपलब्ध कोवि व्हावा ? ५
कवि तो सुकृती मनासि वेधी, मनुजाभ्यन्तरवृत्त जो निवेदी,
ह्मणुनी कविमंडलावतंसा, भजती शेक्स्पियरास कालिदासा. ६
तमसा, सरला, प्रियंवदा, अनसूया कवणासि वा कदा
हरिती न ? निसर्गसत्यता हृदया आकळि, हीच धन्यता. ७
न जपें, न तपें, न वा श्रमानें, मिळतें अध्ययनें न वा धनानें;
हरिचाचि खरा महाप्रसाद, कविताशक्ति गमे निसर्गसिद्ध. ८
दिधली कविशक्ति ही जयाला, हरिनें तो न गणी परिस्थितीला,
सहज प्रकृतीच गोड गावें, इहलोकीं जंव त्या जनें जगावें. ९
कविमानस मारितें भरारी, क्षणमात्रीं त्रिदिवांत गूढचारी;

अतला सुतलासि भेदि वेगें, गगना आक्रमि शीघ्र एक वेंचे. १०
कविच्या कृतिला नसेचि तोल, इहलोकीं न तयेसि योग्य मोल;
टटटेति मृदंग काढि बोल, प्रतिभेवांचुनि सर्व अन्य फोल. ११
कवि कोण जगीं धनाढ्य झाला ! न सपत्नी खपते सरस्वतीला;
अनुराग अनन्यभावनेनें, करि त्या सेविल ती अनन्यतेनें. १२
निपजे न जनीं कवींद्र मोलें, सहजस्फूर्तिविणें न शीर्ष डोले;
खर अश्व न होय पोसिल्याही, गति जातीविण येथ अन्य नाहीं. १३
पढता कवितोपयोगि छंद, रचितां येति नवीन पद्यबंध;
परि छंद गणीति देहमात्र, रस आत्मा, प्रणयासि तोचि पात्र. १४
रस तो निपजेल केविं, ठावें, कविला मात्र, तयासि तें पुसावें,
रचण्या शिकवीत पद्यमाला, कविकर्मा न सजीत शिल्पशाला. १५
न महाकवि कां ह्मणूनि झाले, पुसतां नित्य मनांत गूढ खेळे,
खडकावरि झाड कां न यावें, कवळाला मधुरत्व कां नसावें? १६
असल्यास मनःप्रसन्नता ती, असतां ज्ञान, तशी दृढानुरक्ति,
स्फुरतां प्रतिभास्फुलिंग चित्तीं, कविताज्योति अपाप घेइ दीप्ति. १७

---

## ६. न्या० महादेव गोविंद रानडे.

### श्लोक.

प्रचंड नगराज तो हिमगिरी असे लोळला !
अगाध अथवा पयोनिधि अशेष तो आटला !
दुभंग अथवा अहो ! धरणिगोल हा जाहला !
अकांत असला कसा भरतभूतलीं मातला ? १
हळाळति कशामुळें जन लहान मोठे वदा,
विलापरव एवढा परिसिला न कोणीं कदा.
हताश जन सर्वही, कवण विघ्न हो पातलें ?
दिसे भरतभूमि ही सकल आर्त शोकानलें. २
“ हिरा बहुत साजिरा, रुचिर कोहिनूराहुनी,
क्षणीं हरपला ! ” असें वदति दीनसे होउनी.
दुजे “ गगनिं लोपला अतुलतेज तारा ! ” असें
वदूनि असुं ढाळिती, परमिती तयाला नसे. ३
पडे मसलतींत जें गहन पण्डितां सांकडें
जया पुढति मांडितां उलगडा तयाचा पडे.

रमेसह सरस्वती विसरुनी जुनें वांकुडें
यदीय गृहिं नांदती ! परि न गर्व ज्याला चढे. ४
परोपकृतिचें महाव्रत अखंड ज्या आवडे,
निरुद्यमचि रोगियाप्रति कुपथ्यसें वावडें.
पदोपदिं जयाविणें प्रगतिकाज सारें अडे
दिसे विबुधवृंद ज्याविण अनाथसें बापुडें ! ५
" स्वकीय कुलदीप हा हरपला ! " अशी ओरडे
स्वदेशजननी, खळे नच अजूनि तीचें रडें.
यदीय मृति सर्वही स्वजनकार्यभागीं नडे
रमारमण तो असा कवण नेणता रानडे ? ६
गुणी बुधशिरोमणी जनपदाग्रणी धोरणी
स्वदेशहितकारणीं झिजवि देह रात्रंदिनीं,
सुहृद्व्यसनवारणीं श्रम गणी न विद्यार्जनीं,
हिरा जडितकोंदणीं विलसला तसा सज्जनीं. ७
जया उपजतां दिली अतुल ईश्वरें तीक्ष्ण धी,
जयें श्रमुनि जोडिला अति अगाध विद्यानिधी.
जयाविण सरस्वतीसदन शून्यसें जाहलें,
यदीय निधनीं नसे कवण भाग्य हो लोपलें ? ८
तया गणिति भानुच्या सम, कितीक बिस्मार्कसे,
अनन्वयनिदर्शन प्रकट तच्चरित्रीं दिसे;
अमोल गुणसंहती; सुगुण पोषिती शेष ते;
तया सदृश तोच ! हें उचित मन्मना भासतें. ९
तुह्मी भरतखंड हें निजकुटुंबसें लेखिलें,
हिताहित पित्यापरी सतत आमुचें देखिलें,
शिरीं सतत वाहिलें स्वजनकार्यचिंताभरा,
प्रनष्ट जनछत्र हें ह्मणुनि जीव हा घाबरा. १०
दिनान्तसमयीं तुह्मीं सहल अन्यमित्रांसवें
करूं निघतसां, मला सकल आज तें आठवें !
सुबोध तुमचा तदा गमलि मेजवानीच, तें
रसायनचि मानसा सुखवि, पोषि चिच्छक्तितें. ११
कड्यावरुनि कोसळे खळखळे जशी पर्वतीं .
प्रशांत मृदुशाद्वलीं झुळझुळू झरी सैकतीं;
तशी विषयधोरणें चटुल वाग्नदी वाहिली,

निमालि, परि मर्मरश्रवणरूप ती राहिली ! १२
कठोर शठनास्तिकांविषयिं बोलतां ती गिरा,
हिमालयगिरींतुनी घसरते जशी घोंगरा;
प्रसादयुत सज्जनाविषयिं बोलतां शांत ती
प्रयागपुर सोडितां स्थिर गभीर भागीरथी. १३
जनस्थिति सुधारणाविषय वर्णितां कोमळ
नदी प्रभवनिर्गता रव करी जसा मंजुळ;
परेशमहिमा तया प्रिय निरूपितां प्रेमळ
अगाधजलसिंधुचा प्रवह ज्यापरी निर्मळ. १४
परोपकृतिच्या कृती तुमचिया स्मरूं मी किती ?
अनेकविध उद्यमा तुमचियाच त्या वर्णिती !
शतांश तुमचा जरी इतर मानवां साधता
तरी खचित तो जनीं बहुत पावता धन्यता. १५
विशाल पृथिवीपरी सुयश विस्तरा पावलें,
ह्मणूनि गुणकीर्तनीं पृथिविवृत्त हें साधिलें;
सुवर्ण कुसुमें चितेवरी सुहृद्गणीं वाहिलीं,
यशस्तनुस अर्पिली सबहुमान पद्यावली. १६

विरुद्रावली.

---

## ७. रूढिमहिमा.

### श्लोक.

अये रूढे ! वर्णूं अतुल महिमा मी तव किती ?
न शास्त्राची सुद्धां तुजपुढतिं गे चालत गती !
तुझे झाले पाहीं जन सकलही दास जगतीं !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असती तूं बलवती ! १
त्वदाज्ञेनें लोकीं जन विफल वित्तव्यय करी,
त्वदाज्ञेनें सोशी अमित विपदा कष्टहि वरी;
त्वदाज्ञा भंगाया नच विबुधही लोकिं धजती,
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असती तूं बलवती ! २
असे स्नानीं, दानीं, शयनिं, वसनीं, ध्यानिं, पठनीं,
तुझी थोरी क्षुत्तृट्प्रशमनिं, तशी कार्यकरणीं;
व्रतीं वा संस्कारीं तुजचि जन सारे प्रणमती,

नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असली तूं बलवती ! ३
कसें वस्त्रा ल्यावें ? कच शिरिं असावे किति ? कसे ?
टिळा कैसा ? जोडा कवण ? कुडत्याला किति कसे ?
कसें पागोटें तें ? वदुं अतुल सत्ता तव किती ?
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असली तूं बलवती. ४
महानाम्नीत्यादिव्रतसमुदयारंभसमयीं
असावी चित्ताची स्थिति, तशि गृहाची, शुचिमयी;
अशा कालीं द्वारीं, अहह ! गणिका नाच करिती !
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असली तूं बलवती ! ५
नसे ब्राह्मोद्वाहीं विहित वरडंडा ऋषिजनीं,
नसे त्यांच्या ग्रंथीं विहिणकरणी मानधरणी;
परी पारंपर्यापुढति ऋषिवाक्या विसरती,
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असली तूं बलवती ! ६
खऱ्या कर्मा फांटा, कधिंहि नच तोटा अविहितीं,
भिकाऱ्याला सोटा, परि विनय मोठा धनयुतीं;
द्विजा पैसा खोटा, गणपतिस रोठा वितरिती !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असली तूं बलवती ! ७
वधू नेणे कांहीं, वरिवरि 'अगाई !' ह्मणतसे,
वळें नेतां शाळे पुसि रडत डोळे कण्हतसे;
तयातोंडीं धर्माचरणशपथांतें करविती !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असली तूं बलवती ! ८
पिता पापी शुल्कग्रहण दुहिता वोपुनि करी
तसा तोही शुल्का वितरुनि वधू जो वर हरी;
श्रुतिस्मृत्युक्ता या बहुमत निषेधा न गणिती,
नमस्तुभ्यं, रूढे! खचित असली तूं बलवती ! ९
जरी आपत्कालीं विहित दुसरें दारकरण,
परी न स्वेच्छेनें नवनवकलत्रोपयमन,
नसोनी आपत्ति स्मृतिपथ परी लंघिति किती ?
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असली तूं बलवती ! १०
कधींही एकांतीं न जरि पतिची गांठ पडली
अकालीं त्या येतां मरण, विधवा खास ठरली !
झुकोनी संसारा रडति झुरती आणि मरती !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असली तूं बलवती ! ११

स्त्रियांनां मुंडावें पतिनिधनिं ऐसा जर विधी
मरे पत्नी तेव्हां न नर करि संन्यासहि कधीं !
असा लोकीं केला विधुरविधवाभेदहि किती ?
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १२
स्त्रियांचे चित्तीं कां भवभयमुमुक्षा न वसते ?
तशी ज्ञानप्राप्तीविषयिं दृढ इच्छाच नसते ?
न कां त्यांना वेदाध्ययन लिपिशिक्षा वितरिती?
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ? १३
मनःपावित्र्याची च्युति नच्चि घडावी ह्मणउनी
असे स्पर्शास्पर्शादिक नियम केला ऋषिजनीं;
मनीं पापा ध्याती, परि जन विटाळासि जपती !
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १४
द्विजांचें तें इज्याध्ययन तप सर्वस्व सुटलें,
क्षमेचें सत्याचें किमपि धृतिचें नांव तुटलें,
सदाचारा ऐशा त्यजुनि वितथाचार वरिती !
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १५
जरी शूद्रस्पर्शें समुचित सदाचार बुडतो,
सदाचारा त्या कां न कधिं यवनीसंग नडतो ?
न पापाची बुद्धि त्यजिति, न मना शुद्ध करिती.
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १६
जलीं वस्त्रीं देहीं शुचि अशुचि आचार उरला !
विटाळाचा चित्तीं उमज उरला, शब्द ठरला !
अशा मिथ्याचारीं द्विज रमति ! हे तों तव कृती.
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १

## कोऽपि.

जन्म–इ. स. १८५२.

कोऽपि, बी. ए. एलएल. बी., हे मुंबई हायकोर्टाचे वकील आहेत. यांचा कांहीं पद्यें या नांवाचा एक लहानसा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे. शिवाय यांची इतर स्फुट कविताही आहे. ती अमुद्रित आहे. तिच्यापैकीं दोन उतारे खालीं दिले आहेत.

### १. नामावलि.

श्लोक.

समस्तहृदयीं वसे सतत सच्चिदानंद तो.
नसे किमपि ज्यांत तो नच कदापिही नांदतोः
विरिंचि हरि सांब हे सकल एक तूं केशवा !
सरी न करिती तुझी इतर देव नाकेश वा.
जरी असासि तूं जगत्त्रयहि सर्व तें व्यापुनी,
प्रकाश तव त्यां मिळे सुकृति मात्र जे हो मुनी;
जरी प्रळय जाहला तरि न तो शिवे त्वद्गुणा.
जळांत वससी असें सुचवि नाम नारायणा !
सतीस छळिलें यदा नृपसभेंत दुःशासनें,
मनीं विकल होउनी बहु विलाप केला तिनें;
तुझें स्मरण ती करी तुजसि आळवी जेधवां,
रमा करुनि दूर तूं त्वरित धांवशी माधवा !
जनांत अथवा वनांतहि असेल वास्तव्य तें,
निमग्न भजनीं तुझ्या कधि न पावतो व्यग्रतेः
असा मनुज तो सदा अनुपमा सुखा लाधतो,
वसे हृदयिं त्याच्चिया वदति संत गोविंद तो.
जगासि अति उग्र ते असुर ताप देती महा,
तयांसि करि शासना धरुनि योग्य रूपें दहा;
स्वभक्तजनरक्षणीं धरितसे सदा जागृती,
कवींद्रनुत विष्णु तो नमिं, मला न अन्या गती.
प्रचंड खळ तो सदा झडप घालि धात्यावरी
मुखांत उतरावया, तइं तुझांसि निद्रा वरी;

तशांत करुणस्वना परिसुनी, तयातें करीं
त्वदीय मधुसूदना ! कृति गतासु, मांडीवरी. ६
स्वभक्तजनतारका सदय होसि साधूंवरी,
भवांबुधि तरावया तुजविना दुजी ना तरी;
असाधु खल जे जनीं करिसि त्यांसि तूं मोहरी,
त्रिविक्रम न तूं कसा त्रिविधताप जो संहरी. ७
अगाध यश लाधला बहुत पुण्यकृत्यें बळी,
सुरादि गतधैर्य ते अखिल जाहले निर्बळी;
प्रसन्न मग होउनी सुखविशी तयांच्या मना,
जरीहि लघु मूर्ति तीं, कृति नसे तशी वामना ! ८
जनांसि दिसलें, तुह्मीं विविध भोग वृंदावनीं
करून बहु तोषिल्या व्रजजनांचिया कामिनी;
असे खचित भास तो ! स्वजन ते तुह्मीं उद्धरा,
रमेविण दुजी नसे प्रियतमा तुह्मां श्रीधरा. ९
स्वसंयमन तें करा, कृति न तद्विना मुक्ति दे
भवांबुधितरी अशी तव सदुक्ति गीता वदे;
शमासहि दमास जो वरिल तो सुखा पावतो,
स्वनाम धरुनी तसें सुचवितो हृषीकेश तो. १०
अदृश्य तव रूप तें दिसतसे जनां भाविकां
मनोगत जसें असे रमविशी सदा सात्त्विकां;
धरी कमल नाभिच्या वरि असा जनां भासतो,
प्रणाम मग कां नसो सतत पद्मनाभास तो ? ११
शिशुत्व तव तें करी कुपित फार मातें यदा
पुन्हां न करिं मी असें तिज दिला तुवां वायदा;
तरीहि छळिसी तिला, उखल रज्जुनें सुंदरा
तयीं उदर बांधुनी तुजसि ठेवि दामोदरा ! १२
त्वदीय जन अर्पिती तुजसि भक्ति भावें जया
तया विफलता न ये, सतत पावतो तो जया:
तयांस मग कर्षुनी हरिसि त्यांचिया मीपणा
ह्मणोनि तुज बाहती विबुध साधु संकर्षणा ! १३
दया किति तुझ्या मनीं तव ! जनास जे गांजिती
तयांस वधुनी तयांप्रति समर्पिशी सद्गती
अनेक समयीं; तशी कृतिहि दाविली मातुला,

प्रणाम मम हा असो सतत वासुदेवा तुला. १५
प्रकाश रविचा नभीं पळवितो तमोराशिला,
जरी बनुनि राहिली जड अतीव त्याची शिला;
परी न हृदयस्थ जें तम तया रवि ध्वंसितो,
प्रपूर्व अतिदीप्तिमान् अघतमा हरी द्युम्न तो. १९
अदृश्य जरि वायु तो परि सदा त्वचेला कळे,
सुचंचल असे तरी मनुज त्यासही आकळे;
नसे विषय इंद्रियां, गति न ज्याचि हो कुंठिता,
असोनि अनिरुद्ध तो वश तया करी साधुता ! १६
क्षराक्षर असे जगीं पुरुष दोन सांगे श्रुती,
क्षरास लय येतसे परि न अक्षरा ती गती;
तयाहुनि विशेष तूं, वदति हें तुला जाणते,
ह्मणोनि पुरुषोत्तमा तुजसि नाम अन्वर्थ तें. १७
जरी विषयिं वावरे तरि तया न ते स्पर्शती,
तयीं वसति ते तरीं नच तयास ते बाधती;
असा विबुधमानसीं विलसतो गुणातीत जो
अधोक्षज तयास हो मति न कां मदीया भजो ? १८
हिरण्यकशिपुस्तवा करुं न दे तुझ्या जेधवां
स्वभक्तवच राखिलें धरुनि उग्र रूपा तुवां;
वदे तनय त्याजला ‘ प्रभु दिसेल हो स्तंभिं या, ’
तयीं प्रकट जाहला प्रणति नारसिंहा तया- १९
सुरेंद्र जरि जाहला, अचलता नसे हो तया,
विकारवश होउनी प्रकट जाहला तोतया;
असे अचल जो सदा, नच जया पराधीनता,
जयास उपमा नसे प्रणति त्या असो अच्युता. २०
स्वधर्म जन सोडुनी वळति नीच मार्गाकडे
खळांसि बळ देउनी करिति साधुंशीं वांकडें;
सदा सुपथ दाविसी, खळ निवारिसी, होउनी
जनार्दन यथोक्त तें तुजसि नाम देती मुनी. २१
सुरेंद्र जरि पावला सुरगणीं महाश्रेष्ठता
तुवांच पदवी तया दिलि अशी तुझी धन्यता;
कृतीस भुवनत्रयीं तव मिळे कुठें ना तुला,
अनादिहि अनंत तूं विनत मी उपेंद्रा तुला. २२

स्वभक्तजनवत्सला हरिसि त्यांचिया आपदा,
असन्मतिजनांचिया हरिसि सर्वदा दुर्मदा;
अनिष्ट जितुकें जगीं हरिसि सर्व तें वास्तव,
तुला हरि वदूनि मन्मति करो त्वदीय स्तव. २३
धरूनि तनु मानवी अति मनोहरा गोकुळीं
पुनीत करिसि प्रभो सुभग यादवांची कुळी;
चतुर्भुजधृतायुधा ! असित ती तनू अद्भुत
प्रसन्न मजला असो सपदि कृष्ण तो श्रीयुत ! २४

---

## २. ईशप्रार्थना.

### श्लोक.

प्रसाद करिशी न तूं अजुनि काय देवा ! करूं ?
सुदूर नच जातसे त्यजुनि माय ती लेंकरूं.
अधीर बहु जाहलों, बहुत जाहलों घाबरा,
करीं कर धरीं, करीं भवरुजेंतुनी या बरा. १
उपेक्षिसि न ते कधीं असति लीन जे त्वत्पदीं
असें वदति संत, कां मज उपेक्षिसी आपदीं ?
प्रभो ! प्रचुर तापलों, भ्रमविते मला आपदा,
दया करुनि या जना त्वरित दाखवीं त्वत्पदा. २
असेन बहु पातकी, किति तुह्मीं असे तारिले !
तुह्मींच गणना करा, बहु असाधु केले भले;
असंख्य जरि तारिले सुलभ हो तुह्मां कार्य तें.
असें नच वदेन मी, वदति सर्वही आर्य ते. ३
ह्मणों स्वजन तारिले, तरि तुह्मीं कसा ठेविला
हताश जन एक हा प्रभुवरा वदा तें मला:
तुह्मां कठिण वाटतें स्वजन एक तारावया
अशी विकट कल्पना मम मनीं न यो राव या. ४
कुभाव विलसे जिचा ज्वलित कीं जसा इंगळा
अशी कुपथगामिनी तुह्मिच तारिली पिंगळा;
असे कितिक दाखवूं प्रभुवरा तुह्मां दाखले
न कां मजविशीं तुह्मी करितसां मनातें खुलें ? ५
प्रभो ! वदति साधु कीं तव जनां न कांहीं उणें,

नसेन जन मी तुझा ह्मणुनि फार दुःखें शिणें.
कुतर्क मम मानसीं बहुत येति ऐशापरी
तयांसि झिडकारितों, कधि न दूर जाती परी ! ६
मला बहुत जाचते प्रखर संसृतीची बिडी
न शांति मनिं ती वसे, पळुनि जातसे भाबडी;
स्थिति प्रचुर कष्टदा दिन जगांत कंठूं कसे ?
प्रसाद न घडे तुझा, मन सदा फिरे चाकसें. ७
विलापरव ऐकुनी गज कसा अहो तारिला ?
न कां हटवितां तुह्मी मम भवाब्धिच्या वारिला ?
न कां श्रवण ऐकती मम विलापतारस्वरा
नव्हे स्वजन हा असें मनिं धरूं नका ईश्वरा ! ८
मला व्यसनिं पाडिते सतत नष्ट मायानटी,
प्रसंग तिजशीं नको मलिन ती असे रानटी;
तुझा विसर पाडिते. तिस कसें ह्मणावें भली ?
मला नच कळे कशी अढळता तिला लाभली. ९
पवित्र चरणांबुजीं विनत मी अहो तोकसा.
दया करुनि दाखवा सदय तात होतो कसा ?
दयाघन तुह्मी खरे बहु तृषार्त या चातका,
नका धरुं मनांत हो अमित माझिया पातकां. १०

गीति.

दीनोद्धारसमर्था ! तव भजनीं अट्टहास हा केला,
करुणायन तूं अजुनी देसीना काय ह्मणुनि हांकेला ? ११
भक्तनिवासा कां तुज हृद्गत माझें कळे न सांग मला,
किंवा हा पतित तुला उद्धरण्याला न योग्यसा गमला. १२
संसारसागरीं या बहु झालों विव्हळ प्रभो राया !
तुजवांचुनि नच कोणी समर्थ टाळावयास घोरा या. १३
नाहीं तुझ्यासम दुजा करुणेचा त्रिभुवनांत सागर तो,
मन्मानसभृंग तुझ्या पदकमळीं तो कसा न सांग रतो ? १४
तव भक्ति हीच नौका प्रचंड भवसागरीं तरायाला,
१ षड्रिपुनक्रापासुनि, तारक अन्या न तदितरा याला. १५
दूर जरी मज करिसी तरि नाहीं जगतिं अन्य थारा या,
भक्तांचें परिपालन, शील न तव होउं अन्यथा राया ! १६

## गोविंद वासुदेव कानिटकर.

जन्म–इ० स० १८५४.

रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर, बी. ए. एल एल. बी., यांचीं अकबरकाव्य, नारायणराव पेशवे यांचा मृत्यु, कृष्णाकुमारीकाव्य आणि संमोहलहरी अशीं चार काव्यें प्रसिद्ध आहेत. शिवाय इतर स्फुट कविताही यांनीं केली आहे. तिच्यापैकीं कांहीं विविधज्ञानविस्तार, काव्यरत्नावली इत्यादि मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झाली आहे, आणि कांहीं अद्यापि अमुद्रित आहे.

### १. चंद्रकलेचा ग्रास !

पद.

चाल—रामचंद्र नाहिं घरीं काय मी करूं–

चण्डरश्मि तापवुनी सकलही मही
मावळला, तदपि गमे सुख न अल्पही ! ॥ ध्रु० ॥
एकांतीं उच्च स्थल सदनिं पाहुनी
त्रस्तहृदय पडलों मी निजसुखासनीं. १
चंद्रकोर मजसमोर रम्य देखिली,
भासलि मज निरुपम ती दिव्य बाहुली ! २
स्वच्छ, शुभ्र, विरल मेघ तिजसभोंवतीं
घिरट्या किति गृध्रांसम मंद घालिती ! ३
पालटती अंबरगत वर्ण ते कसे !
रजताची चंद्रकोर कनकमय दिसे ! ४
इतुक्यांतचि एक मेघ, केविं ना कळे,
उग्ररूप कृष्णवर्ण तिजकडे वळे ! ५
प्रथम न जो भयद गमे फारसा, परी
लवकरि अति विस्तृत तो होय अंबरीं. ६
ग्रासि नभीं चंद्रकोर दुष्ट दांडगा,
हरिणीतें घोर वनीं जेविं लांडगा ! ७
घाबरली परम मनीं, बळ पळावया
तिळ न उरे, पाहुनि ये मज तिची दया ! ८
दुर्बल मी पामर या मर्त्य लोकिंचा,
टाळावा हाय ! कसा घात म्यां तिचा ! ९

ज्या माझी चंद्रमुखी सुगुण कन्यका
तुकातिच तूं भक्षियली सर्वभक्षका ! १०
गगनींही तीच कथा भयद पाहिली.
सर्वत्रचि दुःखमयी सृष्टि भासली ! ११
इच्छा त्या प्रभुची हें समज बा मना !
न करिं शोक, जिंकाया शीक वासना ! १२

---

## २. राईंतील पक्षी.

### पद.

चाल—मग चलत कानकर हटकी—

वद कवण शिकवि तुज गाया ? ॥ ध्रु० ॥
वृक्षामधुनी पक्षिवरा किति मधुर गासि गीता या !
वसंतलक्ष्मी कविहृदयासम हालवि कीं तव हृदया ? १
शीतल मंद पवन आनंदवि सन्मित्रापरि राया !
झटसी तूंही पवनसखासा माझा शीण हराया ! २
उष्णकाळचा मास, जलाशय सुकति सर्व या समया,
निज गानामृत सिंचुनि सुखविशि पीडितजनसमुदाया ? ३
तांबुस, पोपटि, लाल वनश्री ! प्रभुची अद्भुत माया !
फुटली तरुवर रम्य दिसे ही स्निग्ध सुपल्लवछाया. ४
आठवतो या समयीं कविवर भक्त प्रेमळ तुकया,
अभंग गाई संसृतिदुःखित जीवांना शमवाया. ५
विहगा ! तरुतुनि सोडिसि वाटे चित्सुखमय लहरी या,
मज गमतें तूं स्तविसी भावें श्रीहरिच्या कीं पायां ! ६
सत्कविचरणीं नमवुनि माथा मुक्त भवांतुनि व्हाया,
अल्पमती मी तळमळतों प्रभु ! उद्धरिं गोविंदा या. ७

---

## ३. नारळीच्या झाडांतील चांदणी.

### पद.

चाल—अभिनवमधुलोलुप—

चांदणि ! कां तरुमधुनी चमकसी असी ?
शांत मधुर समयीं या काय सांगसी ? ॥ ध्रु० ॥
दिसती किति सहचरि या तुजसभोंवती ?

झांकुनियां कांहिंस ती टाकि तरुतती,
पडला हा अंधकार निबिड खालती,
( चाल ) धरुनि रूप दिव्य मशीं काय बोलसी ? १
हृदय तुझें सदय दिसे सत्य गे ! मला,
सृष्टीचें गूड सकल विदित कीं तुला,
सांगावें उकलुनि मज याच हेतुला,
(चाल) धरुनि मनीं दिव्य नारि ! काय हांससी ? २
संमोहीं पडलों मी देव जाणती,
अमरां त्या कळली मम दुःखित स्थिती,
निरसाया मोहपटल तुजसि धाडिती ?
( चाल ) सांग सकल, सांग तुझ्या काय मानसीं ! ३

---

## ४. खिडींतील कुसरी अथवा रानजाई.

### पद.

चाल— चंद्रकांतराजाची कन्या.—

सुंदर कुसरी ! खिडींतिल तूं सांग मला ताई !
कां तुजवरती इतुकीं येती रम्य फुलें बाई ? ॥ ध्रु० ॥
येती तर येती परि लवकरि कां गळुनी जाती,
सडा पसरला भूमीवरि हा त्याची हो माती ! १
उंच अशा स्थानीं चमकति तीं तनु तव शोभविती,
गगनावरती देउनि दृष्टी दिनमणिलें नमिती ! २
तींच पटापट हाय ! हाय ! कां वृष्टिपरी पडती ?
पडुनी सुकुनी माति सुगंधित निजगंधें करिती. ३
संध्यासमयीं पतिच्या साठीं लेउनि शृंगारा,
भूमातेच्या स्वाधिन करिसी सकाळिं कीं सारा ! ४
अथवा रुसलिस न कळे रात्रीं पति रागें भरला
ह्मणुनि तुवां हा साज आपुला फेंकुनि कीं दिधला ? ५
सांग सांग, गे ! गूढ सकळ मज, लाजुं नको ताई !
तूं भगिनी, मी बंधु, आपणां दोघां एकचि आई ! ६ ६
गरीब वनिची रानजाइ तूं, अनाथ मी पांथ;
गोविंदातें प्रकाश देवो तो विश्वाचा नाथ ! ७

## ५. प्रेम.

### पद.

चाल—अरसिक किति हा शेला—

सकलहि वश प्रेमाला, या त्रिभुवनिं कवण न जिंकिल त्याला ? ॥ध्रु०॥
लक्ष्मीनें जरि वरिला, प्रेमधनाचा लाभ जयाला,
हृदयीं नाहीं घडला, लाभ कायसा त्यानें केला,
येउनियां जन्माला, सौभाग्याला साऱ्या मुकला,
देह जरी हा गळला, न पवे तरि हें धन नाशाला,
जी प्रिय वस्तु जयाला, अठवण त्याची होइल त्याला,
ऐशी कीर्ति प्रेमाला, वर्णुं सखे ! मम कंठच शिणला ! १

---

## ६. अरुणोदय.

### पद.

चाल-रामचंद्र नाहिं घरीं—

गोड काय चंद्रकोर दिसतसे पहा !
पहांटेची वेळ किती रम्य ही अहा ! ॥ ध्रु० ॥
नेसलि कीं पूर्वदिशा शालु हा निळा !
मुक्तालंकार शिरीं, काय ठेविला !
(चाल) रूपवती नवरि बघुनि वरुण हर्षला !
पक्षिसंघ अजुनि नसे स्वगृहिं ऊठला,
आम्रवृक्ष फुलुनि बहुत नम्र जाहला,
(चाल) निंब असुनि कटुहि मधुर वास दाटला !
कृष्णपक्ष बहुत जनीं निंद्य मानिला,
निर्गुण तो प्रकट करी गुणहि चांगला,
( चाल ) नवल बघत कवन करित कविहि रंगला !

---

## ७. कै० डॉ० सौ० आनंदीबाई जोशी !

### पद.

चाल—सगुण गुणमाया—

दुर्धर घाला अजि पृथिवीवरि हा पडला ! ॥ ध्रु० ॥
सदयकरें सिंचुनियां केली, वृद्धिंगत जी अभिनव वल्ली.
मधुर अशा कलिकांनीं फुलली, वारा आला ! १

आनंदाचा घट कीं भरला, दुर्लभ गुणगण शोभावि ज्याला,
भुवनिं न दुसरा ऐसा दिसला, फुटुनी गेला ! २
जेथें आधिच रत्नें नसती, प्रारब्धें ती परि रत्नसती,
प्राप्त अज्ञांतें झाली होती, घातचि झाला ! ३
असार संसृति आतां झाली, हृदयचंद्रिका अजि मावळली,
मृत्युराहुनें खासचि गिळिली, देश बुडाला ! ४

---

## ८. संशय तूं मनिं न धरीं !

### पद.

चाल–काय मला भूल पडलि—

संशय[१] तूं मनिं न धरीं आजि सुंदरी,
मूढमति भ्रमलों मी, तरि कृपा करीं. ॥ ध्रु० ॥
हालविती हृदयलता करवि मोहिनी,
प्रेमभरें हृदय भरे पूर्विंपासुनी,
कोमलसा प्रसव अल्प घेति खोडुनी,
तत्फल तरि तुजसि टाकि सर्व अर्पुनी, १
मुरली मम गात नसे आज ही जरी,
हृदयांतिल अभिनवशी प्रेममाधुरी,
मजवरि विश्वास तरीं सुतनु गे धरीं,
असली तूं सौख्यखाणि काममंजरी. २
मधुप जसा भ्रमत असे तो वनोवनीं,
गुंजारव करित फिरे लुब्ध होउनी,
कलिका परि बहुत तया आवडे मनीं,
मिळतां अशि गुंजारव देइ सोडुनी. ३

---

## ९. वासंतिक बालचंद्र.

### पद.

चाल–वैशाखमास वासंतिक समय–

हा बालचंद्र[२] शीतांशुक उदय पावला,
निद्रावश जनसमूह सकल जाहला ॥ ध्रु० ॥

---

१ ‘Oh ! doubt me not,’ या टॉमसमूर कवीच्या चुटक्यावरून. २ ‘The young May Moon in beaming love,’ या टॉमसमूरच्या कवितेचें रूपांतर.

सखि ! ऊठ ऊठ हर्ष थोर होय सृष्टिला,
अति रम्य शांत मधुर सत्य समय पातला,
वनराजिमाजिं करुं विहार वाटतें मला, १
जरि सर्व विश्व हो प्रसुप्त शुक्र गे पहा,
जणुं सर्व तारकांस नेत अस्तगिरिस हा,
सखि साधुं साधुं थोर लाभ आजिचा अहा ! २
तरि ऊठ ऊठ, रवि न वरति येइ जोंवरी,
मम नेत्रतारकाचि तूं न उठशि गे जरी,
समजेल तोहि शुक्र तुजसि आपुली तरी, ३
मग ऊठ होइं जागि शीघ्र रात्र संपली,
अति अल्प आयु, सुखद रात्र ही न भोगिली,
तरि काय मौज सृष्टिमाजिं सांग राहिली ? ४

---

## १०. कन्येचें स्मरण.

### पद.

चाल— सगुण गुणमाया, आली कोलाटिण—

कठिण अतिमाया, ह्मणती ते लोक न वाया. ॥ ध्रु० ॥
चंडकिरण तो पूर्वदिशेला,
सागरगिरिवर गरगर चढला,
ग्रीष्में पीडित कवि जों बसला,
बकुलाखालीं, शीतल घनछाया रुचली. १
कां हा कंठ असा ये भरुनी ?
निष्कारण कां जल हें नयनीं ?
आवडत्या दुहितेच्या स्मरणीं,
सहसा झालें, कां इतुकें हृदय भुकेलें ? २
प्रेम जिचेवर मम अनिवार,
स्मरण तियेचें वारंवार,
होउनि दुःख गमे मनिं फार,
सासरिं गेली, वर्षाची भरती झाली ! ३
येथें होती ती गत सालीं,
या आश्रमिं या बकुलाखालीं,
रामजयंती प्रेमें केली,

देउळ रचिलें; सर्वांनीं कौतुक केलें. ४
‘ कोण करिल हो रामजयंती,
येत असे जी जवळ जवळ ती, ’
सकलहि तरुवर हें मज पुसती;
‘ अजुनि माईला, आणिलि न कां माहेराला ? ’ ५
प्राशितसे सांप्रत तज्जननी
रामाचें चरितामृत नमुनी,
सन्निध असती ती या सदनीं,
भक्तिरसाला, तोटा तरि नसता पडला. ६
परिकर शुभ्र मनोहर नेसुनि,
गजाननाची मूर्ती करुनी,
पूजिसि सुंदर पद्यें गाउनि,
स्मरतें आतां, करिसी जे कुमरी असतां. ७
ती तव भाविक मोहक मूर्ती,
भक्तिरसाची शुद्ध विभूती,
बाल्यापासुनि सन्निध होती,
खचितचि आहे, परक्याचें धन कन्या हें. ८

---

## ११. कन्याविरहस्मरण.

### पद.

चाल—उद्धवा शांतवन कर जा—

कां डोळे भरुनी आले एकाकी तुमचे ताता ? ॥ ध्रु० ॥
यापरि ती धाकुटि माझी स्थिति पाहुनि बोले जेव्हां,
सांगणें खरें तें तिजला प्राप्तचि मज झालें तेव्हां,
‘ सत्यं वद ’ आज्ञा श्रुतिची भंगावी नच ती केव्हां,
( चाल ) वदलों मी यापरि तिजला, स्मृति झाली गे अजि मजला,
प्रिय बाले कथितों तुजला, दुःखद अति घडली वार्ता. १
होती तव ज्येष्ठा भगिनी सोडुनि ती आह्मां गेली,
वर्षत्रय आजचि झालें परि दृष्टिस नाहीं पडली,
दुसरा कीं जीवचि वाटे सर्वां प्रिय इतुकी झाली,
( चाल ) अंबरिं कीं कोर विधूची, मूर्तिच वा सत्त्वगुणाची,
शारदाच भूलोकींची, नेई तो हरुनि विधाता ! २

ती समोर भिंतिवरी गे भगिनीची प्रतिमा पाहीं,
सन्निध तुज बसवी प्रेमें कांति जिच्या नुरली देहीं,
भासियली चंद्रकला ती राहूनें तेविं दिसे ही,
( चाल ) रात्रंदिन रोग बळावे, धैर्यानें दुःख गिळावें,
रतिभरहि न अन्न जिरावें, मृत्यु गमे तिजला त्राता ! १
प्रभुनें ज्यां दिधली होती निजधामीं त्यानें नेली,
संतांनीं यापरि माझ्या जीवाची समजुत केली,
परि चंचल वेडें मन हें अजुनिहि त्या शांति न आली,
( चाल ) ज्ञानाच्या गोष्टींनींही, हृदयीं हो बोध न कांहीं,
मज वाटे कीं तळमळ ही, कर्माची दुर्धर सत्ता !

---

## १२. बालकाचें पहिलें विरहदुःख.

### पद.

चाल—अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला—

प्रियबंधूच्या आठवुनी विरहाला, बालक तो विव्हल झाला. ॥ ध्रु० ॥
कुणि बोलावा त्या माझ्या भाऊला, मजसंगें खेळायाला,
कां सांगाना भाऊ कोठें गेला, स्तब्ध असे कां बसलां ?
( चाल द्रु. ) दसरा तो येइल आतां,
घोड्याच्या माळेकरितां,
बागेमधिं अपुल्या जातां,
त्या झेंडूच्या इडकिल कोण फुलाला ?
जीं लावियलीं फुलझाडें दोघांनीं, गेलीं तीं सर्व सुकोनी,
मज वाटेना कीं घालावें पाणी, या एकट्याच हातांनीं,
( चाल द्रु. ) लावुनियां सुंदर वेलां,
जाईचा मंडप केला,
दिपवाळिस नामी किल्ला,
त्या भाऊनें माझ्या हो बांधियला ! २
प्रिय बाळा तूं आतां रडसी वायां, गेला तव भाऊराया,
तें पुनरपि रे सुंदर मुख या ठायां, नच मिळेल तुजसि पहाया,

---

१ मिसेस हेमन्स या कवयित्रीच्या 'The child's first grief' या चुटक्यावरून.

(चाल दु.) होता तो गुलाब जैसा,
आनंद मूर्तिमान् ऐसा,
अल्पायुष करुनी कैसा,
त्या देवानें निजगृहिं भाऊ नेला ! ३
मग मारितसें व्यर्थचि हांक तयाही, सोडुनि कीं खेळणिं जाई,
ती खेळाची मौज पुन्हां नच येई, सांग गे खरें कीं आई !
(चाल दु.) तें ओढ्यावरलें फिरणें,
तें राईमधलें रमणें,
आतां तें सुख नच मिळणें,
तो असतां कां प्रेमा अधिक न केला ? ४

---

## १३. प्रातःकाळ.

### श्लोक.

प्रातःकाळीं उपवनिं दिसे रम्य शोभा तरूंची,
चारी तेव्हां उमलुनि दिशा कांति भासे रवीची;
पानें सारीं चमकति किती रात्रिच्या त्या दंवानें,
मोत्यें नेणों पसरुनि दिलीं सृष्टिच्या नायकानें ! १
जलाच्या बिंदूंची रचिलि जणुं माला बहुसुरें !
जगाच्या कर्त्याची कृति अखिल जीवास सुख दे.
चिदानंदाच्या त्या बघुनि हिरवे पादप कृपें
जणों आनंदानें धरणिवर ते गाळिति टिपें ! २
सकाळीं कारंजीं उडत असतां शीतळ हवा,
तशीं पुष्पें होतीं विकसित, सुगंधें डुलति वा;
तयांची त्या कालीं विलसति पहा हास्यवदनें.
जनाच्या चित्ताला रमविति अनेकाख्य सुमनें. ३
माळी सुमाला करण्यास वेंची, पुष्पें भुईच्या वरलींच साचीं.
किंवा करानें सुमगुच्छ तोडी, ज्याची दुज्या वस्तुस ये न तोडी. ४
'झाडांनीं मधुर फळें बळें धरावीं, भारानें नमुनि उपासना करावी,'
ऐसे ते विहग तरा तरूवरोनी, गुंजातें करिति सकाळ कीं स्मरोनी. ५
आंब्याचे तरुगण फूल फार झाले, मोहोरा रसमय पाहि पक्षि डोले,
त्यांमध्यें स्वर मग गोड कोकिळांचा, होई तो श्रवण करूनि हर्ष साचा.

अकबरकाव्य.

## १४. महालाचें वर्णन.

श्लोक.

वाड्यांत सुंदर असे नृपराजयाचें, मंदीर वर्णन न हो करवे जयाचें,
लक्ष्मी प्रसन्न असुनी करि वास जेथें, राहे उणीव कसली मग सत्य तेथें ? १

महाल नारायणराव यास, शोभे तसा तन्नवयौवनास,
प्रत्यक्ष आनंद करी स्ववास, ऐसें गमे जेथ सदा जनांस. २
सहस्र कारागिर त्या स्थळास, अनेक वर्षें करुनी प्रयास,
समस्त चातुर्यबळें सुशोभा, देती अशी अप्रतिमा यशोभा. ३
कनकवर्ण मनोज्ञ चक्राकृती, बहुत यक्तिरुणें मग फांकती,
किति विलक्षण हें चमके रुपें, धन अहा गणती न किती खपे ! ४
विलसणार सुरम्य रमापति, ह्मणुनि लक्ष कुबेरच मापती,
सतत तेथ मनोहर वा सती, जणुं रमा ह्मिजुनी करि वास ती ! ५
समांतरें स्तंभ उभे पहा हे, नक्षींत पक्षीजनसंघ राहे;
वनांतुनी येति जणों घरा हे, ऐसें गमे प्रेक्षक यास मोहें. ६
सकल वृक्ष अहा सुरुचे कसे, रुचिर रंग तयां हिरवा असे;
मधुनि राघु मनोहर कोरिले, जणुं जिवंत धरोनिच ठेविले ! ७

भिंतीवरी कसब दाविति ते चितारी, चित्रें विचित्र बहु काढुनि चित्तहारी,
प्रत्यक्ष सर्व सजली जणुं सृष्टि अन्य, ऐसे गुणी करिति वास पुण्यांत धन्य.
हा जानकीसह बसे रघुराज येथें, वांके कपींद्र हनुमान् दृढभक्ति येथें,
ते दुःखभागि वनिं पांडव शोभतात, तो धर्ममूर्ति विलसे मनिं फार शांत. ९
ती द्रौपदी, नकुल तो, सहदेव पार्थ, तो वीर सुंदर धनुर्धर भीम सार्थ,
तें घोर रान, अति उंच विशाल शैल, जें पांच बैसति अहा वनवासशील!१०

बसे रुक्मिणीही बसे सत्यभामा, स्वयें सेविती प्रीतिनें सर्वकामा,
वनीं कृष्णजी शौर्यशाली विराजे, स्वयें धेनु चारी, मुखीं वेणु वाजे. ११

दयार्द्र नारायण शेषशायी, लक्ष्मीसवें त्यावरि दृष्टि जाई,
समुद्रकन्या हरिच्या पदातें, सेवीतसे जो हरि आपदातें.' १२

अशी चित्रमाला असे त्या महाला, घडावेंचि कीं सौख्य नारायणाला,
महाभक्तिनें नित्य चित्रें पहावीं, न खंती परी जोडण्याला गमावी. १३

श्री० नारायणराव पेशवे यांचा वध.

---

## १५. कृष्णाकुमारीचा जन्म, बाल्य आणि तारुण्य.

श्लोक.

असो यापरी काळ जों जाय कांहीं, तया पट्टराणीस तों गर्भ राही,
क्रमानें तिची वाढली रम्य कांती, नऊ मास ते शेवटीं पूर्ण होती. १

भीमाची ती प्रसवलि पहा कन्यकेलागिं कांता,
झाला तो कीं समय सकलां भूरिसंतोषदाता;
होतें स्वच्छ प्रखरकिरणव्याप्त आकाशही तें,
वायू मंद भ्रमण करुनी हर्षवी मानसातें. २
श्रम न पडति मोठे तीस होतां प्रसूत, त्वरित मग नृपाला सांगण्या येति दूत,
ह्मणति तुज नृपाला जाहली कन्यका हे परि सकल अपत्यांमाजि ती रत्न आहे
वच परिसुनि हें तो भीम हो हर्षयुक्त, कठिणहि मन त्याचें जाहलें प्रेमसक्त,
जनक जरि कितीही निष्ठुर क्रूर आहे तदपि हृदयिं ऐशा काळिं वात्सल्य राहे
अपत्यें भीमातें जरि बहुत होतींच दुसरीं,
न कृष्णेची येई सरि किमपि एकासहि तरी;
पहा तीं नक्षत्रें चमकति शशीच्या सम कशीं ?
फिकीं होती सारीं विरमति तया पाहुनि जशीं ! ५
आकाशांत असंख्य नित्य दिसती तारे प्रभावान ते,
कांहीं ते अति थोर, तेज इतरां अत्यल्पसें भासतें;
त्यांमाजीं उदयास ये न शशि जों तों सर्व कांहीं बरीं,
चंद्राच्या उदयीं समस्त दिसतीं निस्तेज कीं अंबरीं ! ६
स्वरूपानें होती नृपतिदुहिता उत्तम जशी,
स्वभावें भावंडें सकल जणुं ती जिंकिहि तशी;
तिच्या शब्दांमध्यें सहज अति माधुर्य भरलें,
जनाचें तें तेणें मन सुदतिनें नित्य हरिलें. ७
बोले बाला बोबडे बोल गोड, नाहीं साऱ्या भूवरी त्यास तोड,
ऐकोनी ते अंबिकेच्या मनाला, आनंदाचा पूर कीं थोर आला. ८
ती बालकन्या रमणीय वाटे, तें हास्य तीचें किति गोड दाटे !
तें बाळसें शोभवि गाल रम्य, बाला गमे सर्व जनास काम्य. ९
द्यावे मुके या किति बाळकाचे? उद्गार ऐसे निघती मनाचे,
होई कधीं तृप्ति न त्या सुधेनें, तैशीच त्या बालकचुंबनानें. १०
तें पाहुनी शुभ्र तसें विशाळ, त्या सुंदरीचें रमणीय भाळ,
वाटे विधीनें लिहिलें असावें, जें जें पुढें कीं तिजला घडावें. ११
अति लहान सुरेख शिशू असें, जरि पुढें नयनीं पडलें दिसे,
न इतुकी जगतींत मनोहर, इतर वस्तु गमे तरि सुंदर. १२
बघुनि रम्य पदार्थ मनास हो, द्रव न ये तरि तो नर काय हो ?
सहज हर्ष तया नुपजे जरी, हृदय मानवि त्यास नसे तरी. १३
लवकर सदा चालाया ती शिके जननीसवें,

खुळ खुळ तिच्या पायीं वाळे विराजित त्या रवें,
विविध करितां क्रीडा बाला गृहांत जशी रमे
जननिस तिच्या ‘ धन्या आहें ’ असें हृदयीं गमे. १४
‘ खचित न असे धन्या माता मदन्य जगावरी
सकल, अथवा आहे मोठी तुझी करणी हरी ! ’
निघति असले त्या भैमीच्या मुखांतुनि शब्द ते.
सुख मग तिला चित्तामध्यें अपूर्वचि भासते. १५
असो काळ जातां पुढें थोर झाली, तशी कांतिही वाढतां दिव्य झाली;
नभीं चंद्र जैसा कला भिन्न दावी, जशी कोंवळी वेल किंवा फुटावी ! १६
ती बाललीला सरतां मुलीची, तीं खेळणींही सुटतात सांचीं,
तारुण्य जों जों उदयासि येई, तों तों मुखश्री रमणीय होई. १७
मधुर सुंदर गोड असे गळा, शिकवि तात तिला विविधा कळा,
सरळ तें मन फारच शोभलें, सुखवि अन्यजनांप्रति जें भलें. १८
सरळ नासिक भाळ सुनिर्मळ, मुख असे स्मरणीय सुकोमल,
मुरकली, रुसली, हंसली तरी, हृदय विंधुनि टाकि परोपरी ! १९
किती थोरवी ती गमे तन्मनाची, असे मान भारी तरी लाज साची,
किती सौम्य मुद्रा किती प्रौढता ती, किती त्या शरीरीं वसे गोड कांती. २०
आधींच देहीं गुणसंनिवेश, त्यांतून तारुण्य, मनोज्ञ वेश,
कटाक्षपातें निज सुंदरांगी, ती प्रेक्षकाची धृति शीघ्र भंगी ! २१
जननि हौस करी सगळी पुरी, अति असे ममता तनुजेवरी,
सुतनु नेसतसे वसनें किती, नवनवीं करवे न तयां मिती. २२
कधि गुलाबि मनोहर पातळ, कधि गुलाबि गमे मग निर्मळ,
कधि मनोहर चौकटि तांबडें, कधिंहि चंद्रकळा तिज आवडे. २३
मंद वायु हलवी जसि वेल, तेंवि यौवन करी तिस लोल;
दृष्टिपात अतिदुःसह लीला, वर्णवे नच समस्त कवीला. २४

कृष्णाकुमारीकाव्य.

---

## १६. कृष्णाकुमारीचा अंत !

### श्लोक.

कुसुंब्याचा काढा त्वरित मग त्यांनीं करविला,
अफूच्या अर्काचा रस बहुत मध्यें मिळविला;
स्वदासांच्या हातीं पुनरपि कुमारीप्रति दिला
तिनें तोही हर्षें स्वकरकमलामाजि धरिला. १

याचा तरी लवकरीं परिणाम होवो, हा जीव सत्वर विभो तनुतूनि जावा.
आतां नको उगिच अंत मदीय पाहूं, कोणावरी तरि दुजावरि भार वाहूं ? २

गीति.

प्रार्थी कृष्णा तेव्हां यापरि देवासि हास्यवदनानें,
झटकर मग तो पेला स्वकरानें घेऊनी मुखातें ने. ३

पिउनि सकळ काढा मृत्युची वाट पाहे, पुनरपि विभुचें ती नांव सानंद वाहे;
ह्मणुनि भजन ऐसें ती करी भक्तिभावें, मरणसमय येतां राम हें नांव यावें. ४

'निराश्रित गरीब ही प्रभु तुझी स्वदासी असे,
कळून न कळून जें बहुत पाप केलें असे;
क्षमा करुनि आगळें, परम लोभ दावा हरी !
दयाब्धि ! पदरांत घ्या जरि अयोग्य आहे तरी. ५

माझी आई तूंच आहेस रामा ! तैसा माझा तातही पूर्णकामा !
त्वन्नामाच्या जो करी ना विरामा, पावे कैसा तो तुझ्या पुण्य धामा? ६

उपायें अंतींच्या लवकरि न ये मृत्युविपदा,
दहा अंगाचा तें विष करि तिच्या फारच तदा;
न साहे ती तीतें मृदु बहुत तीची तनु असे
गुलाबातें पाणी कढत करितां सिंचन जसें. ७

कुटुंब्याच्या काढया ! कुसुमसुकुमारीवरि कसा
तुझा चाले जोरा, वद मज शठा ! फार सहसा;
तुवां केली नाहीं सहृदयहृदयें तीवरि दया !
न जाते या वेळीं सकलहि तुझे दुर्गुण लया ? ८

जसजसें भिनलें विष अंतरीं, तसतशी कुमरी बहु बावरी;
व्यथित मूर्च्छित होउनि सत्वरीं, कदलिशी पडली धरणीवरी! ९

हळु हळु हळु जाई तेज कृष्णामुखाचें !
प्रथम सदन होतें जें जनाच्या सुखाचें;
अहह ! तनुवरी तो पालटे रंग सारा,
नव करुणरसासी लाधला तेथ थारा ! १०

---

## १७. जननीचे अश्रु.

श्लोक.

कवळुनि हृदयासी प्रीतिनें माय बोले,
'वदसि न मजसीं कां सांग गे सांग बाळे !

रुसुनि मजवरी त्वां झांकिले नेत्र काय ?
कठिण मन तुझें हें वाटतें, हाय हाय ! १
कधिहि न सखये, त्वां मोडिला शब्द माझा,
जरि न पुरविला मीं छंद कांहींच तुझा;
घडत सतत ऐसें आजपर्यंत जातां,
श्रवण करिसि कैसी मातृआज्ञा न आतां ? २
तुझे सोहोळे मीं मुळि पुरविले नाहित मुली !
न या नेत्रांनीं गे अजुनि तव सौख्यें बघितलीं !
कसा एकाएकीं तुजवरि वदें मृत्यु गुदरे ?
जगीं माझें आतां सुख तुजविणें सर्वहि सरे. ३
पडतिल कसे कानीं माझ्या मनोहर शब्द ते ?
वदशिल अतां 'आई !' ऐसें कुणासि बरें सुते ?
क्षणभरि मशीं आनंदानें सहास्य उठोनियां
वद मधुरशा शब्दांनीं, गे पहा जननीस या. ४
त्वरित अवघ्या, कृष्णे ! तृष्णेप्रती कर गे पुरी,
स्मरण मजला येतां जातां घडेल तुझें तरी;
विनवित असे माता आतां न तूं करिशी दया,
तरि जननि ही नाहीं राजी जगांत रहावया. ५
मांडीवरी ज्या तुज घेतलें मीं, बैसूनि तूं बोलसि बोल नामीं,
अंकावरी त्याच तुला असा हा, नेई कसा काळ मुली अहाहा ! ६
आनंदपूर्ण नयनें तुज पाहिं जेथें
दुःखाश्रु ढाळित असें विनवूनि तेथें !
कां कोपला मजवरी प्रभुराय ऐसा ?
येई तुलाहि सहसा बहु रोष तैसा !' ७
गतजीवित आत्मजा जरी
पडली काष्ठसमान भूवरी,
तरि चुंबन घे वरीवरी !
न सुटे प्रेम ! विमूढ तें करी ! ८

कृष्णाकुमारीकाव्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

# विद्याधर वामन भिडे.

जन्म—इ. स. १८६१.

रा. विद्याधर वामन भिडे, बी. ए., यांचीं मुद्रित व अमुद्रित काव्यें पुढें दिल्याप्रमाणें आहेत. ज्यांच्या नांवाच्या पुढें अशी* खूण आहे तीं काव्यें अमुद्रित आहेत.

१. विरक्तवाणी. २. धेन्वास्यशास्यता. ३. राघवीय परीवाह. ४. वंद्यावंद्य* ५. वेलावेदन. ६. काककाणता* ७. कीरकार्तघ्न्य.* ८. स्मारकसारता. ९. प्रसूपय* १०. विसंवाद* ११. कबंधबंधना. १२. लज्जालज्जा. १३. वृषवृषा. १४. सुंदोपसुंद. १५. विंध्यवंदना. १६. विचित्रचंडी. १७. दक्षदुर्गीति. १८. तुरंगरंजना.* १९. यास्कयांचा २०. करालकरवाल. २१. स्त्रीसौभाग्य* २२. वचनवंचना* २३. इलाविलाप* २४. पापात्मपदवि. २५. दंडदंडना* २६. जडजंबाल. २७. पुण्यात्मपदवी. २८. चित्रचातुरी. २९. तंतुवायनिकाय. ३०. श्रीशारदा* ३१. मदमाधुरी* ३२. सौमतेयसमुद्धार. ३३. शंकातंक.* ३४. जिताजित.* ३५. मेषपेषण. ३६. पक्वपंडित. ३७. शिबिसौहार्द. ३८. विज्ञानवैयर्थ्य* ३९. रथरूपक* ४०. पापपंक्ति* इ. इ. इ.

## १. विन्ध्यवन्दना.

एके काळीं विन्ध्यपर्वताला मेरुपर्वताच्या ऐश्वर्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला. चंद्रसूर्यादि ग्रह मेरूसभोंवतीं प्रदक्षिणा करतात, असल्या प्रकारचें महत्त्व आपणास नाहीं याबद्दल त्याला अतिशय वाईट वाटूं लागलें. त्यानें चंद्रसूर्यांस सांगितलें कीं, तुम्ही मेरूसभोंवतीं प्रदक्षिणा करतां तशी माझ्या भोंवतीं करा. त्यांनीं सांगितलें कीं, सृष्टि निर्माण करणारानें जो क्रम आह्मांस लावून दिला आहे, त्याचा अतिक्रम आह्मांस करतां येत नाहीं. या उत्तरानें विन्ध्य अतिशय क्रोधयुक्त झाला. त्यानें या गोष्टीबद्दल सूड घेण्याचा निश्चय केला. त्यानें आपलें मस्तक उंच करण्यास आरंभ केला. शेवटीं तें आकाशांत इतकें उंच गेलें कीं, त्यानें चंद्रसूर्यांच्या गतीचा रोध करून

रात्रि व दिवस यांचा क्रम बिघडवून टाकला व त्यामुळें मुनिजनांच्या धर्मक्रियांचा लोप होण्याची पाळी आली! चंद्रसूर्यांच्या गति अवरुद्ध झाल्यामुळें त्रिभुवनांत जिकडे तिकडे अनर्थ उत्पन्न झाला. शेवटीं देव व ऋषि त्याच्याकडे गेले व त्यांनीं त्याची प्रार्थना केली कीं, असा उपद्रव तूं देऊं नको. पण तो कांहीं केल्या ऐकेना. पुढें ही सर्व मंडळी त्याचा गुरु **अगस्त्यमुनि** त्याजकडे गेली व तिनें 'विन्ध्याचल आपला शिष्य आहे. प्रस्तुत त्यानें लोकांना उपद्रव देण्याचें कृत्य आरंभिलें आहे, तें त्यानें न करावें याविषयीं बोध करणें आपणाकडे आहे,' अशी त्याची प्रार्थना केली. तेव्हां **अगस्त्य** **विन्ध्याचलाकडे** गेले. **विन्ध्याचलानें** आपले गुरुजी आलेले पाहून त्यांस साष्टांग नमस्कार घातला. असें पाहून त्यास **अगस्त्य** ह्मणाले, 'आह्मीं दक्षिणेकडून परत जाऊन येतों तोंपर्यंत असाच ऐस.' इतकें बोलून **अगस्त्य** दक्षिणेकडे गेले ते गेलेच, व **विन्ध्य** हा तेव्हांपासून दंडवत् पडला आहे तो तसाच आहे! हा पडल्यामुळें **चंद्रसूर्यांच्या** गतीचा झालेला रोध मोकळा होऊन देव, ऋषि, राजे आणि प्रजाजन या सर्वांस सुख झालें. ही पौराणिक कथा या कवितेचा विषय आहे. हिचें तात्पर्य कवीनें शेवटच्या श्लोकांत ग्रथित केलें आहे. **विन्ध्यानें** **अगस्त्याला** वंदन केलें ह्मणून या काव्याचें नांव **विन्ध्यवंदना** असें कवीनें ठेविलें आहे.

### श्लोक.

मेरुशैलविभवांस[1] देखुनी, मत्सराकुलमनस्क[2] होउनी,<br>
शैल जें स्वगत[3] विंध्य बोलला, तें समग्र वच आयको भला. १<br>
"नित्य मेरुशिखरासभोंवतीं, सूर्यचंद्र दिनयामिनीपती[4],<br>
हिंडती करुनि दीर्घ चंक्रमें[5], तेंचि वैभव असो न कां मम? २<br>
मेरुचेपरि विशाल मी खरा, दावितों अतुल मीच विस्तरा;<br>
मी उणा न लव तुंगतागुणें[6], स्थैर्य मामक तयाहुनी दुणें.<br>
उंच उंच तरु मत्तटावरी, क्रीडनोचित विशाल महरी;<br>
देव येति विहरावयास्तव, कीं तयांस मम हृद्य[7] वैभव. ४<br>
मत्प्रपात अति शुभ्र विस्तृत, येथ गाति खगवृंद[9] संतत;

---

१. मेरुपर्वताचें वैभव. २. मत्सरानें ग्रस्त झालें आहे मन ज्याचें. ३. आपल्याशीं. ४. दिवस आणि रात्र यांचे स्वामी. ५. वाटोळे फेरे. ६. उंचपणा ह्या गुणामुळें. ७. आवडणारें. ८. माझे धबधबे. ९. पक्ष्यांचे थवे.

क्षेत्रवृंदरुचिरा[1] अधित्यका[2], शोभती तरुगणें उपत्यका[3]; ५
मानितंब[4] तरुंनीं मनोहर, श्रेष्ठ मानिति मलाच निर्जर[5];
मेरुहून अधिका मदुच्चता, मेरुहून अधिका विशालता, ६
मींच मेर्वधिक मानभाजन[6]; योग्य सत्य मजला सभाजन[7];
योग्यतेस अनुरूप आदर, नाढळे भुवनिं या खरोखर. ७
पक्षपात करिती विधू[8] रवी, नाणितां मनिं मदीय थोरवी;
केंद्र[9] तद्भ्रमणिं मेरु तो जसा, मी गुणाधिकहि त्यां न कां तसा ?" ८
बोलला स्वगत विंध्य यापरी, क्रोध मत्सर जळे तदंतरीं;
चंद्रसूर्यकृत मानभंग हा, विंध्यचित्तिं शरसा सले अहा ! ९
क्रोधनष्टशम[10] तो महीधर. चिंति पीडनविधी भयंकर;
क्रोध दारुण कुणावरी तरी, काढितां शम खलास अंतरीं. १०
द्यावया त्रिभुवना उपद्रवा, तो सजून गिरि विंध्य तेधवां
उंच, उंच, अति उंच जाहला, व्योमिं[11] शीर्ष[12] खुपसूनि ठाकला ! ११
स्वर्गरंध्र[13] सजला करावया, पावले सुर तदा महाभया;
तारकापथ निरोधिल्यामुळें, थोपलें रविसुधांशु हें जुळें. १२
यामिनीदिवसभेद[14] लोपला; एकरूपगुण[15] काल जाहला;
हा अनर्थ भुवनांत माजला, सर्व लोक अतिमात्र[16] गांजला. १३
कालभेद सगळा विलोपतां, धान्यवृद्धि खुटलीच तत्वतां ;
श्रौतकर्म[17] अवसन्न[18] जाहलें, स्मार्तकर्महि[19] लयास पावलें, १४
स्तंभनस्थगित[20] विश्व जाहलें, विंध्यपर्वतकृतें अशा छलें;
देहि[21] एक नव्हता सुखी तदा, ती अतीव भयदायि आपदा. १५
स्तंभनात्मक अनर्थ हा असा, जाहला भयद देवमानसां;
यक्ष, किन्नर, तसे बिलेशय[22], भूत सर्व अति पावले भय. १६
विश्वसंकटनिवारणास्तव, देव सर्व जुळले सवासव[23];
ते अगस्त्यमुनिचे कडे तदा, पातले, शरण जो जगा सदा. १७

---

१. शेतांच्या समुदायांमुळें शोभायमान. २. डोंगराच्या माथ्यावरील जमीन. ३. डोंगराच्या पायथ्याजवळील जमीन. ४. माझे मध्यभागावरील कडे. ५. देव. ६. संमानाला पात्र. ७. पूजा, अर्चा. ८. चंद्र. ९. मध्यबिंदु. १०. रागामुळें नाहींशी झाली आहे शांति ज्याची. ११. आकाशांत. १२. डोकें. १३. स्वर्गाला भोंक. १४. रात्र आणि दिवस ह्यांच्यामधील पृथक्पणा. १५. सारखे आहेत गुणधर्म ज्यांचे. १६. अतिशय. १७. वेदांत सांगितलेलें कर्म. १८. बंद पडलेलें. १९. स्मृतींनीं करावयास सांगितललें कर्म. २०. थांबलेलें; अडून राहिलेलें. २१. प्राणी. २२. साप. २३. इंद्रासहित.

त्या मुनिप्रति समान[1] वंदिलें, विश्वसंकट तयीं निवेदिलें;
त्यांचिया भयविषण्णमानसा[2], तोचि साधु गमला शरण्यसा[3]. १८
बोलला मुनि अगस्त्य सामरा[4], शांतिदायक वचा पुरंदरा[5];
" विंध्यशैलकृत मी अनर्थ हा, वारितों क्षण न लावितां पहा. १९
विंध्य हा नमवितों पहा कसा! भी[6] शिवो तुमचिया न मानसा;
देव हो! परत जा निजालयां, नम्रता धरवितों नगा[7] तया. " २०
वाक्य हें सुरपतीस बोलुनी, तो निघे यमदिशेकडे[8] मुनी;
मार्ग चालुनि तया महाचला[9], शीघ्र येउनि अगस्त्य पोंचला. २१
देखतांच मुनिला महीधर[10], स्वीय तो नमवि शीर्ष[11] सत्वर.
ब्रह्मवर्चसविभाविकस्वरा[12], न द्विजा कवण दावि आदरा? २२
पाहुनी प्रणत विंध्य भूधर, जाहला घटज[13] हर्षनिर्भर[14],
बोलला मग तयास तो मुनी " श्रेष्ठ तूं सकलही नगांहुनी. २३
नम्रतागुण बघूनि तावक, जाहलें मुदित[15] चित्त मामक,
रत्नसानु[16] न सुवर्णभूधर[17], श्रेष्ठ मेरु गणवे खरोखर. २४
चंद्रसूर्यगतिकेंद्र तो असो, देववृंदहि तयावरी वसो;
तो तुझेहुनि मला गमे उणा, दावि तो नग न नम्रतागुणा. २५
कार्यहेतु[18] मम दक्षिणेकडे, यान हें क्षितिधरोत्तमा[19]! घडे;
हेतु तो मम कळेल तेथला, तोंच येइन फिरोनि या स्थला. २६
जोंवरी परतलों न या स्थला, तोंवरी अस असा महाचला!
शीघ्र मी फिरुनि येथ येइन, त्वन्महत्त्वकर आशि[20] देइन. " २७
त्या नगा वदुनि वाक्य यापरी, त्यास हर्षवुनि फार अंतरीं,
दक्षिणेस मुनि शीघ्र चालिला, विंध्यही प्रणतमूर्ति[21] राहिला. २८
दक्षिणेसचि अजूनि तो वसे, विंध्यही नत अजूनि हा असे!
घोर संकट असें निवारिलें, विश्व सर्व सुखशांति पावलें. २९

---

१. अति मानानें. २. भीतीनें खिन्न झालेल्या अंतःकरणास. ३. आश्रय मागण्यास योग्य. ४. देवांसहित असलेला अशा. ५. इंद्राला. ६. भीति. ७. पर्वताला. ८. दक्षिण दिशेकडे. ९. मोठ्या पर्वतास. १०. पर्वत. ११. डोकें. १२. ब्रह्मतेजाच्या तेजानें शोभणाऱ्या १३ अगस्त्य. १४. आनंदानें पूर्ण. १५. आनंदित. १६. रत्नें आहेत शिखरावर ज्याच्या असा. हें मेरूचें एक नांव आहे. १७. सोन्याचा पर्वत, हेंही मेरूचेंच नांव. १८. कार्यासाठीं. १९. हे पर्वतश्रेष्ठा! २०. आशीर्वाद. २१. नमविला आहे देह ज्याणें असा.

चन्द्रसूर्यगतिविघ्न लोपलें, शस्यवर्धनाहि[1] योग्य चाललें.
पुण्यकर्म हतविघ्न[2] चाललें, सर्व लोक शम सौख्य पावले. ३०
‘ करील खलदण्डना[3] सुजनरक्षणा[4] कैतव[5],
तया न नय[6] जाणते काधिंहि दोष देती लव; ’
असें जनमनीं ठसो सुखद तत्त्व या हेतुनें
अगस्त्यकृति वर्णिली शुभफला उमासूनुनें. ३१
अगस्त्यमुनिचे पायीं जी झाली विंध्यवन्दना;
ती विद्याधर गाऊनी जनांच्या सुखवो मना. ३२

---

## २. विरक्तवाणी.

### श्लोक.

देशपर्यटन मी करितानां, भेटले मजासि पूरुष नाना,
भिन्नवृत्तिगुण भिन्नविचार, भिन्नवर्तनविलासविहार. १
भेटला मजसि साधु विरक्त, आत्मचिंतनविधींतच[7] सक्त;
शैलकंदरिं[8] करोनि निवास, राहिला त्यजुनि जो जगतास. २
भस्मचर्चित तदीय शरीर, भव्यदीप्तियुत[9] तो मुनिहीर[10],
तत्करीं मणिमयी जपमाला, तोषलों बघुनि मी भृशें[11] त्याला. ३
तत्पदावरि शिरा नमवून, भक्तिनें “ जय मुनींद्र ! ” म्हणून
बैसलों उचित मी मग ठाया. तेंच योग्य मज तेथ कराया. ४
मीं तयास पुशिलें “मुनिवर्या[12] ! तूमची अशि कशी दिनचर्या ?
क, तुह्मीं त्यजियल जग सांगा, लाविलें भसितें[13] कां निज आंगा ! ५
कां तुह्मीं उबगिलें[14] जगतास ? कां गुहेंत करितां वनिं वास ?
संसृतीस[15] विटलां तुह्मि कैसे ? कां वनांत बसतां तुह्मि ऐसे ? ६
कां विरक्ति तुमच्या मानें आली ? कां पराङ्मुख जगा मति झाली ?
लोपलें परकरस्थित[16] वित्त[17] ? का प्रियातनयमृत्यु निमित्त ? ७

---

१. शेतांचें वाढणें. २. नाहींसे झाले आहेत अडथळे ज्याचे. ३. दुष्टांना पारिपत्य करण्यासाठीं. ४. साधूंच्या रक्षणासाठीं. ५. लबाडी. ६. नीति. ७. आत्म्याचें चिंतन करण्याच्या कामीं आसक्त. ८. पर्वताच्या गुहेंत. ९. अप्रतिम तेज धारण करणारा. १०. मुनींमध्यें श्रेष्ठ. ११. अतिशय. १२. हे श्रेष्ठ मुने ! १३. भस्म. १४. कंटाळून सोडून दिलें. १५. संसाराला. १६. दुसऱ्याच्या जवळ रक्षणासाठीं ठेविलेलें. १७. द्रव्य.

कीं अकल्पित अकांक्षित झालें ? कीं मनोरथ फलासि न आले ?
कीं खळास अधिकार मिळाले ? कीं सुमित्र तुमचे व्यसु[1] झाले ? ८
कीं तुह्मास पिशुनें[2] बुडवीलें ? कीं मदांध[3] विभुनें[4] तुडवीलें ?
हें निवेदुनि करा मज तृप्त; मी भवचरणिं नम्र, न दृप्त. ९
हें निवेदन तुह्मा जर ताप, दे गतस्मरणजन्य[5] अपाप[6];
आवडे मज न तें परिसाया, मी तुह्मा श्रम न देइन वाया." १०
हें मदुक्त परिसोनि ह्मणाला, साधु तो " कथिन सर्व तुह्माला;
मी जगांत वसलों चिरकाल, देखिले पुरुष मीं बहुसाल. ११
लोकवर्तनपथास बघून, जाहलें हृदय मामक दून[7],
जाहलें मन मदीय विरक्त, मी अतां स्वपरिचिंतनसक्त[8]. १२
साधु होइ जगीं ज्या खलदास, न्याय्यवृत्ति[9] मिळवी उपहास.
मान ज्या जगिं मिळे अनृतास[10], त्या जगीं मज रुचे न निवास. १३
लोक मी त्यजुनियां अनुदार, भावुनी जग समस्त असार,
एकला करुनि येथ निवास, सेवितों स्वमननोत्थ[11] सुखास. १४
वाटतो मज नको जनसंग, कीं करी सतत तो शमभंग;
नीचता, कुटिलता मनुजाची, फार फार हृदया मम जाची. १५
लोक सर्वचि कृतघ्न जगांत, लेशही मज न संशय यांत,
लोभ मत्सर मदादि विकार, दुःख आणिति जगांत अपार. १६
दुष्टताविजय मानव वानी, बोलणें अनृत पाप न मानी.
स्वाभिमान उरला न जगांत, स्वार्थसाधक खला नमतात. १७
ब्रह्मदेववदनें जरि चार, एकरूपचि तदुक्त[12] विचार.
दुर्जना वदन एक तरी तो, वस्तु एक खलु चार करीतो ! १८
" सत्यमेव जयते[13]" ह्मणतात, किंतु सत्य जन नाचरतात.
गाति सत्यमहिमा जन सारे, किंतु तद्धृदयिं सत्य न थारे. १९
नीतिलंघन सदा करितात, लोक वक्र पथ आदरितात,
नीतिपालनपरां[14] हंसतात, व्यर्थ निर्बल नरा छळितात. २०

---

१. मृत. २. चहाडखोरानें. ३. समर्थ, श्रीमंत माणूस. ४. उद्दाम, गर्विष्ठ. ५. गत गोष्टींचें स्मरण झाल्यानें उत्पन्न होणारा. ६. आपोआप; साहजिकपणें. ७. पीडित. ८. आत्म्याचें चिंतन करण्यामध्यें गढलेला. ९. नीतीला धरून आहे वर्तन ज्याचें असा. १०. असत्यास. ११. आत्म्याच्या चिंतनापासून उत्पन्न होणाऱ्या. १२. त्यांनीं (चार तोंडांनीं) उच्चारलेले. १३. खऱ्याचाच जय होतो. १४. नीतीनें चालणाऱ्या माणसास.

अव्यवस्थित अनंगविकार[1], काय घोर करवी व्यभिचार !
भ्रष्ट तो करितसे नरनारी, दुष्ट एक जरि त्यांत नयारी[2]. २१
मर्त्य[3] मन्मथबळें कुमतीला, स्वीकरोनि फसवील सतीला;
भ्रंश तो जरि सती तरि पावे; भ्रष्ट मर्त्य; वच काय वदावें ! २२
मेळवोनि अणुमात्र निमित्त, क्रोध घोर[4] चळवी नरचित्त.
क्रोध पावुनि अमोघ विकास, भोगवी अतुल हानि नरास. २३
मानवा विसरवी धन नातें, वाटवी प्रिय न आस मनातें.
जे करी धन अघोर अनर्थ, ते वदों कवण होय समर्थ ? २४
जाळितात नगरेंहि धनार्थ, लोभलोलुप[5] अहो ! खलसार्थ[6];
त्यांसि काय नगरें सुविशाल ? त्यांसि काय जनदुःख कराल[7] ? २५
सोदरांस[8], पितरांस, गुरूंस, अल्प मानि खल तो जणुं तुसें[9].
नाश तो करि धनार्थ तयांचा, पाप तें मज वदेल न वाचा. २६
स्वार्थसाधक धना मिळवाया, बोलती अनृत, सोडिति माया.
स्वार्थ मात्र हृदयीं धरिती ते, निंद्य आदरिति ते सरणीतें. २७
लोभलोलुप वदे नर खोटें, तो गणी न जगतांतिल तोटे.
त्यामुळें निरपराध नरोटें, ये करीं ह्मणुनि संकट मोठें. २८
आपुलें विसरुनी धन नातें आणि आप्तविपदा न मनातें.
स्वार्थसाधक पित्यासहि सोडी, भ्रातृकंठहि अशंकित तोडी ! २९
देखतों नर अनेक जगांत, जे सदैव रमती दुरितांतें[10].
स्वार्थसाधक तयां स्तवितात, निंद्यनिंदक[11] पिसे[12] ठरतात. ३०
जो चढे पुरुष उच्चपदास, तो धनार्थ पिळितो सकळांस.
वाढवी धन धनागमतर्ष[13], दे तया न धनशैलहि[14] हर्ष. ३१
ओढितो नर नराप्रति मोह, ओढि जेविं मणि चुंबक लोह,
तो नरा विसरवी स्वविचार; मोह काय करवील न चार ? ३२
पाडितो विसर मोह सुताचा, ध्यास नित्य करवूनि शुकांचा,
सारिका स्मरुनि सोडिल पत्नी; नीतिला अनुसरेल न यत्नीं. ३३
होइ मत्त मिळतां अधिकार, क्रूर मूढ करितो बहु चार.
कोण त्या नर करील सुबोध ? कोण वा करिल त्याप्रति बोध ? ३४

---

१. मदनाचा विकार. २. नीतीचा शत्रु ह्म. अनीतिमान्. ३. माणूस. ४. बळकट जोरदार. ५. लोभी ६. दुष्टांचे कळप. ७. भयंकर. ८. सख्या भावांस. ९. फोल, भुसकट. १०. पापांमध्यें ११. निंद्य माणसास किंवा निंद्य वर्तनास दोष देणारे. १२. मूर्ख; वेडे. १३. द्रव्य मिळावें अशी इच्छा. १४. पैशाचा ढीग देखील.

स्वाभिमान नर दावुनि योग्य, भोगितो असुख घोर अभोग्य.
स्वाभिमान नर जो प्रकटील, त्या ह्मणेल विभु[1] निंदितशीलें[2]. ३५
स्वाभिमान ह्मणिजे जगिं एनं[3], सेवकीं उचित तो ह्मणिजे न.
स्वाभिमान जर सेवक दावी, त्या प्रभू बलमदें गुरकावी. ३६
स्वावलंब[4] नुरला जगतांत, लोक तोयें[5] परदत्त[6] पितात.
स्वावलंबरहितास बघून, पित्त जाय मम तें भडकून. ३७
पेटवी कलह मत्सर गेहीं, कांपवी जनककंठ सुतेंही !
स्त्रीकरें विषहि देववि भर्त्या, मारवी परिजनें[7] हितकर्त्या ! ३८
सज्जनासह करोनि विरोध, मत्सरें बुडविले बहु शोध.
मत्सर प्रखर सोसुनि कष्ट, लोकशांतिसुखही करि नष्ट. ३९
मत्सरें बुडविले बहु देश, लोकिं राहुं न दिला सुखलेश.
ग्रंथ, कीर्ति, गुण, जीवित, वित्त, नाशि मत्सर नसोनि निमित्त. ४०
मत्सराकुलमनस्क[8] नरास, पाहवे न परकीर्तिविकास[9].
काढितो उगिच संतत दोष, कां न त्यावरि करो जन रोष ? ४१
जो चढेल नर उच्च पदास, त्या अगण्य मिळती जन दास.
दासतास्थितिमधें जन हर्षे, जेविं मोर नववारिदवर्षें[10]. ४२
पावला पुरुष जो अधिकार, तो ठरेल सुगुणांस अगार[11].
शास्त्रकोविद, उदार, अपंक[12], त्यास लोक ह्मणतील अशंक. ४३
जो असे पुरुष उच्चपदीं तो, पादुका जन तदीय नमीतो.
सेवि तन्मुखविनिःसृतलाळा[13], ती गमे खलु[14] सुधेपरि त्याला. ४४
स्तुत्य जें विभु करील तयाचें, स्तोत्र गाति जन संतत साचें.
स्तुत्य तेंच जर लोक करील, भाट कोणि न तया मिळतील. ४५
वावदूक[15] लपवी निज पापें, चिंतितांच मम जीं मन कांपे,
शब्दजालें[16] भुलवी जगतास; भूल ही बघुनि ये मज हास. ४६
पाप पुण्य उलटून जगांत, पुण्य पाप अभिधा[17] धरितात.
आज पुण्य ह्मणिजे जगिं पाप, पाप पुण्य ह्मणिजेच अपाप[18]. ४७
पातकें करिल जो नर गुप्त, त्या ह्मणेल जग सद्गुणयुक्त.

---

१. श्रीमान् मनुष्य. २. निंद्य आहे स्वभाव ज्याचा असा. ३. पातक. ४. स्वतःची धमक. ५. पाणी. ६. लोकांनीं दिलेलें. ७. नोकराकडून. ८. मत्सरानें ग्रासितें आहे मन ज्याचें. ९. दुसऱ्याच्या यशाचा फैलाव. १०. नव्या मेघाच्या वृष्टीनें. ११ माहेर, निवासस्थल. १२. निष्पाप. १३. त्याच्या तोंडांतून निघालेली थुंकी. १४. खरोखर. १५. फार बोलणारा. १६. शब्दरूपी जाळें. १७. नांवें. १८. अनायासानें; साहजिकपणें.

दुर्गुणा न करिती जन दण्ड, दुर्गुणप्रकटनीं जन चण्ड[1].
साधुसे दिसति भोंदु तयांचें, मूर्त पातकाचि मानस साचें;
कंठकर्तन[2] करोनि नराचें, जें प्रहृष्टतम[3] होउनि नाचे ! ४९
एकदां खल वदे वच एक, दावि निष्कपट भक्त्यतिरेक[4].
तो पुन्हा उलटतो हतलज्ज[5], भर्त्सनीं[6] उगिच होउनि सज्य. ५०
मैत्रिचें करुनि दुर्जन ढोंग, घेउनी हितकरापरि सोंग
चिंतितो, 'चिरुनि कंठ कसा मी, पाठवूं स्वसुहृदा यमधामीं ?' ५१
व्याज देइन सुखार्थ सुवर्ण, तो ह्मणेल मजला अधमर्ण[7] !
यामुळें प्रकट हें दिसतें कीं, दान जो करिल तो अविवेकी ! ५२
ज्यावरी करिन मी उपकार, तो अनिष्ट मम चिंतिल फार.
यामुळें करुं नये उपकार, हा सुखावह असे व्यवहार. ५३
मार्ग दाविन जयास तमांत, तोच पाडिल मला खळग्यांत.
यामुळें नर कधींहि न वाटे, लावणें उचितसें मज वाटे. ५४
ज्या नरास करिं मी उपदेश, तो ह्मणे 'मति तुला नचि लेश.
यामुळें न उपदेश करीन, कीं ठरों न भुवि मी मतिहीन. ५५
सौम्य वृत्ति जर दाविन सागीं[8], षंढ मी तर ठरेन अभागी.
यामुळें करुं नयेच तितिक्षा[9], हेच योग्य दिसते मज शिक्षा[10]. ५६
प्रीति मी करिन ज्यावरि त्याचा, द्वेष मद्विषयिं होइल साचा.
प्रीति हा मज गमे अविवेक[11], प्रीतिपात्र न दिसे नर एक. ५७
ज्ञान देइन जया पुरुषातें, तोच अज्ञ ह्मणतो खलु मातें.
ज्ञान अंधतमसीं[12] बुडवावें, हें न कां मजसि योग्य दिसावें ? ५८
संकटांत नर होउनि नम्र, वृत्ति दावि अपुली अति कम्र[13].
मी निवारिन तया तर मातें, संकटांत ढकली निज हातें. ५९
देखतां जर मनुष्य विपन्न, त्यास देइन सुपक्क[14], सदन्न[15],
गालि[16] तोचि मज देत असंख्य, माझियाच सह मांडिल संख्य[17]. ६०
भार होति न दहा सुत बापा, सोशि तो बहु तयास्तव तापा,
वार्द्धकीं[18] परि न त्यास दहाही, पोषिती सुत; चमत्कृति पाहीं ! ६१

---

१. रागावलेले. २. गळा कापणें. ३. अति आनंदित. ४. भक्तीचा अतिशयपणा. ५. निर्लज्ज. ६. निंदा करावयास. ७ ऋणको. ८. अपराध केलेल्या माणसास. ९. क्षमा. १०. वर्तनाची सरणी किंवा पद्धति. ११. मूर्खपणा. १२. अंधेरांत. १३. सौम्य, गरीब. १४. उत्तम शिजविलेलें. १५. चांगलें अन्न. १६. शिव्या. १७. युद्ध, कज्जा, तंटा. १८. ह्मातारपणीं.

जोंवरी नर असे अधिकारी, तों भजेल जन त्याप्रति भारी;
सुटतांचि परि तें अधिकार-स्थान निंदिल तया जन फार. ६२
दैवदुर्विलसितें[1] अधिकार, लोपतां विभुस दुःख अपार.
त्याकडे नर न एक वळेल, दूर त्यास बघतांच पळेल. ६३
तारणार्थ कर देइन ज्यास, तो करील तरतां उपहास;
तो कृतघ्न मजला न सहावे, तत्समीप मजला न रहावें. ६४
संकटांत पडतां न सहाय, एकही नर मिळे शिव ! हाय !
येति कोणिहि सहाय न व्हाया, होति सिद्ध यश मात्र हराया. ६५
पुरुषा जवळि जोंवरि पैसा, तोंवरी ह्मणति ‘ या तुह्मि बैसा. ’
दैव हो जरि तयावरि रुष्ट, मित्र होतिल विपर्ययतुष्टें[2]. ६६
मानवास विभवीं[3] बहु मित्रें, यन्मनें दिसति फार पवित्रें.
रुष्ट दैव जर त्यास बवेल, मित्र एकहि तयास नुरेल. ६७
जो धनांकित तदङ्घ्रिरजातें[4], झाडितो जन अशंकित हातें.
आपदा जर तयाप्रति आली, तच देतेल तयाप्रति गोळी[5]. ६८
मार्ग जो सरल सेविल लोकीं, तो पडेलाचि महत्तम[6] शोकीं;
देखतों कुटिलँ[7] मार्ग धरून, मर्त्य पावति सुखास अनूनं[8]. ६९
जेथ मूर्खजनसंघ असेल, ज्ञान तेथ उपहास्य ठरेल.
ज्ञान दावुनि मिळे उपहास, कायसा तरि उपाय तयास ? ७०
ज्यावरी भरंवसा धनि ठेवी, तो तया लुटुनि तद्धन सेवी.
हो धनी अधन किंकरदास, हें दशांतर[9] डसे हृदयास. ७१
सांगणें त्रिभुवनांत चहाडी, हें जनास खिळलें जणुं हाडीं.
दावि घोर परिणाम चहाडी, संकटीं अखिल ती नर पाडी. ७२
दुर्वचें, कटु वचें किति लोक, सज्जना वितरती[10] बहु शोक !
मर्मभेदनें[11] करोनि नराचें, पावतें प्रमद[12] चित्त खलाचें. ७३
बोलतां बहुत साधु असाच, द्वेष तन्मनिं जगावरि साच.
किंतु थांबवुनि त्याप्रति मात, बोललों, “ तुह्मि रहा न वनांत. ७४
जो तुह्मांस दिसतो व्यवहार, तो यथार्थ दिसतो मज फार.
वक्र मार्ग दिसतो जगतांत, मान्य हें मज, अलीक न मात. ७५
लोक दुष्ट असती जगतांत, जे अकारण जनां छळितात.

---

१. दुर्दैवानें. २. स्थिति पालटल्यामुळें आनंदित. ३. वैभवाच्या स्थितींत. ४. त्याच्या पायाच्या धुळीस. ५ शिव्या. ६. अतिशय तीव्र. ७. वांकडा. ८. पुष्कळ. ९. बदललेली स्थिति. १०. देतात. ११. काळजाला घरें पाडणें. १२. आनंद.

किंतु जो पथ तुह्मीं वरिलासे, तो मनास मम योग्य न भासे. ७६
व्यर्थ[1] गालि[2] वितरून खलांस, लोक नानुभवितील सुखास.
दुर्जनांत मिसळून तयांचें, चित्त पालटुन हो शुभ साचें[3]. ७७
या तुह्मी परत लोकसमाजीं[4], ही तुह्मांस विनती खलु माजी.
दुर्जनांस वळवून तयांस, या करा मृदुवचें निजदास. ७८
लोकसंघ तुमचा उपदेश, ऐकुनी जर वळे लवलेश,
लाभ तो तर अपूर्व करेल, व्हाल वंद्य तुह्मिही अतिवेलें[5]." ७९
ऐकुनी मम असें वच साधू, बोलला मजसि "तूंच जगा धु[6];
लोकचित्तमल तूंच धुऊन, हो कृती[7] उचित तूं मजहुन. ८०
तूं युवा[8] असासि, मी अति जीर्ण[9], तूं सख्या ! सबल, मी बलहीन.
तूंच जा करुनि बोध जनास, त्यास लाव नयशुद्धपथास[10]. ८१
वाटतें मज जगांतिल पाप–ध्वंसरूपविधिसिद्धि[11] दुरापें[12].
स्वादु[13] हो जर महार्णवतोय[14], दुष्टपापमलधावनें[15] होय;
शीतलत्व जर दावि कृशानू[16], ध्वांत[17] लोकिं पसरी जरी भानू,
जाण दुष्ट हृदयांतिल पाप–पंक[18] होइल निरस्त[19] अपाप. ८३
प्रस्तरीं[20] जर मृदुत्व दिसेल, शृंगही शशशिरीं[21] उगवेल,
व्याघ्र होइल दयालु तरीच, साधुता वरिल पुरुष नीच. ८४
पंगु मेरु जर लंघिल पायीं, विंध्यरूप जर होइल रायी,
हीरकास जर पद्म चिरील, निर्मलत्व तर नीचें वरील. ८५
तूं स्वतां कर जनाप्रति बोध, मी करीन तुज न प्रतिरोध.
शुद्धचित्त जन होइल जेव्हां, मीहि येइन सुखें जनिं तेव्हां. ८६
जा सख्या ! जनमलास धुवाया, काल घालवुं नको मशिं वाया.
मी पिसा ह्मणुनि जा मज सोड, मागतों तुजसि दे मज जोड. ८७
मत्समागम तुला न रुचेल, मूर्ख मी अबल मी अतिवेलें[22].
भेटले जन तुला जर दुष्ट, तत्कृतीं तुज करो नचि रुष्ट. ८८
आवडे जर जगीं तुज वास, जा रहा जगिं करोनि विलास.
दुर्जनास करिं वंदन आधीं, नातरीं तुजासि घेरिल आधी[23]." ८९

---

१. खोटी. २. शिव्या. ३. खरोखर. ४. जनाचा समुदाय. ५. फार. ६. साफ कर ७. कृतकृत्य. ८. तरुण. ९. ह्मातारा. १०. नीतीच्या मार्गास. ११. पापाचा नाश करण्याच्या कामीं यश. १२. मिळवावयास कठिण. १३. गोड. १४. महासागराचें पाणी. १५. दुष्टाच्या पापरूपीमलाचें धुणें. १६. अग्नि. १७. अंधेर. १८. पापरूपी चिखल. १९. नाहींसा. २०. दगडांत. २१. सशाच्या डोकीवर. २२ फार. २३. दुःख.

त्या साधूचें परिसुनि असें वाक्य उत्साहहीन,
वादासाठीं निमिषभरही राहिलों तेथ मी न.
त्याच्या पायावरि नमविलें भक्तिनें म्यां शिरातें.
त्याचें आशीर्वच मिळवुनी सोडिलें त्या स्थलातें. ९०
मार्गीं आले बहु मम मनीं क्लिष्ट नाना विचार,
त्यांच्या योगें खचित मनिं मी जाहलों भ्रांत फार.
त्या साधूचा पथ अनुसरों, कीं समस्ता जनाचा
ह्या शंकेचा मज उलगडा होइना, सत्य वाचा. ९१
शंका ऐशी बहुदिन मनीं माझिया राहिली ती,
ग्राह्या त्याज्या मज न ह्मणवें निश्चयें एकरीती.
गेले कांहीं दिन मम असे, मास तैसेचि गेले,
साधूक्ताचा विसर पडला; तें न चित्तांत ठेलें. ९२
कैसें दोलेपरि हलतसे चित्त तें मानवाचें,
कैसें दुष्टाचरण भुवनीं नित्य चित्तांत डाचे;
हें दावाया कवन रचिलें, शांतिहा मेळवाया,
हा जो विद्याधरमनिं असे हेतु तो हो न वाया. ९३

---

## महादेव हरि मोडक.

जन्म–इ. स. १८६४.

रा. रा. महादेव हरि मोडक, बी. ए., यांचें शीलनाथ अष्टोत्तरी हें लहानसें काव्य प्रसिद्ध आहे. शिवाय बैरागी, अद्भुत किमयागार, सुतावियोग, सत्याचा महिमा अशीं कांहीं स्फुट काव्यें त्यांनीं रचिलीं असून त्यांपैकीं कित्येक काव्यरत्नावली व मासिक-मनोरंजन यांत प्रसिद्ध झालीं आहेत आणि कितीएक अद्यापि अमुद्रित आहेत. सती ठाकुराणी या नांवाचें एक नवीन मोठें काव्य रा. मोडक यांनीं रचिलें आहे, तें अजून छापलें नाहीं.

### १ बैरागी.

ही कविता गोल्डस्मिथनामक आंग्ल कवीच्या व्हिकार ऑफ वेकफील्ड य कादंबरींतील ' हरमिट ' या चुटक्याचें प्रतिबिंब आहे. या लहा-

---

१. घाबरा उत्पन्न करणारे. २. साधूच्या भाषणाचा. ३. झोंपाळ्याप्रमाणें.

नशा काव्याचें संविधानक असें आहेः-एंजिलेना नांवाची एक धनाढ्य व सुंदर तरुणी होती. तिला आपलीशी करण्यासाठीं पुष्कळ तरुण आले; परंतु त्यांत एडविन नांवाचा एक सद्गुणी व सात्त्विक वृत्तीचा तरुण गृहस्थ होता, तो मात्र तिला पसंत पडला. एंजिलेना ही मोठी दुराराध्य व मानिनी स्त्री होती. तिनें त्या बापड्या सज्जनाला क्रीडाशकुंताप्रमाणें असें शिकस्त नाचविलें कीं, शेवटीं तो निराशेनें तिचा नाद सोडून वनांत एकांतवास पतकरून बैरागी होऊन एका गुहेंत राहिला. मग एंजेलिना शुद्धीवर आली! तिला त्याचा चटका लागून राहिला. एडविन यानें प्राण दिला असें तिला वाटलें. पुढें तिनेंही खिन्न व निराश होऊन एकांतवास स्वीकारिला. दुर्जनभयास्तव ती पुरुषवेषानें रानावनांत हिंडूं लागली. एके दिवशीं रात्रीं तिला दिव्याचा भास झाला, पण वाट सांपडेना. अशा वेळीं एक बैरागी तिला दिसला. तोच हा एंजेलिना हिचा प्रियकर एडविन होता. या उभयतांची गांठ पडल्यावर जो प्रसंग झाला त्याचें या काव्यांत वर्णन आहे. शेवटीं दोघांची ओळख पटून तीं आनंदानें एका ठिकाणीं राहूं लागलीं. ही कविता मूळ काव्याला इतकी धरून आहे कीं, विद्यार्थ्यांना हिच्यावरून मूळ कवितेचें मर्म चांगलें समजेल.

## श्लोक.

परत परत साधो ! दाखवीं वाट मातें,
अपरिचित वनीं मी एकटा भूल होतें;
लकलकत दुरी त्या गव्हरीं दीप जेथें,
पथिकसुखनिकेतीं आज जाईन तेथें. १

निबिड बहु तसें हें घोर कांतार भारी,
अबल, असहचारी, मंद, मी मार्गचारी;
बहु बल करुनीही काटितों मार्ग जों जों,
अधिक अधिक वाटे लांब तें रान तों तों. २

'विरम विरम, वत्सा!' बोलला साधु त्यातें,
'मम वच धरिं चित्तीं, सांड या कौतुकातें;
म्हणसि झळकतो जो दीप तो भास आहे,
फसवुनि पथिकांतें नित्यही मारिताहे.' ३

'फिर बघ जवळी या माझिया आश्रमातें,
तुजसम पथिकांच्या खंडितो जो श्रमातें;
मिळति न तुज तेथें शर्कराढ्यें सदन्नें,

परि फळमुळ देतों मी मनें सुप्रसन्नें.' ४
'तरि चल मम धामीं, आज रात्रीं विसावा,
निजगृह समजूनी त्वां यथाच्छंद घ्यावा;
अविकल सुखनिद्रा, कंद भक्षावयासी,
तृणविरचित शय्या, आमुची पूर्ण आशी.' ५
'चराति फिराति हर्षें स्वैर जे अद्रिकुक्षीं,
जलचरपशुपक्षी त्यांजला मी न भक्षीं;
करुनि मज दयेचें वांचवी जो सुवर्म,
शिकवि मज अहिंसा हाच कीं श्रेष्ठ धर्म.' ६
'तृणयुतगिरिपृष्ठींहून मी कंदमूल
छबडि भरुनि नेमें आणितों पानफूल;
अमृतरुचि झऱ्याचें आणुनि स्वादु तोय,
शमवि मम पिपासा, अन्य जाणें न पेय.' ७
'चल गृहिं पथिका रे, काळजी सोड सारी,
क्षितितलगत चिंता तेवढयाही भिकारी;
ललितविषयसौख्यें तीं क्षणध्वंसशील,
मनुज भजक त्यांचा तोहि अल्पायु लोल.' ८
'हिमकण मृदु जैसे भूवरी वर्षताती,
विशद मृदुल तैसे तन्मुखीं वर्ण येती;
परिसुनि पथिकें त्या, घालुनी मान खालीं,
तदनुसृति मठांतीं आदरें तूर्ण केली. ९
जटिलविपिनगर्भीं दूरशी उच्च भागीं,
तृणविरचित होती झोंपडी एक जागीं;
गरिबगुरिब भोंतीं राहती जे तयांस,
अगतिक पथिकांतें देत जी आश्रयास. १०
रजत कनक यांच्या ती न जाणे विटाळा,
मग कुलुप कडी वा अर्गलाही कशाला?
करपरिचय देतां मोकळें दार झालें,
पथिक, सदय साधू, नेटके आंत गेले. ११
दिवसभर खपोनी शीणतां, अस्तमानीं
जइं परतति घ्याया पूर्ण विश्रांति प्राणी;
सहृदय मुनिरायें चेतवूनी धुमीला,
पथिकयुवमनींचा शीणही दूर केला. १२

वनभवफलमूलें पूर्ण वाढोनि थाळी,
स्मितयुतवदनें त्या आग्रहें खाउं घाली;
मधुर मधुर गोष्टीही पुराणांतरींच्या,
कथुनि निरशि सारा शीण त्यांअंतरींचा. १३
समसुखविनिवेशें बालमार्जारसंगें,
करित विविध चेष्टा कूर्दनीं फार रंगें;
किरकिर करि अग्नीसन्निधीं रात्रिकीट,
तिडतिड जणु हर्षें वाजतें अग्निकाष्ठ! १४
परि सुखद न होई एकही गोष्ट पांथा,
क्षणभरि विरमे ना अंतरीं इष्टचिंता;
उलट भरुनि छाती दुःख आलें शिगेला,
घळ घळ घळ अश्रूपूर नेत्रीं निघाला! १५
नवल करि बघोनी साधु पांथस्थितीला,
विवश पथिकदुःखें अंतरीं जो जहाला;
सकरुण मग बोले ' दुःख कां वा करीशी,
तरुण असुनि ऐशी वृत्ति कां आदरीशी ?' १६
' हुसकुनि दिधलें का तूजला मायबापें ?
भ्रमसि वनिं उदासी काय संसारतापें ?
हृदय दुखविलें कीं काय मित्रें कृतघ्नें ?
प्रणयविमुख किंवा प्रेयसी काय जन्मे ? ' १७
' शिव ! शिव ! भुलशी कां नश्वरा वैभवाला ?
सुख असुखचि जाणें, अर्थ ज्या हेतु झाला;
तृणसमलघुवृत्ति द्रव्य हें साच मानीं,
लघुतर नर जो ह्या तुच्छ सौख्यांसि वानी. ' १८
' जगतिं सकल जीतें ' मित्रता ' बोलताती,
मजसि निपट भासे भूल ती गुंगवीती;
द्रविणगुणसमृद्धा मित्र छायेसमान
भजति; परि दरिद्रा ढुंकुना पाहती न. ' १९
' प्रणय अधिक मिथ्या मित्रतेहून भासे,
प्रणयहत नरांना सुंदरीवर्ग हांसे;
प्रणय विमल सत्य क्षोणिपृष्ठीं मिळे ना,
ह्मणति कवि 'रहातो चक्रवाकीं' कळेना.' २०
पुरुष असुनि कां तूं शोक ऐसा करिशी,

शरम विषयपुढा कां न चित्तीं धरिशी ?
चल म्हणि, झिडकारीं या कुरंगीदृशाला !'
म्हणुनि वदत साधू पांथ सव्रीड झाला. २१
नवल बघुनि झाला साधु चित्तांत चूर,
पथिकयुवमुखश्री दावि लावण्यपूर;
क्षणिक रुचि निशांतीं राग जैसे उषेचे
उठति वदनिं त्याच्या भाव तैसे मजेचे २२
दरदलित सलज्ज स्निग्ध ते नेत्र होती,
उचलुनि वरि दावी स्पष्ट तो पुष्ट छाती;
चकित मुनि विचारी 'हा युवा काय आहे
मजसि सकलभावें सुंदरी भासताहे !' २३
वच परिसुनि बोले पांथ आक्रोशगर्भ
'अशरण. हतभागी पापिणी मी प्रगल्भ;
विमलपद तुझें हें मान्य सर्वे धरासी
शिरुनि मळविलें म्यां; जाहलें घोर दोषी.' २४
'प्रभु, तुज अनुकंप्या बालिका मी अभागी,
हतमदन जियेला हिंडवी जागजागीं;
हुडकित पथि जों जों सौख्यविश्रांति जाई
विषविषम निराशा मत्सखी एक होई !' २५
'धनिक जनक माझा, टैननामें नदीच्या
निकट वसति ज्याची, मानही थोर ज्याचा;
मजवरि जिव भारी, एकटी मी तयाला,
उघडचि मग त्याच्या स्वामिनी वैभवाला.' २६
'मजसि मम पित्याच्या स्निग्ध अंकावरूनी
अमित तरुण आले न्यावयातें हरूनी;
स्तवितिहि मम रूपा, दाविती आर्तवृत्ति,
वरिवरि परि सारें, अंतरीं द्रव्यभक्ति.' २७
'प्रतिदिवस हजारों स्वार्थसाधू लबाड
मज भुलवुं पहाती; देणग्या देति गोड;
सुजन तरुण होता एकटा एडवीन,
करि मम परिचर्या; प्रेम बोले परी न.' २८
'झळक फळक नाहीं, वेष साधा तयाचा,
धनपरिजन नाहीं, लेशही गौरवाचा;

परि चतुर, मनस्वी, सत्त्वशाली, इमानी,
त्यजुनि इतर सारे, श्रेष्ठ मी त्यासि मानीं.' २९
'लपुनि छपुनि माझ्याभोंवतीं आडरानीं
प्रणयपिशुनगीती गाय जें हर्षदानी;
पवन सुरभि होई तन्मुखोच्छ्वासगंधें,
भरुनि सकल जाई कुंज तो गीतनादें!' ३०
'दिनकरउदयानें कुंज पावे विकास,
सुविमल हिमबिंदू भूषवीती तृणास;
उभयहि विमलत्वें साम्य त्याच्या मनाचें
क्षम नसति कराया, वाक्य हें जाण साचें.' ३१
'हिमकणतरुपुष्पीं राहती धर्म दोन
प्रकृतिसुभगता कीं वृत्तिचांचल्य आन;
प्रथम अकृतरूपें वल्लभीं व्यक्त होय,
हतविधिवशतेनें मत्सखा हो द्वितीय.' ३२
'प्रणयिनि असुनीही रूपगर्वें तयाला
करुनि विविधचेष्टा वंचिला चाळवीला;
विदित मज तयाचा पूर्ण सद्भाव होता,
तरि मज सुख वाटे त्यास दुःखी पहातां!' ३३
'मग सुहृदवमानें पूर्ण भग्नाश झाला
त्यजुनि मजसि गेला वंचकी मानिनीला;
विजन विपिन शोधी, एकटा तेथ जाई,
न कळत इतरांशीं बापुडा प्राण देई!' ३४
'हर! हर! अपराधी पापिणी मी अधन्य,
मरण शरण, प्रायश्चित्त मातें न अन्य!
सुहृदुपगत वन्य प्रांत शोधूनि तेथें
करिन मरणशय्या आपुली आत्महस्तें.' ३५
'स्वजन पितर सोडी एकटा तो हताश,
विजन वन बघोनी आदरी मृत्युपाश
प्रियतम मजसाठीं; मीहि उत्तीर्ण व्हाया
तदनुकृति करूनी पूर्ण, सांडीन काया.' ३६
वच परिसुनि बोले साधु, 'हो पाप शांत!'
कवकुनि धरि तीतें हृत्प्रदेशीं नितांत.
चकित युवति भावी, 'धष्ट हा साधु कोण?'

निरखुनि परि पाहे तों तिचा एडवीन! ३७
' प्रियसखि, रसपूर्णे, मोहिनि, प्रेमशीले,
त्यज सकलहि शंका, स्नेहसाफल्य झालें!
चिरविरहकृशा या आपुल्या वल्लभाला,
करगत करुनी दे प्रीतिसंजीवनाला!' ३८
' त्यजुनि निखिल चिंता, तूजला ह्या उराशीं
सुदृढ मज धरूं दे, सुंदरि प्रेमराशि!
मम सुखनिधि तूंचि, प्राण तूंची, विसावा
पुनरपि विरहाधी आपणांतें नसावा!' ३९
' कृतमति सखि! आतां क्षीरनीरोपमान
मिळुनि उभय राहूं संतत प्रेमपूर्ण;
हतविधि फटकारी प्राणदीपास जेव्हां
तव, मम अविलंबें अंत हा जाण तेव्हां!' ४०

---

## २. सुताविरह.

कवींच्या एका मित्राची नवपरिणीत सद्गुणी कन्या मृत्युमुखीं पडली. कवींचें तिच्यावर लहानपणापासून अत्यंत प्रेम होतें. कवीला या मुलीची निधनवार्ता ऐकून फार शोक झाला, तो श्लोकरूपानें खालीं अवतीर्ण झाला आहे.

### श्लोक.

' कमल! कमल!' ऐशी मारुनी हांक ज्याला
बहुत सुखविलें मीं आपुल्या अंतराला;
त्यजुनि मज अजी तें लाडकें दूर जाई,
ह्मणुनि मम मनाला दुःख अत्यंत होई! १
करुं तरि गत कैशी चैन कांहीं पडेना,
सकल विरस भासे, चित्त कोठें जडेना;
हुरहुर बहु वाटे, बोलतां कंठ दाटे,
अनुदिन नयनांतीं अश्रुचा पूर लोटे! २
ह्मणुं तरि कवणा मी ' लाडकें बाळ, बाळ!'
पुरवुं तरि कुणाची गोडशी नित्य आळ!
मजवरि रुसुनीयां कोण आतां बसेल!

हळुच मग भुजांतीं कोण प्रेमें घुसेल ! ३
किति तरि गुण वर्णूं माझिया बालकाचे !
गणति न उपकारा त्या जगचालकाचे !
मिळवुनि गुण सारे ओतिली मूस त्यानें,
अनुपम घडिली हे मूर्ति कारागिरानें ! ४

रूपवर्णन.

सरल, सुबक, गोरा, गोजिरी गात्रयष्टी,
उपजत बघुनीयां अंतरीं फार प्रीती;
अमृतमधुर, मुग्ध, स्निग्ध पाहूनि अंगें,
विमल सुखसमुद्रीं चित्त माझें तरंगे ! ५
तिलकुसुमसम रम्या नेटकी नासिका ती,
बहुत खुलत जेथें भूषणांतील मोतीं;
उपरि उभविल्या ह्या भोंवया कीं कमानी,
तिलक निटिलदेशीं शोभतो रक्त वर्णी. ६
शिरिं विपुल विराजे स्तोम[1] तो मूर्धजांचा,[2]
अतितनु समरेखा भेदिते अर्ध ज्यांचा;
नव नवलपरीची वाळुनी नित्य वेणी
निववि नयन माझे बालिकांची शिराणी. ७
विलसति करकंजीं[3] भूषणें रक्तवर्ण,
चटुल रव जयांचा तोषवी नित्य कर्ण,
चरणिं धरित तोडे साजिरे शिंदशाई,
कविस रुचिरता ती वर्णितां येत नाहीं ! ८

गतिहास्यादि विभ्रम.

सरल गति कदा ती, ती कधीं नागमोडी,
क्षणरुचिनिभ[4] केव्हां दिव्य चांचल्य जोडी;
क्षण थबकत चाले, मागुतेनी सखेल,
कधिं धरि यमुनेची स्निग्ध गंभीर चाल. ९
अकपट, मृदु, मंजु, स्निग्ध, सुव्यक्तवर्ण,
स्मितयुत हित वाक्यें पाववी तृप्ति कर्ण;
रुचिर, मित, सुरम्य, क्षीरकांती, सलास्य,
विलसत अधरांतीं सर्वदा मंदहास्य ! १०

---

१. समूह, २. केसांचा, ३. करकमलीं, ४. विद्युल्लतेप्रमाणें.

परिमृदितमृणालीपेलवें मुग्ध अंगें,
सुखवित मजला जीं दर्शनें स्पर्शयोगें;
अधिकचि खुलती जीं क्रीडतां बालभावें,
मधुरपण तयांचें कोवि शब्दीं वदावें ! ११
नदीकांठीं छोटी कुसुमतरुवाटी विलसते,
जिथें वृक्षीं पक्षीतति मधुर आलाप रसते;
जिथें सायंकाळीं प्रियसहचरीसाध विचरे,
पहातां यत्लीला मदिय मन औदास्य विसरे. १२

ईशभक्ति, वाचन, वाणी.

हृदयिं चढत प्रेमा पाहतां साधुसंत,
निरलस रत होई त्यांचिया सेवनांत;
'फिरत सगुणवेषें देव तो संतरूपें,'
समजुनि मनिं, सेवी त्यां, मनें निर्विकल्पें. १३
करित सुदृढभक्ती सर्वदा व्यंकटाची,
हरित भजनमात्रें भीति जो संकटाची;
स्तवनें[1] मधुरशब्दें स्नान होतांचि गाई,
प्रिय मज ह्मणुना जी शंकरा जेविं जाई[2]. १४
विरचि विविध लोकां जो स्वसंकल्पमात्रें,
अचर चरहि भूतें वागवी जो स्वतंत्रें;
धरुनि सगुणरूपें ध्यान त्या श्रीहरीचें,
रमत हृदयिं बाला, धन्य हो जन्म तीचें ! १५
पढत कधि मनाशीं पाठ लीलामृताचा,
करित कधिं सुखानें घोष एकादशाचा[3];
वदत विविध गानें शुद्ध गीर्वाणवाणी,
परिचय करि केव्हां भिन्न शास्त्रीं पुराणीं. १६
वाची अत्यादरें जी बहुसुरस कथा रामकृष्णादिकांच्या,
कादंबर्यादि तैशा अभिनव रचना बाणभट्टादिकांच्या;
वाची साध्वी चरित्रें, सरस नवनवे गीतकाव्यप्रबंध,
सन्नीतिग्रंथ वाची किति तरि तिजला वाचनाचाचि छंद ! १७
जिची आकर्णांनीं ललित विशदा वर्णवटिका;

१. व्यंकटेशस्तोत्र. २. जाईचें फूल. ३. शिवलीलामृताचा अकरावा अध्याय.

पडे दोषज्ञांचा[1] निपुणरसनागर्व लटिका;
मुखीं नांदे भाषा नवसरवती दिव्य विमला,
स्वयें जैशीं माझ्या हृदयभवनीं मुग्ध कमला. १८
वाणीही फार नामी, स्खलितगति दिसे मात्र एका विरामीं,[2]
वाहे अर्थानुगामी, अरसिकहि जिला ऐकण्या हात
येना कर्णीं रिकामी, त्वरितचि हृदयीं ग्रंथिचें मर्म आणी,
ऐशी सद्भावखाणी, गुणरुचि, तिजला सत्कवी कां न वाणी! १९

तिचे अन्य गुण.

साहिना ईशनिंदा, अनवरत भजे विष्णुपादारविंदा,
सत्कार्यीं जी अमंदा, हृदिं बहु विलसे पाहुनी साधुवृंदा;
सोडोनी कामधंदा क्षणभरि न वरी वाउग्या शुष्क फंदा,
ऐशी बाला गुणाढ्या फिरुनि मज अतां प्राप्त केवीं? मुकुंदा! २०
पाहे माझें वदन जरि ती खिन्न उद्विग्न झालें,
लाडें कोडें जवळ जवळी येउनी गोड बोले;
कंठीं बाहू धरुनि, हंसुनी, चित्तखेदापनोदा
चातुर्यानें करि; स्मरुनि तें चित्त पावे विषादा! २१
जी मातें बघतां विषण्ण अथवा उद्विग्न चिंताभरीं,
लाडीगोडि करूनि येइ जवळी हांसोनि पृच्छा करी;
लोळे मांडिवरी, समंजस पुरी, दुर्वर्ण्य तच्चातुरी,
कंठीं घालुनि बाहु, मंजु वदुनी, खेदापनोदा करी. २२
"झालें जेवण आज लौकर, क्षुधा वाटे तुला लागली!
यासाठीं स्वकरें करूनि दशमी ही तूज मीं आणिली;
थोडी खाउनि पाणि थंड पिउनी, कामास जा मागुती,"
ऐसें बोलुनि, हट्ट घेउनि बसे—तें दुःख देतें अति! २३
होती पोरकि पोर, माय मरुनी बाल्यींच गेली तिची,
या योगें मज जाहली समधिका जी पात्र सत्प्रीतिची[3];
कीं आली विरहासहिष्णु फिरुनी, मुग्ध स्वरूपें प्रिया,
ऐसें वाटुनि रूपसाम्य बघतां, प्रीतींत मिश्रे दया! २४
कोणी पुत्रचि प्रेमपात्र करुनी कन्येस अव्हेरितां,
'ही आली उगवावया ऋण' असें लोकांतही बोलतां;

---

१ विद्वानांचा. २. पूर्णविरामचिह्नाचे ठिकाणीं. ३. शुद्ध प्रेमाची.

कोणी कांहिं म्हणो ! मला प्रियतरा कन्याच पुत्रापरी !
जैशी कीं रसिका पिका समधिका आम्राहुनी मंजिरी ! २५

तिचीं लाडकीं नांवें.

म्हणे कमल मी कधीं, कधिं कमी, कधीं कोमल,
कधीं सगुणमंजिरी, रतनही कधीं सोज्ज्वल;
कधीं ह्मणत द्वाड मी, कधिं लबाडही, दांडगी,
कधीं कमलबाळ, मी ह्मणत लाडकी, भांडगी. २६
कधीं मधुर मी ह्मणे, सुरस, कीं कधीं मोहन,
कधीं ह्मणत पोर ही, सतत बाळ संबोधन;
कधीं ह्मणत वत्स मी, ह्मणत प्राण ही पांचवा,
कधीं म्हणत कन्यका, ह्मणत माय माताहि वा ! २७
कधीं म्हणत लेंकरूं, हरणही, कधीं पाडस,
कधीं ह्मणत कोंकरूं, कधिंहि वासरूं गोंडस,
कधीं ह्मणत कर्कशा, ह्मणत मंजुळाही कधीं,
कधीं ह्मणत शाहणे, ह्मणत मूर्ख कीं मंदधी ! २८
कधीं बाबा, बेटा ह्मणत, कधि बच्चा, कधिं मुली,
कधीं सोंगा, ध्याना ह्मणत, कुळि केव्हां उठवली,
किशोरी वा छोरी ह्मणत कधि पोरी तुडतुडी,
मिठाई वा केव्हां अमृत अथवा साखर खडी ! २९
विश्राम, आनंदनिधान, हर्ष, कधीं गुरूही, कधिं पट्टशिष्य;
गच्चाळ, नादान, पिसाट, वेडें, नानापरी बोलत तीस कोडें. ३०

तिची कीरक्रीडा[1].

उठुनि ह्मणिं प्रभातीं जी शुका पंजरींचे पढवि बहुत यत्नें बोल नानापरींचे
धरुनि जवळ त्या घे गोडशा चुंबनातें, तनयजननि-ऐसें दावि सप्रेम नातें.
पोपट्या ह्मणुनी ह्मणे, कधिं कधीं पोपी असें मंजुळ,
केव्हां पोपटसें त्रिमात्रक, कधीं पोपटू असें प्रेमळ;
केव्हां दत्तगुरू ह्मणूनि पढवी, केव्हां ह्मणे कावळा,
ऐसी जी चतुरा विनोदरसिका ती दूर झाली मला ! ३२
केव्हां झांकुनियां शुकास पदराखालीं धरी कौतुकें,
केव्हां घालुनियां मुखांत मुख जी सप्रेम घेई मुकें;

---

१ पोपटाशीं खेळणें.

केव्हां थापटि थोपटी, कधिं तया न्हाणी स्वयें सुंदरी,
केव्हां मांडिवरी तयास निजवी, कें घेत स्कंधावरी. ३३
केव्हां भूमिवरी स्वयेंचि निजुनी घेई तयातें कुशी,
केव्हां चोजवि त्यास देउनि मृदू ऐशा करांची उशी !
केव्हां बैसवि त्या करांगुलिवरी, सोडी कधीं मोकळा,
केव्हां घालुनि शीळ त्यास रिझवी नानापरी कोमला. ३४
केव्हां प्रेमभरें शुकास निरखी, केव्हां तयाशीं रुसे,
केव्हां टोंचकुनी तयास खिजवी, केव्हां तयाशीं हंसे;
केव्हां घाबरवी मजेंत लटकी भीती तया घालुनी,
केव्हां डोलवि नाचवी थयथयां गाणें मुखें गाउनी ! ३५
केव्हां झुंजवि त्यास पोपट दुजा घालूनि तत्पंजरीं,
होतां श्रांत दयार्द्रभाव धरुनी तत्सांत्वनातें करी;
केव्हां त्यांजकडे बघे मुरडुनी, केव्हां अबोला धरी,
केव्हां बोलुनि बोलुनी करि पुरे, क्रीडे अनेकापरी. ३६
केव्हां दत्तगुरू ह्मणूनि टकळी लावी तया सन्निधीं,
'कोणाचा शुक तूं?' ह्मणून कुतुकें त्यातें पुसे जी कधीं;
केव्हां वेडवि त्याजला उलट 'मी पोपट, तूं कावळा !'
केव्हां पंचि ह्मणूनि त्यास अळवी, केव्हां ह्मणे बावळा. ३७
केव्हां चावुनियां विडा स्ववदनीं घाली तयाचे मुखीं,
केव्हां स्वोष्ठयुगांत निर्भयपणें चंचू धरी कौतुकीं;
केव्हां चंचुपुटीं स्वकीय रसना घालूनि घे चुंबना,
केव्हां आवळुनी तयास हृदयीं दे निर्दयालिंगना. ३८
केव्हां त्या चढवूनि लोहवलयीं स्वच्छंद आंदोलवी,
केव्हां मस्तक निम्न, ऊर्ध्व पद तें ठेवूनियां चालवी;
केव्हां पंजरशेखरीं बसवि त्या बाहेर बोलावुनी,
केव्हां दांडिवरी अशब्द बसवी घाली जणूं मोहिनी ! ३९
केव्हां आणुनि वन्यवल्लि हिरव्या वेष्टीतसे पंजरीं,
केव्हां शोभवि त्या पतत्रिसदना लावोनियां मंजरी;
केव्हां भूषवि कोमलें किसलयें पुष्पें कधीं लावुनी,
ऐशी त्या शुकमंदिरास सजवी नानाकृती भावुनी. ४०
जैसा माय सुतावरी करितसे प्रेमा सदा निर्भर,
तैसें प्रेम शुकावरी करितसे बाला सदा सादर;
दुःखें दुःखित, त्याचिया सुखित हो पाहूनि त्यातें सुखी,

दाणापाणि तया दिल्याविण न घे जी अन्न केव्हां मुखीं. ४१
देई डाळ तयास नित्य भिजली, भेंडी कधीं कोंवळी,
केव्हां दाडिमबीज देत, पिकलीं केळीं, कधीं रातळीं;
पेरू एक कधीं कधीं भरवि त्या प्रेमें खडीसाखर,
केव्हां खारिक दे, बदामहि कधीं, चारी कधीं भाकर. ४२
केव्हां सोलुनि इक्षुदंड करुनी देई तया गंडुरी,
दे शेंगा, भुइमूग, मूग, चवळी दाणे कधीं दे तुरी;
केव्हां अंजिर गोड देत कणसें केव्हां मक्याचीं मवीं,
केव्हां दे मिरची अखंड हिरवी जिव्हेस जी पालवी. ४३
केव्हां घालुनि त्यास मांडिवरती तान्ह्या मुलाचे परी,
कानीं घालुनि तैलबिंदु लटके टाकूहि त्याची भरी;
न्हाणी चोळुनि मागुती पुसुनियां नेत्रीं भरी काजळ,
टेंकी तीटहि गालबोट, न करो कीं दृष्ट कोणी खळ ! ४४

शुकाचें चातुर्य व वियोगदुःख.

देई फार जपूनि पाय, नखरें अंगा न लावी तिच्या,
चावेना तिजला कधींहि चिमट्या ती ओढितां चंचुच्या;
'बैसें गप्प' ह्मणूनि ती जरि ह्मणे, तत्काळ राहे उगा,
होऊनी खग बद्ध होय इतुका बालागुणें तो बघा. ४५
बाले ! तूं दूर जातां चुकुर बघ कसा हा दिसे आज रावू !
घेईना डाळपाणी जरिहि निजकरें चारितो त्यास भागू[1];
बोलेना बोल हर्षें, पकडुनि बसतो सर्वदा लोहयष्टी,
आणी नेत्रांस पाणी, खचितचि दिसतो अंतरीं फार कष्टी ! ४६
होतां प्रत्यूष आतां मजसि पढविण्या हांक मारील माता,
ऐसें वाटोनि चित्ता, फिरुनि थयथयां पंजरीं होय गाता;
येशीना तूं उठोनी जवळि, नच तया घालिशी साद बाले !
ऐसें पाहोनि होई व्यथित निजमनीं, मूक हो अल्पकालें ! ४७
जातां अंगावरूनी तुजसम दुसरी बालिका स्वद्वयाची,
होवोनी भास तूझा त्वरित मग तया स्फूर्ति ये गायनाची;
देना संवाद कोणी उलट कवतुकें, तूं जसी नित्य देशी,
तेव्हां होवोनि खट्टू, अवचचि बसतो, काय सांगूं सुकेशी ! ४८
तिर्यग्योनींत[2] जन्में गणिति मनुज ज्या क्षुद्र अज्ञान पक्षी

---

१. शिपायाचें नांव. २. नीचयोनींत.

तोही उद्विग्न बैसे तव विरहवळें अन्नपाणी न भक्षी !
कैसा मी ज्ञानशाली तव [1]रुचिरगुणग्रामसंबद्धचेता
साहूं गे त्वद्वियोगा ? वद, वद कमले ! बालिके ! तूंचि आतां ४९

पतिगृहीं वर्तन.

[2]मराली [3]कासारीं, सुरनदितटाकीं कुमुदिनी,
वसंतीं पुष्पश्री, सुरभिकुसुमीं जेविं अलिनी;
[4]शरज्ज्योत्स्नासौधीं विमल कमलीं सिंधुदुहिता[5],
तशी नांदे हर्षें स्वपतिभवनीं हे पतिरता. ५०
प्रिया जी भर्त्याची, अतिथिगुरुशुश्रूषणपरा,
दयार्द्रा दीनाशीं, सुखवि सुवचें नित्य इतरां;
जगत् मिथ्या मायामय सकल हें जाणुनि मनीं, ५१
महादेवीं प्रीती दृढ उरिं धरी हे शिखरिणी[6].

तिचें निधन.

परी ऐशी काळें हरुनि दुरि नेली अवचिता,
उभी शोकाग्नीची धडधड उरीं लावुनि चिता;
करूं कैसें आतां विझवि विरहाग्नीस कवण ?
दयानेघा देवा ! अगतिक तुला दीन शरण ! ५२

मृत्यूस संबोधन.

अहा मृत्यो ! नेसी हरुनि कमला कोमल अशी,
वृकें हिंस्रें न्यावी उचलुनि कुरंगी मृदु जशी;
दया, माया, लज्जा, नय, विनयही सर्व त्यजुनी,
कसा बा तूं काळा ! विहरसि असा निर्भय जनीं ? ५३
पुराणा कल्पींचा बहु जरठ तूं खप्पड कुठें !
शुकक्रीडालोला रुचिर नव बाला मम कुठें !
समानाशीं स्पर्धा विहित ह्मणती पंडितजन,
अशीलें त्वां केली कवलित कशी न्याय त्यजुन ? ५४
जयाच्या हिंस्रत्वा निरुपम असें मानिति जनीं,
[7]रवश्रावीं ज्याच्या पळति मृग सत्वें वचकुनी,

---

१. सुंदर गुणसमुदायानें बद्ध झालें चित्त ज्याचें. २. हंसी. ३. सरोवरांत. ४. शरदृतूंत चांदण्या रात्रीं राजसदनाचे गच्चीवर. ५. कमला, लक्ष्मी. ६. श्रेष्ठा; वृत्ताचें नांव. ७. गर्जना ऐकून.

विसर्जूनी प्रोद्यन्मदमलिनगंडा[1] गजतती[2]
न त्या पंचास्यांचे[3] खर नखर अन्यत्र रुतती. ५५
व्याघ्री मार्जार खाती निजशिशु ह्मणुनी ऐकिलें देखिलेंही,
क्रौर्यें तुझ्या तुलेला[4] तरि पशुगण हा सर्वथा येत नाहीं;
तूं तो गर्भस्थ हो, वा शिशु, जरठ, युवा, प्रौढ, पौगण्ड[5], जीर्ण[6],
सर्वांतें एकरूपें चट गट करिशी तारतम्याविहीन ! ५६
वया होतां साठी बुध ह्मणति नाठी मति फिरे,
बघूनी त्वद्वृत्ता गमत मम चित्ता वच खरें;
कृतीं, त्रेतीं, कार्ष्णीं[7], परिणतवया[8]वीण इतरा
न तूं बाधा देशी, परि कलियुगीं मार्ग दुसरा ! ५७
मोठा खाशाड वैश्वानर ह्मणति परी त्यासही जाड्य झालें,
अर्पूनी खांडवा[9] जें त्वरितचि तिसऱ्या पांडवें दूर केलें;
नाहीं बोभाट तुझा, सकल पचविशी, होउनी वृद्ध जीर्ण,
जों खाशी तों अधाशी अधिकचि बनशी, आस्य तों तों विदीर्ण[10] !
तुला ‘ राजा ’ कोणी ह्मणति दुसरे ‘ धर्म ’ वदती,
तसे कोणी कोणी ह्मणाति ‘ समवर्ती ’ ‘ पितृपती; ’
गलिच्छा धर्मघ्ना विषमचरणा[11], वत्सकदना[12] !
तुला ऐशा संज्ञा रुचतिल कशा ? दुःखसदना ! ५९
जैसें क्रूरत्व तुझें निरुपम भुवनीं मौर्ख्यही पूर्ण तैसें,
निर्मूनी सृष्टि तूंची गट गट करिसी वृत्त हें सांग कैसें ?
लावाया आग कोणीं जरि गृह रचिलें संज्ञिती ‘ मूर्ख ’ त्यासी.
बा काळा ! त्वत्प्रजेतें जरि गट करणें व्यर्थ कां निर्मितोसी ? ६०
जैसें अग्नींत सोनें विघरुनि फिरुनी तेथ सोनार घाली,
तेणें होऊनि सारें हिण दुरि, उरतें शुद्ध बावन्न खालीं;
वाटे अग्नींत तैसे जन फिरफिरुनी घालिसी याच हेतू,
उत्क्रान्ती[13] होय जेणें तरि तव कृति हा आमुचा दुःखसेतू. ६१
होता ना हेतु ऐसा तव हृदयिं तरी निश्चयें विश्वयंता,
स्वैराचारास तूझ्या नियमित करुनी विश्वपीडेसि हर्ता;

---

१. वाहणाऱ्या मदानें मलिनगंड. २. हस्तिसमूह. ३. सिंहाचे. ४. तुलनेस. ५. अल्लड. ६. जुनाट. ७. कृष्णाचें युग द्वापार त्यांत. ८. वृद्धांवांचून. ९. खांडववनास. १०. वासलेलें. ११. विषमाचरणाचा. १२. पोरांस मारणारा. १३. क्रमशः सुधारणा.

जातांही कल्प कोटी अधिकृतचि तुला ठेवियेलें तयानें,
तस्मात् सद्धेतु तुझा अभिमतचि तया; प्राप्त हें [1]न्यायमानें. ६२

समाधान.

जरी केली कीटें कवळुनि मुखीं ध्वस्त कलिका,
तरी तीचा राहे परिमल सदा ज्ञात रसिका,
तशी नेशी माझी जरि हरुनि तूं दिव्य कमला,
तरी नांदे तीची सुचिर भुवनीं कीर्ति विमला. ६३
वृक्षाची महती कळे त्रिजगतीं आल्यासि पुष्पें फळें,
आम्रातें ह्मणती रसाल, फल ते [2]वर्षीं जरी मावळे;
तैशी ही कलिका विकासुनि जरी तत्काल गेली लया;
झाली मत्कुलकीर्तिहेतु सुखदा ही ईश्वराची दया. ६४

## नारायण वामन टिळक.

जन्म–इ. स. १८६५.

रा. रा. नारायण वामन टिळक यांचीं १ मनीषाशतक, २ कुरुक्षेत्र, ३ सुधारणासाहस्र, ४ ध्रुवाख्यान, ५ सावित्री, ६ गजेंद्रमोक्ष, ७ फिरंग्याचें संगीत, ८ नीतिशतक अशीं मोठालीं काव्यें आहेत. हीं बहुतेक अमुद्रित आहेत. रा. टिळक यांचीं शेंकडों स्फुट काव्यें आहेत. त्यांपैकीं अनेक विविधज्ञानविस्तार, मासिकमनोरंजन, काव्यरत्नावली, बालबोधमेवा, सुविचारसमागम इत्यादि पुस्तकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. यांची कविता बहुतेक स्वतंत्र आहे; आणि थोडीशी इंग्रजीवरून व संस्कृतांतून मराठींत उतरलेली आहे.

### १. नाममहिमा.

श्लोक.

प्रभो, मधुर नाम हें तव किती तरी भावुका !
नसे रस असा दुजा जगिं तयाप्रती ठावुका.
व्रणांस बजवी, हरी भयविपत्ति, दुःखा हरी,
प्रभो, पतनसज्ज जें मन तयास तें सांवरी. १

१. न्यायशास्त्रांतील प्रमाणानें. २. वर्षाकाळीं.

प्रभो, क्षुधित जे तयां मधुर नाम दिव्यान्नसें !
श्रमें गलित जाहल्या सुखद तें विसावा जसें !
अगा प्रिय सख्या, प्रभो, मम गुरो, अगा जीवना !
तुझा स्तव करीन मी सतत मद्धना ! मन्मना ! २
मदीय मतिचे वृथा सकल यत्न हे वाटती,
विचार मम थोरही तुजपुढें, प्रभो हे किती !
तुझी स्तुति कुठून रे मज अशा जडा साधती ?
तथापि मज बोलवी तव पदारविंदीं रती. ३
प्रभो, श्वसन एकदा, स्तुति तुझी पुन्हा एकदा,
असा क्रम धरीन मी, मज नको दुजी संपदा.
तुझ्यासम सखा कसा कधि कुणा कुठें सांपडे ?
सदा तव कृपालुता कथिन ह्यापुढें त्यापुढें. ४
प्रभो, जगत मर्त्य हें त्यजुन, मर्त्य देहाप्रती
त्यजून तुझियाकडे वरिल अंतिं आत्मा गती.
तयास समयीं तया मधुर गान तें आठवो,
निगूढ तव नामिं जें, पुढतिं तेंच तो चालवो !

राठी ग्रंथ सं ठाणे.

---

## २. कवि.

### गीति.

न कळे कोठुन होते लतिकेच्याठायिं पुष्पपरिपूर्ति;
नकळे केव्हां कैशी होते कविच्या मनाप्रति स्फूर्ति.
नकळे कोठुन येती द्विजराज नवे वसंतकालीं ते;
नकळे कोठुन येती धांवत नव शब्द भेटण्या कवितें. २
नकळे कोठुन येतें शोभा द्यायास हास्य अधराला;
नकळे कोठुन येतो प्रसाद कविच्या नवीन काव्याला. ३
तारांगणिं कवि खेळे चंद्रासह करि विनोदहास्यांतें;
वाणी प्रेमानंदें चुंबी त्याच्या प्रसन्न आस्यातें. ४
बोलति फुलें तयासह पक्षी करिती अनेक गुजगोष्टी;
ये काढ चित्र माझें सांगे त्या कामरूपिणी सृष्टी. ५
येतां पूर नदीला थांबे तो काय दोन हातांना ?
ऐसा कोण ह्मणे जो थांब कवीला स्वकाव्य गातांना ? ६
आलाप कोकिलांचे इतुक्या कालांत जाहले इतुके;

निर्झरगान गणावें कोणीं वर्षांत जाहलें तितुकें ? ७
घटपट खटपट झटपट लटपट ऐशा उगाच शब्दांतें,
झुळवाया कवि न परी नरकपि खर्ची अनेक अब्दांतें. ८
वर देवदूत बसले कविहृदयाच्या धरून कीलातें,
नाचविती करवीती कविवाणीच्याकडून लीलांतें. ९
याचा गर्व कशाला ? बोलविता तो धनी निराळा हो,
कविच्या द्वारां रसिकां काव्यरसाचा करून दे लाहो. १०

---

## ३. सारीं फुलेंच फुलें !

### श्लोक.

आकाशांत फुलें, धरेवर फुलें, वाऱ्यावरीही फुलें,
माझ्या गेहिं फुलें, धरेवर फुलें, भूगर्भि सारीं फुलें !
माझें चित्त भुले, सुगंध सुटले ! हें विश्व आनंदलें !
कोणीं आकळिलें ? कुणास कळलें उद्यान विस्तारलें ? १
नक्षत्रें, सुमनें, विहंगम, मुलें, काव्यें, मणी ! हीं जरी
नांवें भिन्न, खरोखरी मज फुलें हीं रम्य सारीं तरी !
घेतों ह्यांतून थोडका रस ! पुन्हां त्याच्याकडे धांवतों,
धांवाधांव ह्मणा, परी हिजमधें कैवल्य मी पावतों ! २
जातीच्या भ्रमरास " सोडुन फुलें ये फोड हीं लांकडें ! "
ऐसें कोण ह्मणेल ? कोण भलतें घालील हें सांकडें ?
देवानेंच ज्यास पुष्पहृदयीं खेळावया निर्मिलें,
त्याला वृत्ति दुजी सुचेल कुठुनी ? प्राणा जरी घेतलें ! ३
बोला ' चंचल हा क्षणांत गगनीं धांवे क्षणें भूवरीं !
हा वाऱ्यावर ! हा गृहीं ! निजमनीं ! हा भूमिच्या भीतरीं ! '
हासा मानुनियां निरर्थ मम हो ह्या गोड गुंजारवा
माझें जन्मच हें फुलां निरविलें ! भीतों न मी मानवा ! ४
मज गमें मजसाठिं जगत्पती, फुलवितो अवघ्या जगताप्रती !
भ्रमर मी रस सांठवि चाखुनी, मजसमान रसज्ञ न हो जनीं ! ५
जाइन सोडुन ह्या जगताला, ठेवुन हा मधुकोश तुह्मांला;
तोंवर आड नका मज होऊं ! पाप नका कुणि हें शिरिं घेऊं ! ६

---

## ४. स्वदेशप्रेम.

### श्लोक.

मंदारमाला. ]

सृष्टी तुला पाहुनी धन्य माते अशी रूपसंपन्न तूं निस्तुला !
तूं कामधेनू ! खरी कल्पवल्ली सदा लोभला लोक सारा तुला;
ह्या वैभवाला तुझ्या पाहुनीयां मला स्फूर्ति नृत्यार्थ होई जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! १
माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते तुझे, शूर योद्धे तुझे, सत्कवी,
श्रेणी ययांची सदा माझिया गे मना आपुल्या पूजनीं वांकवी;
यांचीं यशें ज्या नव्या सद्गुणांना मला अर्पिती ध्येय ते गे जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! २
तुझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी !
झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी !
माते गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें यांत शंका न कांहीं जरी,
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! ३
वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला मला लाधला भाग्य हें केवढें !
माते स्वयें देशि जें अन्नपाणी सुधा बापुडी कायशी त्यापुढें !
तूं बाळगीशी मला स्कंधिं अंकीं सुखाची खरी हीच सीमा जरी,
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी तसें पाहिलें मीं न कोठें तरी ! ४

---

## ५. तो आम्हांला भ्याला.

### साकी.

मधेंच लपवी सस्मित वदना तरुपर्णांच्या आड,
खदखद हासे, इंदू ऐसे सृष्टीसह करि लाड ! १
नभोविहारी पूर्णचंद्रमा नामी लीला दावी,
अंध अरसिकांवांचुन इतरां वेड आपलें लावी ! २
युवजनयुवती मनीं रंगल्या, कैरवपंक्ती धाल्या,
प्रस्तरांतुनी कविजन ह्मणती प्रेमोर्मीहि निघाल्या ! ३
पतित चोर रात्रिंचर दुसरे ह्मणती ‘ वैरी आला ’
कोणी कांहीं ह्मणो, न परवा त्याची शीतकराला ! ४
असो, पहा हे परंतु जमले ग्रामसिंह अति नीच,
ह्मणती “ देऊं हांकुन याला ! धन्य तरी आह्मीच ! ” ५

सारे मिळुनी बळें भोंकती वृद्ध तरुण कीं पोरें !
दांत काढुनी ह्मणती " चंद्रया पाहीं तीक्ष्ण कसे रे ! " ६
जों जों हांसे अधिक चंद्रमा तों तों अधिक बळानें
आरडती हे, मरतिल वाटे अंतीं उरफुटल्यानें ! ७
त्रासुन कोणी दंड हाणिती, शिलाशकलही कोणी,
दाद न त्याची ! " घेऊं चंद्रा " ह्मणती हे " हां कोनी. " ८
रजनी सरली परमेशाच्या नियमाला अनुसरुनी,
आनंदानें जाय चंद्रमा लोकांतरा निघोनी ! ९
ग्रामसिंह ते परंतु चित्तीं धन्य आपणां ह्मणती,
ह्मणती " भिउनी कसा पळाला आह्मां चंद्रच अंतीं ! " १०

---

## ६. नर्तन.

चाल—सुकुमार, असुनि तूं फार—

नर्तना, हर्षवर्तना करीना प्राणी,
नच दुजा अभागी त्यासम जागीं कोणी ॥ ध्रु० ॥
ही धरा, दिसे सुस्थिरा, तरी ही नाचे,
रविभोंतीं चालू रंगण हें हीचें.
हा शशी, पहा दिननिशीं, पृथ्विच्या भोंतीं,
करि नृत्य नाचवी तया हिची प्रीती
हे खगोल वेडेपिसे भासती,
हे सदा नर्तनीं कसे रंगती,
क्षण विश्रांतीची नसे यां स्मृती,
बघ गडे, या ढगांकडे, नाचती सारे,
ही नाचे चपला, नाचतात वारे ! १
पशुपक्षि, नाचती लक्षि, अरण्यहि नाचे,
हे चलत्तृणांकुर पुलक जणूं ह्याचे !
तरुलता, नर्तनीं रता, नाचती पर्णें !
हे भ्रमर नाचती, नाचतात सुमनें !
या सरिता नर्तनपरा पाहतों !
हा सिंधु लहरी खरा नाचतो,
हा प्रेमें नारीनरां सांगतो,
मजनृत्य, आवडे नित्य, असो मज भरती,
कीं जावो रुसुनी खुशाल ती परती ! २

बाहिरीं, तसे अंतरीं, नाचतें सारें,
जा मनःसृष्टिला विचार परभारें.
नाचती, जगीं अनुरती, संस्तृती ह्मणती,
हे लोक तीमधें रंगुनियां जाती !
दे सोडुन वेडेपणा, ये पुढें,
कर माझ्या करपीडना, ये पुढें,
करुं आपण मधुनर्तना, ये पुढें,
इह परत्र, चालवूं सत्र, नृत्यगीताचें,
हें कार्य खरोखर कवीश जे त्यांचें ! ३

---

## ७. कुणास्तव कुणी तरी.

### श्लोक.

सरोष घन वर्षती तरुलतांशि वारा झुजे,
विराम नच ठाउका क्षणहि नाचतांना विजे,
भयानकचि संचरून करि सृष्टिला घाबरी,
कुणास्तव कुणी तरी सभय वाट पाहे घरीं ! १
रवप्रतिरवामुळें बधिर जीव सारे जरी,
निनाद करितें अहा श्रवण चाहुलीचा तरी,
उठे दचकुनी तडित् दुसरि नर्तनाला करी,
कुणास्तव कुणी तरी कितिक येरझारा करी ! २
खुशाल कर वृष्टिला तुज न तो भिणारा घना,
पिशाचसम तूं खुशाल कर गे विजे नर्तना,
महीधर समीरणा धरुन लोळवीं भूवरीं !
कुणास्तव कुणी तरी निघत जावयाला घरीं. ३
घनप्रसर माजला नभिं न एक तारा दिसे,
परंतु हसरा सदा सुखद चंद्र गेहीं वसे,
अहा द्रववितो कुणा सतत चंद्रकांताप्रती,
कुणास बघुनी कुणी तरि हसेल हर्षें किती ! ४
अहा चरणधावना कलश पूर्ण उष्णोदकें,
रुचिप्रद वरान्न जें करिल हो सुधेला फिकें !
फुलांहुन मऊ असें शयन रम्य मंचावरी !
कुणास्तव कुणी तरी घरिं अशी तयारी करी. ५

रसाळ वचनावली विविध तोंडिं लावावया
मिळेल, उपमा उरे न मग भोजनाला तया;
पडेल मग विस्मृती सकलही श्रमांची क्षणीं,
कुणाप्रति कुणी तरी निरखितां प्रसन्नेक्षणीं. ६
तया प्रणयनिर्झरा प्रणयनिर्झरीला तिला
सदा सुखद भोंवरा विरहण्यास ऐशा मुला,
बळेंच उठवी कुणी! उभयतांस आलिंगुनी;
कुणी तरि धरील तें विषय अन्य कैंचा मनीं! ७
तमास अपसारुनी उन पडेल त्या मंदिरीं
तशांत पडतील हो मधुन पावसाच्या सरी!
कुणी तरि धरोनियां कर करीं कुणाचा तरी!
स्तवील परमेश्वरा जलद सूर्य ज्याच्या करीं! ८

---

## ८. एक अमेरिकन मुलगी.

### श्लोक.

पाठीवरी रुळति धूसर मुक्त बाल, जैसे गुलाब फुलले दिसतात गाल;
विस्तीर्ण हें निडळ पानच केवड्याचें, जेथें सुभाग्य मतिमत्त्व खुशाल नाचे १
ह्या केवड्यावर अली बसले मधून, तैसेचि हे कुरळ शोभति दोन तीन;
ह्या रम्य वक्र भिंवया ह्मणतात 'येथें थारा नसे कृपण दीन मनोरथांतें!' २
साधें प्रसन्न मधु बाल्य करी विहार, नेत्रांत जें करि तयांप्रति लोल फार
रत्ना तुझें हरपलें जणुं सर्व पाणी, हीं रम्य दीर्घ नयनें गमतें बघोनी! ३
हें नेत्र सुंदर दिसे मज चारुतेचें, सारल्य अग्रनतिमान अपूर्व ज्याचें;
सोत्कंठ नासिक हिचें ह्मणतें जगाला, आर्यान्वयोद्भव खरोखर रम्यबाला ४
किंचित् प्रभातसमयीं कळिनें फुलावें, कीं अंतरंग लपवून पुढें करावें;
हें हांसरें मुख हिचें करि तीच लीला, दावी पुन्हां लपविते रदनावलीला! ५
आरक्त ओष्ट जणुं वेलच पोंवळ्यांचे, तेही गमे विरमतील पुढें तयांचे;
किंचित् विभक्त दिसती जणुं सांगताती, निश्चित निर्मल सुखी किति बालवृत्ति
वाटे उषाच हंसते फिरते जगांत! कीं स्फूर्ति हीच कविची मधुरूप घेत!
अव्याजता रसिकता जणुं मूल झाली! स्वर्गांतुनी सहज भूवर आज आली! ७

## ९. विरह.

### श्लोक.

गगन नटलें हें तारांहीं मनोरम हो जनां,
  असह परि हें देतें माझ्या मनाप्रति वेदना;
नच गवसते येथें तारा मला प्रिय ती जरी
  अम्रुन नसुनी व्यर्था साऱ्या दुज्या मजला तरी ! १
मधुर कुसुमें हीं उद्यानीं स्मिता करिती किती,
  कितिक हंसती बोलावीती किती रसिकांप्रती !
परि सुमन तें माझें साधें दिसे न मला इथें !
  अरसिकच मी येथें माझें न हो मन लागतें ! २
सतत नटली ही रत्नांहीं अनर्घ्य वसुंधरा,
  प्रिय मम परी रत्नांला ही न दे स्मयनिर्भरा;
मज ह्मणतसे हें घे तें घे खरोखर ही पिशी,
  हिजशि न कळे सौंदर्याची प्रसू ममता कशी ! ३
सरस सरला सालंकारा नव्या गुणसुंदर
  कृति मजपुढें मांडीती हे उदार कवीश्वर;
परि मज जिनें वेडा केला न ती मज दाविती
  अरसिक पुरा अन्यीं मी हें कवीहि न जाणती ! ४
बुध ह्मणति कीं ह्या कालाच्या तटीं दुसऱ्या वसे
  प्रिय तुजसि तें जा तूं तेथें उपाय दुजा नसे;
मम मन परी गेलें आहे पुढें परतेल तें
  कधि तिथुन हें सांगा आधीं मला बघुं जाणते ! ५

---

## १०. वृक्षान्योक्ति.

### श्लोक.

फुलें आलीं नामी मधुतर रसें पूर्ण भरलीं,
  सुवासें सौंदर्यें अनुपम जगामाजि ठरलीं;
अली आले, झाले मुदित रसपानें तरुवरा,
  नरां संतर्पीलें, परहितपरा तूं गुरु खरा ! १
फळें आलीं, आली विविधविहगाली तुजकडे,
  क्षुधा तीच गेली, वदलि तुज आशीर्वच गडे !

कुणी काठी हाणी, कुणि दगड टाकी तुजवरी
तरी सर्वां देशी स्वधन; मति मोठी तव खरी ! २
फळें गेलीं; आतां सहुन सगळा आतप शिरीं
विसावा श्रांताला निरविसि जरी निष्फळ तरी;
फळें, पानें, पुष्पें सकल तव तें वैभव सरे,
तरी तूझी वृक्षा परहित सरेना ! परि उरे ! ३
निजांगाचीं खांडें भयंकर कुठारें करविशी;
परासाठीं साधो, ज्वलदनलकुंडांत पडशी !
अहा ! वृक्षा लक्षावधि जनसमूहीं न दुसरा
महात्मा हा ऐसा सतत इतरां अर्पित नरा ! ४

---

## ११. कोण सांगेल नांव ?

### श्लोक.

दुःखक्षेत्रीं अविरल अशी वृष्टि हो आसवांची,
जेव्हां तेथें उगवुनि पुढें जें वियोगोष्ण जाची;
तेव्हां होई सुफलित जिची नित्य आस्वर्ग धांव,
ऐशी विश्वीं अमरलतिका ! कोण सांगेल नांव ? १
जीच्या स्पर्शें सहज उडुनी पांगळा धांव मारी !
मूका गानस्फुरण ! जगतीं दृश्य अंधास सारी !
जीच्या स्पर्शें मृततनुमधें संचरे दिव्य जीव !
ऐशी मात्रा अनुपम जगीं ! कोण सांगेल नांव ? २
वेडा लोकीं परि करितसे शाहणा अंतरंगीं,
"मी तूं" सारें हरुन मनुजा रंगवी एक रंगीं !
ज्याची झाली सुखद मग त्या लोक सारेच दिव्य,
आहे जादू खचित असली ! कोण सांगेल नांव ? ४

---

## १२. महारथी.

### श्लोक.

तुझ्यासमें महारथी बघुन एकला निष्क्रिय,
अहर्निश गड्या मला परम दुःख हो विस्मय;
पुढें रथ विलोलसा सुखद दिव्य संसार हा
असून मुनिसारखा नच असा बसोनी रहा ! १

बनेन तव सारथी तुज जपेन जीवापरी
असो सरल मार्ग वा गिरि असो, असो वा दरी!
जगज्जनकयोजना तशि मदीय उद्योगिता
रथा सबल अश्विनी, करुं नको विलंबा अतां!
पहा "इह" "परत्र" हीं उभय रम्य चक्रें किती!
न केवळ विभूषणें परि रथास देती गती;
सदा तुजपुढें उभा जुळुन मी करां सारथी,
त्यजून भय हो पुढें धर बघूं सुवीरा धृती!
तुला मृदु विशेषणीं पुरुष नित्य संबोधिती;
ह्मणून दिसतें मला तवहि भीरु झाली मती!
पुरे! त्यजुन मोह हा समजुनी स्वरूपा निजा
स्वकार्यरत हो सदा; अनुग सारथी मी तुझा!

---

## १३. एक सुंदर कवि.

### पद.

चाल—मालिन वस्त्र परिधान करितसे—

कवी! खरा हो कवी गातसे सदैव कविता नवी,
संसृतिकोलाहलें त्रासल्या जीवाला रंजवी॥ ध्रु०॥
पुनरावृत्ती दोष म्हणा हो! कुणी पाहिजे तरी,
विविधार्थांची गिरा द्विजाची मनोहरा मज खरी,
मीच कशाला? दिशा हांसती, शिरा तरू डोलवी,
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी. १
एका तरुला कुशल विचारी, दुसऱ्याला हांसवी,
करि रोमांचित एक लतेला, दुसरीला लाजवी,
फुलांसंगतीं खेळे ओंव्या गाउनि त्यां खेळवी,
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी! २
क्षणांत वरतीं क्षणांत खालीं स्फूर्ति यास नेतसे,
अंतर्यामीं क्षणांत गातो हंसतो फूलाचि जसें,
लीला याच्या सांगति कीं हा कवी खरा सत्कवी,
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी! ३
निंदास्तुतिच्या सवद्यासाठीं रचना याची नसे,
भक्तिरसीं हा निमग्न याला स्फूर्ति देव देतसे.

राठी ग्रंथ संग्रह ठाणे

कविता माझी जळो! मला हा पक्षिराय लाजवी,
'हीच वृत्ति दे,' प्रभुपाशीं हें मजकडुनी मागवी! ५

---

## १४. पर्वतारोहण.

या पदांत वाईपासून पांचगणीपर्यंतच्या प्रदेशाचें वर्णन आहे. दिवस उन्हाळ्याचे असून वेळ सकाळची आहे.

चाल—नच दृष्टिस पडती ते सज्जन—

प्रिये प्रेरणे! थांब गडे हा पहा लागला गिरी,
अरसिके धांवसि कां वरिवरी? ॥ ध्रु० ॥
हळू हळू चल चित्र काढुनी ठेवूं हृदयांतरीं,
सखी तें रंगवील वैखरी;
पहा पहा हा उभा राहिला भास्कर वेळेवरी,
बांधुनी मंदिल शिरिं भरजरी.
चाल–ही पूर्व दिशा गे गुलाल उधळीतसे,
ही हसे, सृष्टि गे पुलकित झाली दिसे,
रविकरस्पर्शनें डोळे उघडीतसे,
पहा पहा हा शकट आपणां घेउनि चढतो वरी
इकडे पर्वत इकडे दरी.
हास्य गिरीला सोडुनि गेलें! निर्झर कीं वाळले
ग्रीष्में वैर कसें साधिलें!
रम्य आरसे सृष्टिसतीचे फुटले गे हरपले,
गिरीचें अंगवस्त्र लोपलें.
चाल--हा वैभवनाशें खिन्न दिसेना जरा,
हा गांभीर्याचा पुंज उभा साजरा,
घे यांतुनि थोडें अगा मना पामरा,
पृथ्वीवर हा वसे परंतु सारी दृष्टी वरी!
इकडे पर्वत इकडे दरी!
नकळे हृदयीं काय परी हा उंच धरीतो शिरा?
गुरु हा उन्नत दांभिक नरा;
न जाणतां मी उगाच नांवें कां ठेवूं गिरिवरा,
आंतलें ठाउक परमेश्वरा.
चाल--बाहेर दिसे जें ज्ञेय क्षेत्र मानवा,

नच कांहिं झांकलें एक सृष्टिच्या धवा,
मग कां निंदेनें ही जिव्हा बाटवा,
पर्वतराया दुरुत्तराची क्षमा मला ह्या करीं,
इकडे पर्वत इकडे दरी. ३

घांट पाट हा जणुं शोभेचा वहात आला दिसे,
कांची वनदेवीची वसे.
शूर शिपाई अपुला ह्मणुनी सृष्टी ज्या देतसे,
असा हा पट्टा गिरिचा असे.
चाल—कीं भांग सृष्टिच्या विगलित वेणींतला,
कीं अन्तःपट हा गिरिदरियुग्मांतला,
हा कुंकुम पडुनी ईषदरुण जाहला,
वर खालीं वा जाण्या पथ हा नरजन्माचे परी,
इकडे पर्वत इकडे दरी. ४

रंगदार गालिचे पूर्वीचे गुंडाळुन ठेविले,
जुने हे जागजागिं पसरिले;
ग्रीष्म भिकारी घरासि येतां ही सृष्टी यापरी
तयाच्या अपमानाला करी.
चाल—ही असली बैठक दरींत केली असे,
कीं मलिन पटाला नेसुनि सृष्टी वसे,
हीं तुटुनि तोरणें तुकडे पडले जसे,
लाज कुठें तव ? जा जा ग्रीष्मा ! परत घरीं लौकरीं,
इकडे पर्वत इकडे दरी. ५

प्रिये प्रेरणे ! रुसूं नको गे ! थांबविलें तुज तरी,
'डोंगर दुरुन रम्य !' सुंदरी.
सहजमनोहर सृष्टी येथें रुसुनी ग्रीष्मावरी,
दुःखद रूप असें हें धरी.
चाल—तरि एकांतीं हिज भेटूं चल मग तुला,
समजेल हिच्या गे लावण्याची कला,
मग ह्मणशिल झाला भ्रम हा झाला भला,
होइन वेडा तें पाहुनि मी सांभाळुनि तें धरीं,
इकडे पर्वत इकडे दरी ! ६

## १५. माझे दशावतार.

पद.

धांव परेशा अनन्यपुरुषा आशा तव बा मला,
धांव रे धांव विभो ! प्रेमला ! ॥ ध्रु० ॥

जननीजठरीं मत्स्य जसा मी करचरणांवांचुनी
रक्षिसी मज तेव्हांपासुनी;
कच्छच झालों गर्भीं लघुतर करचरणां पावुनी
नटलों वराह मी वाढुनी.
॥ चाल ॥ नर असुनी केली सिंहासम मी कृती,
बाहिर पातलों स्तंभा[1]प्रती,
नरसिंह जाहलों विमुक्त मी संप्रतीं,
गेलों विसरुन दया तुझी ती मोह मला झोंबला
कशाचा ओळखितों मग तुला ? १

वामनमूर्ती गोजिरवाणी नयनीं मम पाहुनी
लोभले वडिल सदा लालनीं;
तेव्हां नाहीं तुजला स्मरलों सरलों बाल्यांतुनी
मग मी शिरलों यौवनवनीं.
॥ चाल ॥ मग स्वाभिमान हा परशू मीं घेतला,
मज भासे तेव्हां परशुराम मी भला,
हा काळ परी मम लौकर गत जाहला,
गृहदारासुतविषय पसारा हर्षभरें कर्षिला
खरोखर कृ[2]ष्णपणा ये मला ! २

जग ओळखिलें राम होउनी रमलों एक्या स्थलीं;
मला मग धर्मनीति सूचली;
गेलें वय हें अनुभव आला वृद्धपणीं बुधपणा
पावलों त्यजिला मीं मीपणा.
॥ चाल ॥ तुज शरणागत मी तार तार ये मला,
मी पुरता क[3]ल्की अगा प्रणतवत्सला !
ये, पतितपावना ! पाव अशाही खला,
व्यर्थ पसारे सारे तुजविण बोध अतां जाहला,
धांव रे धांव विभो ! वत्सला ! ३

---

१ अटकाव करणारें जें तें, किंवा खांब. २ ओढून घेणारा. ३ पापी.

## १६. सत्संग.

### पद.

चाल—देइ आराम हा राम घ्या नाम—

हा[1] सत्संग बा सांग कायँ नराचीं साधी न ऐशीं जगीं कोणतीं? हा सत्संग!॥ ध्रु०॥

हा बुद्धिमांद्याप्रती दूर सारी,
वाणीवरी हा सदा सत्य पेरी,

मानास देई सदा उन्नती, हा सत्संग बा सांग कायँ नराचीं साधी न ऐशीं जगीं कोणतीं? हा सत्संग!

सारी दुरी पाप, संमोह संताप,
चित्तास आपाप, हा हर्षवी.

हा सत्संग बा सांग कायँ नराचीं साधी न ऐशीं जगीं कोणतीं? हा सत्संग

कीर्ती नराची करी सर्व लोकीं, व्यापोनि तीनें दिशा सर्व टाकी,

ही सज्जनाची गड्या संगती! हा सत्संग बा सांग कायँ नराचीं साधी न ऐशीं जगीं कोणतीं? हा सत्संग! १

---

## १७. सर्व शास्त्रांना मान्य अशा गोष्टी.

### पद

चाल—बघुनि त्या भयंकर भूता फोडिली तिनें किंकाळी—

ऐकतां नांव हिंसेचें, तेथुनी दूर सरकावें,
धन[2] कधीं नको परक्याचें, हें मना नित्य बोधावें॥ ध्रु०॥
जें खरें तेंच बोलावें, देववे दान तें द्यावें,
इतरांच्या ललनांविषयीं, सर्वदा मुकें राहावें. १
कीं ओघ वासनेचे जे ते पदोपदीं भंगावे,
जे वडिल तयां सर्वांशीं लीनता धरुन वागावें. २
जे जीव जगीं देवाचे त्यांविशीं दयाळू व्हावें,
दृढ मनीं बोध हा धरुनी भवपथांतुनी चालावें. ३
हा विधी सर्व शास्त्रांना सामान्यपणानें भावे,
यांहुनी थोर कोठोनी कल्याणमार्ग आणावे? ४

---

१ जाड्यंधियो हरति सिञ्चति वाचि सत्यं इत्यादि भर्तृहरिकृत श्लोकावरून; २ प्राणाघातान्निवृत्तिःपरधनहरणे संयमः सत्यवाक्यं इत्यादि भर्तृहरिकृत पद्याचें रूपांतर

# कृष्णाजी केशव दामले.

जन्म-इ. स. १८६५, मृत्यु-इ. स. १९०५.

रा. रा. कृष्णाजी केशव दामले हे केशवसुत या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांची विविधविषयांवरील स्फुट कविता प्रसिद्ध आहे. काव्य-रत्नावली, मासिक मनोरंजन इत्यादि मासिक पुस्तकांतून यांची कविता प्रसिद्ध झाली आहे. तिच्यांतून कांहीं उतारे खालीं दिले आहेत.

## १. सतारीचे बोल.

पादाकुलक वृत्त.

काळोखाची रजनी होती, हृदयीं भरल्या होत्या खंती,
अंधारांतचि गढलें सारें, लक्ष न लक्षी वरचे तारे,
विमनस्कपणें स्वपदें उचलित, रस्त्यांतुन मी होतों हिंडत,
एका खिडक्यांतुनि सूर तदा, पडले "दिड दा! दिड दा! दिड दा!" १
जड हृदयीं जग जड हें याचा, प्रत्यय होता प्रगटत साचा,
जड तें खोटें! हें मात्र कसें? तें न कळे;-मज जडलेंच पिसें.
काय करावें, कोठें जावें, तुमजें मजला कीं विष खावें!
मग मज कैसे रुचतील वदा, ध्वनि हे "दिड दा! दिड दा! दिड दा!"२
सोसाट्याचें वादळ येतें, तरि तें तेव्हां मज मानवतें!
भुतें भोंवतीं जरि ओरडतीं, तरि तेव्हां तीं मज आवडतीं!
कारण आन्तर विषण्णवृत्ती, बाह्य भैरवीं धरिते प्रीती
सहज; कसे तिज करणार फिदा, रव ते "दिड दा! दिड दा! दिड दा!"३
ऐकुनि ते मज जो त्वेष चढे, त्यासरशी त्या गवाक्षाकडे,
मूठ वळुनि मीं हात हिसकिला, पुटपुटलों किति अपशब्दांला!
वदलों-" आटप! आटप मूर्खा! सतार फोडुनि टाकिसी न कां?
पिरपिर कसली खुशालचंदा करिसी "दिड दा! दिड दा! दिड दा!"४
सरलों पुरता चार पावलें, तों मज न कळे काय जाहलें!
रुष्ट जरी मी सतारीवरी, गति मम वळली तरि माघारी!
ध्वनिजालीं त्या जणूं गुंतलों, असा स्ववशता विसरुन बसलों!
एका ओट्यावरीं स्थिर तदा, ऐकत "दिड दा! दिड दा! दिड दा!"५
तिथें कोंपरें अंकीं टेंकुन, करतलयुगलीं मस्तक देउन
बसलों; इतुक्यामाजी करुणा-रसपूर्ण गती माझ्या श्रवणां,

आकर्षुनि घे. हृदय निवालें, तन्मय झालें ! द्रवलें ! आलें
लोचनांतुनी तोय कितीदां, ऐकत असतां " डिड डा ! डिड डा ! " ६

स्कंधीं माझ्या हात ठेवुनी, आश्वासी मज गमलें कोणी,
म्हणे " खेद कां इतुका करिसी ? जिवास कां बा असा त्राससी ?
धीर धरीं रे, धीरापोटीं, असती मोठीं फळें गोमटीं;
ऐक ! मनींच्या हरितील गदा, ध्वनि हे "डिड डा ! डिड डा ! डिड डा ! " ७

आशाप्रेरक निघूं लागले, सूर, तधीं मीं डोळे पुसिले;
वरतीं मग मीं नजर फिरविली, नक्षत्रें तों असंख्य दिसलीं !
अस्तित्वाची यांच्या नव्हती, हा वेळवरी दादच मज ती !
" तम अल्प, द्युति बहु " ह्या शब्दां, वदती रव ते " डिड डा ! डिड डा ! " ८

वाद्यांतुनि त्या निघती नंतर, उदात्ततेचे पोषक सुस्वर,
तों मज गमलें विभूति माझी, स्फुरत पसरली विश्वामाजी !
दिक्कालासहि अतीत झालों ! उगमीं, विलयीं अनन्त उरलों !
विसरुन गेलों अखिलां भेदां, ऐकत असतां " डिड डा ! डिड डा ! " ९

प्रेमरसाचे गोड बोल तें, वाद्य लागतां बोलाया तें,
भुललों पाहुनि सकलहि सुंदर, सुरांगना तों नाचति भूवर !
स्वर्ग धरेला चुंबायाला, खालीं लवला ? मजला गमला
अशा वितरिती अत्यानंदा, ध्वनि ते " डिड डा ! डिड डा ! डिड डा ! " १०

शांत वाजली गती शेवटीं, शान्त धरित्री शांत निशीथीं !
शांतच तारे ! शांतच वारे ! शांतच हृदयीं झालें सारें !
शांत सुखें मी सदना आलों, शांतींत अहा झोंपीं गेलों !
बोल बोललों परी कितीदां, स्वप्नीं " डिड डा ! डिड डा ! डिड डा ! " ११

---

## २. कल्पकता.

खालच्या पद्यांत वर्णिलेली देवी ती कल्पकता होय. सर्व जग आपल्या आहारनिद्रादि ठरीव व्यवसायांत निमग्न असतां ती एकान्तांत बसून भारत-रामायणासारखीं काव्यें लिहिते; शाकुन्तल, हॅम्लेट, फॉस्ट् यांसारखीं नाटकें रचिते; गुरुत्वाकर्षणासारखे गहन शास्त्रीय सिद्धान्त सुचविते; आणि एडिसनच्या ध्वनिलेखकासारखीं यंत्रें तयार करिते ! तेणेंकरून नवीन आयुःक्रम पृथ्वीवर सुरू होतो आणि स्वर्ग पृथ्वीला जवळ होतो.

श्लोक.

खा, पी, नीज तसा उठून फिरुनी तें तेंच जा चिंतित,
आवर्तीं जग ह्या ठरींव अपुल्या होतें हळू रांगत;
एका दुर्गम भूशिरावरि परी देवी कुणी बैसली
होती वस्त्र विणीत, अद्भुत असें ती गात गीतें भलीं. १
होते शोधक नेत्र, कर्णहि तिचे ते तीक्ष्ण भारी, तसें
होतें भाल विशाल देवगुरुनें पूजा करावी असें!
सूर्याचीं शशिचीं सुरम्य किरणें घेऊन देवी सुधी
होती गोंवित इंद्रचापहि तसें त्या दिव्य वस्त्रामधीं! २
मेघाच्याहि छटा, तशीच कुटिला विद्युत्, तसे ते ध्वनी,
लाटा, पाउस, पक्षि, ते धबधबे यांतें पटीं ती विणी;
तारांचें पडणें, तसें भटकणें केतुग्रहांचें पहा,
सारें सुंदर भव्य घेउन तिनें तें वस्त्र केलें अहा! ३
आली भू कुतुकें तिथें, तिस तिनें तें वस्त्र लेवीवलें,
तों त्या वृद्ध वसुंधरेवर पहा तारुण्य ओथंबलें!
भूदेवी मग हृष्ट होऊन मनीं नाचावया लागली,
"आतां स्वर्ग मला स्वयेंच वरण्या येईल!" हें बोलली! ४

---

## ३. भाव, मूर्ति आणि कवीचा आत्मा.

श्लोक.

भूचक्राची घरघर जिथें ती न ये आयकाया,
आहे ध्यानाभिध रुचिर तो कुंज त्या शांत ठायां;
त्याचे द्वारीं उपवर वधू मूर्तिनाम्नी विराजे,
तीचे संगें वर परम तो भावशर्माहि साजे! १
होती पर्युत्सुक बहुत ती शीघ्र पाणिग्रहाला,
तेथें आत्मा भ्रमत कविचा तो उपाध्याय आला;
स्फूर्तिज्वालेवरि मग तयें होमुनि जीविताला,
लग्नाला त्या शुभकर अशा लाविता तो जहाला! २
गेलें कुंजीं त्वरित मग तें जोडपें दैवशाली,
केली त्यांहीं बहुविध सुखें त्या स्थलीं प्रेमकेली,
झालीं त्यांना बहुत मधुरें बालकें दिव्य फार,
तीं जाणा हीं--सुरस कविच्या कल्पि आणी विचार! ३

---

## ४. रांगोळी घालतांना पाहून.

### श्लोक.

होतें आंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर,
  बालार्कें अपुली प्रभा वितरिली नेत्रोत्सवा त्यावर;
तीची जी भगिनी अशी शुभमुखी द्वारीं सती पातली,
  रांगोळी मग त्या स्थलीं निजकरें घालावया लागली. १
आधीं ते लिहिले तिनें रवि शशी, नक्षत्रमाला तदा,
  मध्यें स्वस्तिक रेखिलें, मग तिनें आलेखिलें गोष्पदा,
पद्में, बिल्वदलें, फुलें, तुळसही, चक्रादिकें आयुधें
  देवांचीं लिहिलीं; न एक उरलें जें चिन्ह विश्वीं सुधें! २
होती मंजुल गीत गात वदनीं अस्पष्ट कांहीं तरी,
  गेला दाटुनि सर्व शान्तरस तो तेणें मदभ्यंतरीं;
तीर्थें, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना
  अन्तर्दृष्टिपुढोनियां सरकल्या;—संतोष झाला मना! ३
चित्रें मीं अवलोकिलीं अजवरी काव्यें किती चांगलीं,
  त्यांहीं देखिल न स्मरेचि इतुकी मद्वृत्ति आनंदली;
लीलेनें स्वकरें परंतु चतुरे! त्वां काढिल्या आकृती,
  त्या या पाहुनि रंगली अतिशयें ही आज माझी मती। ४
रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो आर्ये मला वाटतो
  स्पष्टत्वें इतुक्या अशक्य मिळणें काव्यांत चित्रांत तो;
स्वर्भूसंगम हा तयांत इतुक्या अल्पावकाशीं नसे
  कोणीं दाखविला अजून? सुभगे, हा साध्य तूतें असे! ५
आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व गे उज्ज्वल,
  तैसें स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल,
पावित्र्याप्रति गोष्पदें, तुळस ही; शोभेस हीं सारसें,
  पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे! ६
तत्त्वें मंगल सर्व हीं विहरती स्वर्गीं तुझ्या ह्या, अये
  आर्ये, तूं उपचारिकाच गमशी देवी तयांची स्वयें!
नातें, स्नेह, निदान ओळख जरी येथें मला आणिती
  होतों मी तरि पाद सेवुन तुझे रम्य स्थलीं ह्या कृती! ७
चित्तीं कल्मष ज्याचिया वसतसे ऐशा जना लागुनी
  ह्या चिन्हांतुनि हा निषेध निघतो आहे गमे मन्मनीं:—

" जा मार्गें अपुल्या, न दृष्टि कर ह्या द्वाराकडे वांकडी,
पापेच्छूवर हें सुदर्शन पहा आणील कीं सांकडीं '  ८
" आहे निर्मल काय अंतर तुझें ! मांगल्य कीं जाणशी ?
लोभक्षोभ जयें उदात्त हृदयीं व्हायास का इच्छिसी !
ये येथें तर, या शुभाकृति मनीं सांठीव अभ्यासुनी,
आर्यें, स्वागत हें निघे सहज ह्या त्वल्लेखनापासुनी  ९
साऱ्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे;
नित्याच्या अवलोकनें परि किती होती जगीं आंधळे !
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे,
कोठें स्वर्गसमक्षता प्रगटते हें नेहमीं पाहणें.  १०

---

## ५. फुलपांखरूं.

जेथें हिरवळ फार विलसते,
लताद्रुमांची शोभा दिसते,
तेथें फुलपांखरूं पहा हें–
सुंदर बागडते !  १

कलिकांवरुनी, पुष्पांवरुनी,
गन्धयुक्त अवकाशामधुनी,
पुष्पपरागा सेवित हिंडे–
मोदभरें करुनी !  २

तरल कल्पना जशी कवींची,
सुंदर विषयांवरूनि साची
भ्रमण करी, गति तशीच वाटे–
फुलपांखरांची.  ३

वा मुग्धेची जैसी वृत्ति.
पतिसहवास स्वभावरतीं,
विचरे फुलपांखराची तशी–
हालचालही ती.  ४

निर्वेधपणें इकडे तिकडे,
वनभूमींतुनी अहा ! बागडे,
त्याचा हेवा हृदयीं उपजुनि–
मन होई वेडें !  ५

तिमिरीं आह्मां नित्य रखडणें,
विवंचनांतचि जिणें कंठणें,
पुष्पपतंगस्थिति ही कोठुनि-
आह्मांला मिळणें ! ६

असे यास कां चिंता कांहीं ?
यास ' उद्यां ' चा विचार नाहीं,
अकालींच तो आह्मां न्याया-
मृत्युमुखीं पाही ! ७

बहु सौख्यांची कुसुमित सृष्टी,
तींत वसे हें, न कधीं कष्टी,
ग्रीष्माचें खर रूप विलोकी
नच याची दृष्टी! ८

' सर्व विनाशी असती प्राणी,
ही मज वाटे खोटी वाणी,
फुलपाखरूं—मरण पाहिलें—
आहे कां कोणीं ! ९

### श्लोक.

जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे,
गाणें मनांत मग होय सवेंचि जागें;
गातों ह्मणोनि कवनीं फुलपांखरांतें,
व्हायास सौख्य मम खिन्न अशा मनातें ! १०

---

## ६. थकलेल्या भटकणाराचें गाणें.

### पद.

फटक्याच्या चालीवर.

किती रहावें तुजविण आतां ? धीर न मजला क्षण धरवे !
गेलें गेलें वय हें वांयां ! मरणहि तें वाटे बरवें !
काय करावें मज न सुचे,
मुळीं न मजला किमपि रुचे,
हृदयीं सगळें धैर्य खचे;
भणभण वणवण करित अधिक मज आढयींहि जगीं नच फिरवें

किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ! १
कितिक योजिले यत्न यावया तुजशीं मी उत्सुकतेनें !
व्यर्थ जाहले अवघे ! दुर्धर कसें न व्हावें मग जगणें ?
पुष्पांनो ! तर दूर सरा !
कण्टक हो ! मार्गीं पसरा !
प्रकाश नलगे, तिमिर बरा !
सर्व चांगलें व्हावें होतें तुजसाठीं, पण लभ्य नव्हे !
किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ! २
शूळ कपाळीं, कण्डण हृदयीं, कम्प शरीरीं भरलासे,
सलिल लोचनीं, शीण अवयवीं; उदासीनता मनीं वसे !
तरि, माझी ती भेटेल का ?
पांग जिवींचा फिटेल का ?
आलिंगूं ती झटेल का ?
क्षमा करिल का मला चुक्यांची ?—पुसतों मी माझें बरवें ?
किती रहावें तुजविण आतां ! धीर न मजला क्षण धरवे ! ३

---

## ७. कविता आणि प्रीति.

### श्लोक.

फिरायास मी मित्र घेऊन गेलों, बघूनी सुरम्य स्थळा एक, ठेलों,
किती हारिनें वृक्ष ते दाट होते, जलाचे तळीं पाट होते वहाते. १
तृणाच्या मधीं राखिल्या रुन्द जागा, कडेनें तयांच्या लतांच्याहि रांगा
फुलांच्या बहारांत त्या शोभताती; अलींचे थवे त्यांवरी धांव घेती २
मधूनी किती पक्षि ते गोड गाती; मृगें त्या स्थळीं स्वैर तीं क्रीडताती;
शिखी चित्र ते दाखवीती पिसारे, बघूनी मना तोष होई अहा रे ! ३
सुखी भामिनी, स्पृष्ट ज्या यौवनानें, निजाऽव्याजरूपास साध्या मदानें
इथूनी तिथें चंचला नाचविती, पदालंकृती झंकृती तैं करीती ! ४
मुलें खेळती नाचतीही मजेनें, तयांचा अहो कोण उल्हास जाणे ?
फुलें, तारका, ते दंवाचे तुषार, तशीं मुग्ध ही बालकें दिव्य फार ! ५
अशी तेथली पाहुनी रम्य लीला, मुखीं घालुनी ठाकलों अंगुलीला;
वदे मित्र मातें " पुढें चालणें ना ? " परी पाय तेथूनियां काढवेना ! ६
बोले सखा " गढुनि कां इतुका मनीं तूं ? "
मी बोलिलों " बघ मनांत विचारुनी तूं "

तेंव्हां पुसे " अडविते कविता ? " " नव्हे रे,
प्रीती मला भुलविते; नच हालवे रे ! " ७

---

## ८. भृंग.

### पद.

चाल—लक्ष्मण पडतां धरणीला—

भृंगा ! दंग अहा ! होसी, गुंगत धांव वनीं घेसी;
तुजमागुनि वाटे यावें, गोड फुलें चुम्बित गावें ! १
रवि येत असे उदयातें, अरुणतेज विलसत दिसतें;
तरी तिमिर हा विरल असे, धुकें भरुनि न स्पष्ट दिसे. २
कविच्या हृदयीं उज्ज्वलता, आणिक मिळती अंधुकता;
तीच स्थिति ही भासतसे, सृष्टी कवयित्रीच दिसे ! ३
तिच्या कल्पना या गमती, कलिका येथें ज्या फुलती
सुगन्ध यांतुनि जो झुकतो, रस त्यांतिल तो पाझरतो ! ४
भृंगा ! आणि तुझें गान, सृष्टीचें गमतें कवन !
गा तूं गा ! नादी भ्रमरा ! मी गणमात्रा जुळणारा ! ५
शुक पंजरबन्धीं घालूं, त्या पढवूं नरवाग् बोलूं,
श्रुतिवैचित्र्या बघणारे, आह्मी मात्रा जुळणारे ! ६
कवि आह्मांलागुनि ह्मणणें, कविशब्दार्था लोळविणें !
अस्मद्गान नव्हे गान, तें गाना चिंध्यादान ! ७
परन्तु भृंगा ! तव गान, परमानन्दें परिपूर्ण !
उदासीन ही जगाविशीं, तव तन्मयता सृष्टीशीं ! ८
अस्मदीय हृदयीं ठरलें, कीं जग हें दुःखें भरलें !
ह्मणुनी सुन्दरतेलाही, कुसें अह्मां दिसती पाहीं ! ९
परि तव गानांतून, अले, थबथबला हा भाव गळे:—
" गुङ् गुङ् गुङ् गुङ् !—भान नसे !—सृष्टि अहा गुङ् ! मधुर असे ! १०
" दुःख—वदा तें कवि असे ? अश्रू—तें हो काय ? कसें ?
फुलें फुलति—परिमळ सुटती— रस गळती—गुङ् ! सौख्य किती ! " ११
जाइ, जुई, मोगरी भली, कमलिनीहि सुंदर फुलली;
मधु यांचा सेवुनि गोड, पुरवी तूं अपुलें कोड ! १२
प्रीति, चारुता, आनन्द, यांचे गा मधुरच्छन्द;
प्रीति, चारुता, आनन्द, सिंचिति सृष्टीचा कन्द ! १३
वरुनि नभांतुनि चंडोल, ओतितसे हेची बोल;
खालीं तव गुंजारव हा, प्रतिपादितसे तेंचि अहा ! १४

श्लोक.

होईल का रसिकता तव लब्ध मातें, गुंगी मिळेल मजला तव केधवां ते
येतें मनांत तुझियासम भृंग व्हावें, वेलींमधूनि कलिकांवरुनी झुकावें !१९

## ९. दिवस आणि रात्र.

पद.

चाल–लक्ष्मण पडतां धरणीला–

दिवस बोलतो “ उठा झणी ! ” रात्र “ विसांवा घ्या ” ह्मणते.
या दों वचनीं दिनरजनी, बहुत सुचविती, मज गमतें. १
दिवस सांगतो “ काम करा. ” रात्र—“ विचारा करा मनीं. ”
दिवस बोलतो “ मरा मरा ! ” रात्र—“ मजमुळें जा तरुनी. ” २
दिवस वदतसे “ पहा प्रकाश. ” आंत शिरतसे परि अंधार !
रात्र बोलते “ पहा तमास. ” परि आंत पडे प्रकाश फार ! ३
दिवस ह्मणे “ जा घरांतुनी- ” रात्र वदे “ या सर्व घरास. ”
स्पर्धा लावी दिवस जनीं; रात्र शिकविते प्रीति तयास ! ४
नक्षत्रें जगतीवरलीं, दिवस फुलवितो, असे खरें;
पुष्पें आकाशामधलीं, रात्र खुलविते, पहा बरें.
एकच तारा दिन दावी, असंख्य भास्कर परी निशा;
दिवस उघडितो ही उर्वी, रजनी अनंत आकाशा ! ५
दिवस जनांला देव दिसे, परि गद्यच त्याच्या वदनीं;
रात्र राक्षसी भासतसे, परि गाते सुन्दर गानीं ! ६
“ ही भूमी, हा नरक ” असे, वदे अदय दिन वारंवार;
“ ही धरणी हा स्वर्ग असे ” गाते रजनी, जी प्रिय फार ! ७

## १०. मनोहारिणी.

पद.

चाल —फुलें वेलीचीं, भूषणें तशीं युवतीचीं.

तीच मनोहारिणी, जी ठसलीसे मन्मनीं ! ॥ धृ० ॥
सृष्टिलतेची कलिका फुलली
अनुपम माधुर्यानें भरली;
जिच्या दर्शनीं तटस्थ वृत्ति
भान सर्वही विसरुनि जाती;
ती युवती पद्मिनी, जी ठसलीसे मन्मनीं ! १
निज गौरत्वें शशिकांतीला

लज्जा आणीलाच्चि ती बाला,
तल्लावण्यप्रभा चमकते
विजेहूनिही नेत्र दिपविते !
रूपाची ती खनी, जी ठसलीसे मन्मनीं ! २
“ इच्या कुन्तलावरणाखालीं
तारका कुणी काय पडली ?
उज्ज्वलता ही तरीच विलसे
भाळीं ! ” हा उद्गार निघतसे
ती तरुणी पाहुनी, जी ठसलीसे मन्मनीं ! ३
“ शीर्षीं निजल्या त्या तारेचे
किरण आगळे या रमणीचे
नेत्रांवाटे काय फांकती ! ”
उद्गारविते प्रेक्षकास ती.
निजदृष्टिप्रेषणीं, जी ठसलीसे मन्मनीं ! ४
गुलाब गालीं अहा ! विकसले
आणि तेथ जे खुलुनि राहिले,
विलक्षणच्चि ते कण्टक त्यांचे
सलती हृदयीं कामिजनांचे !
ऐशी ती कामिनी, जी ठसलीसे मन्मनीं ! ५
मृदु हसतां ती मधुर बोलतां,
प्रकट होय जी हृदयंगमता,
तीच्या म्हणा नयनें श्रवणें
सुरांचींहि वळतिल लुब्धपणें !
ऐशी ती भामिनी, जी ठसलीसे मन्मनीं ! ६
वक्षःस्थल पीनत्व पावलें,
गुरुत्वहि नितम्बीं तें आलें;
तेणें सिंहकटित्व तियेचें
अधिकच्चि चित्ताकर्षक साचें !
विकल करी मोहिनी, जी ठसलीसे मन्मनीं ! ७
बहराला नव यौवन आलें,
ओथंबुनि तें देहीं गेलें;
ह्मणुनि पळाली बाल्यचपलता,
गतिनें धरिली रुचिर मन्दता;
गजगमनें शोभिनी, जी ठसलीसे मन्मनीं ! ८
सौन्दर्यें शालीन्यें पुतळी
ती रामायण मूर्तच्चि गमली;

उदात्त मुद्रा, गंभीर चर्या,
यांहीं भारतखचिता वर्या
ती रमणी सद्गुणी, जी ठसलीसे मन्मनीं !
तिच्या दर्शनें मन उल्हासे,
तिजविण सगळें शून्यचि भासे;
ह्मणुनी करुनी ध्यानधारणा
अन्तर्यामीं बवतों ललना
तीच मनोहारिणी, जी ठसलीसे मन्मनीं ! १०

---

## ११. चिरवियुक्ताचा उद्गार.

### श्लोक.

वृष्टीमागुनि चंद्रकान्तिधवला ती ये शरत् साजिरी;
तैसा रम्य वसन्त तीव्र शिशिरामागून तो येतसे;
सूतिक्लेश सरे अनन्तर सुखा तें तान्हुलें देतसे;
पाणी ओसरतां समग्र भरती येते पुनः सागरीं. १
द्युत्याविष्कृति मोक्षकाल करितो खग्रास झाल्यावरी;
कृष्णानंतर शुक्ल पक्ष चढती तो कौमुदी घेतसे;
प्रातःकाल सुरेख गाढ रजनीमागून तो होतसे;
होतां दारुण कल्प–अन्त फिरुनी सृष्टि स्मिता आदरी ! २
या गोष्टी गणणें असे सुलभ गे त्यांला जयांच्या मनीं
आशातन्तु नसे अजून तुटला; ते भाग्यशाली खरे !
कान्ते मत्सम गे परन्तु असती जे या अभागी जनीं,
त्यांची वाट विपत्समाकुल जगीं होणार कैशी बरें !
उत्कण्ठाज्वलनें तुझा विरह हा टाकी मला पोळुनी,
या गोष्टी गणतां हताश हृदयीं माझ्या भरे कांपरें ! ३

---

# सौ० लक्ष्मीबाई टिळक.

जन्म इ. स. १८७०.

सौ. लक्ष्मीबाई टिळक या,प्रसिद्ध कवि रा. रा. नारायण वामन टिळक यांच्या, पत्नी होत. सहृदय व रसिक पतीच्या सहवासानें व शिक्षणानें यांच्यावरही कवितावधूचा कटाक्ष पडला आहे. यांच्या लहान लहान कविता बऱ्याच आहेत. त्यांतून दोन खालीं दिल्या आहेत.

## १. करंज्यांमध्यें मोदक कशाला ?

करंज्या केल्या ह्मणजे त्यांबरोबर एक लहानसा मोदक केलाच पाहिजे; पुरणाच्या किंवा गुळाच्या पोळ्या केल्या कीं त्यांत एक कानवला आलाच; पापड झाले कीं त्यांत एक लाटी तशीच राखून ठेविलीच; ही जी हिंदु स्त्रियांची चाल आहे, तिचा अर्थ पुढें दिलेल्या कवितेंत सांगितला आहे.

**पद.**

चाल—भूपती खरे ते वैभव—

नरनारीसंगम जिकडे तिकडे पाही,
बघ वरी खालतीं ! पहा जगीं कोठेंही ॥ ध्रु० ॥
वर सूर्य एकला; नाहीं ! क्षणभर नाहीं !
ही प्रभा नित्य त्या आलिंगुनियां राही.
हा चंद्र एकला; नाहीं ! हाही नाहीं !
ह्यासवें चंद्रिका सदैव रमलेली ही !
सप्तर्षी हे आभाळीं, यांजला,
ही अरुंधती सांभाळी, प्रेमला,
पति बंधू यांहीं केली, निश्चला,
नभ नटलें तारा तारे ह्या उभयांहीं
जें वरतीं दिसलें तेंच दिसे खालींही !
ह्या नद्या सागरा जाउन अवघ्या मिळती,
ह्या लता तरूंना सावरुनीयां धरिती,
ह्या जीवकुडीचा योग न हो जरि झाला,
तरि प्राणी कोठुन मिळे जगीं बघण्याला ?
कवि आणि स्फूर्ती दोघे, भेटती,
परिणिली मती अनुरागें, शोभती,
तेव्हांच गायनें ओघें, साधती;
नरनारीसंगम हीच संस्तती बाई !
विश्वांत एकलें कुठेंच नाहीं कांहीं !
कां वदे करंजी मोदक कोठें गेला ?
कां पोळया ह्मणती करा बघूं कानवला !
कां लाटीवांचुन पापड करि रुदनाला !
मज नको वाटतें कुणास शिकवायाला !
" किति हिंदकन्यका वेड्या ! या ह्मणा, "

२

" ह्या किती पावल्या थोड्या, शिक्षणा, "
" ह्यांकरवीं रचवी माड्या, कल्पना; "
जगिं राहूं वेड्या अशाच आह्मी बाई !
करुं वेड्या इतरां ! यांत न संशय कांहीं ! ३

---

## २. जळगांवच्या कविसंमेलनास निरोप.

### पद.

चाल–भूपती खरे ते वैभवसुख भोगीती–

हीं काव्यतरूची छाया शीतळ भारी,
तुह्मि कवी फुलें हो ह्या तरुवरचीं सारीं ! ॥ ध्रु० ॥
तुह्मि हसतां हसती सृष्टि, सर्व नरनारी !
तुह्मि कोपुन जातां जगीं खिन्नता सारी !
हा सुगंध तुमचा व्यापि दिशांना चारी,
मग वाटे भरलें सुखच्च जगा माझारीं !
हे रसज्ञ मंजुळ गीतें, गाउनी,
हे तुमच्या मधुर रसातें, प्राशुनी,
हे तुमच्या भोंते भोंते हिंडुनी,
ह्मणतात जगाला ह्याच फुलां माझारीं,
अह्मि जन्म घालवूं ! सौख्य हेंच संसारीं ! १
हें त्याच फुलांचें संमेलन हो झालें !
हा हार पाहुनी नाथ जगाचा डोले !
ह्या पुण्यसंगमा येउन असतें नमिलें,
परि दैव आडवें मज दीनेला झालें !
घ्या ! नमस्कार मम घ्या हो, मानुनी !
तरि हाच मला हो लाहो ! जन्मुनी,
संबंध कवींचो राहो, ह्या जनीं,
मी बहीण, आपण भाउ सखे कैवारी !
कवि तुह्मी, भिकारिण मी तुमच्या हो दारीं ! २

# काशिनाथ हरि मोडक.

जन्म इ. स. १८७१.

रा. रा. काशिनाथ हरि मोडक हे कवि माधवानुज या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांचें मेघनादवध या नांवाचें नवसर्गात्मक महाकाव्य काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालें आहे. यांचीं स्फुट कवितेचीं सुमारें १२५ प्रकरणें आहेत. त्यांपैकीं पुष्कळ विविधज्ञानविस्तार, करमणूक, मासिकमनोरंजन, काव्यरत्नावली इत्यादिकांत प्रसिद्ध झालीं आहेत.

## १. स्मृतिचित्र.

### पद.

चाल— अर्धतनू वारुळीं बुडाली—

स्मरतो मज तो प्रसंग अजुनी दिन बहु झाले जरी
नको तें स्मरण तयाचें परी. ॥ ध्रु० ॥
बाळपणीं मी सहज मजेनें गेलों एक्या दिनीं
फिराया स्वच्छंदें उपवनीं;
दिसली तेव्हां प्रभातवेला प्रसन्न नयनां किती
विहंगम मंजुल आलापिती;
दिनकरसंगें दिसे रंगली पूर्व दिशा सुंदरी
लोचना रूप जियेचें हरी.
॥ चाल ॥ झाल्या कुसुमित नाना लता
होता मंदानिल वाहता
परिमलपूरित सेवुनि ज्यातें मन मोदातें वरी. ॥ १ ॥
उद्यानीं मी वेंचित असतां प्रफुल्ल सुंदर फुलें
सहसा एक नरा देखिलें.
उग्र तयाचें रूप पाहुनी उपजे भीती मनीं
सुटला कंप शरीरा झणीं.
पाहुनि मातें वदे ‘बालका मज भीसी कासया
हें घे पुस्तक खेळावया.’
॥ चाल ॥ ऐसें सस्मित वच बोलुनी
हस्तीं पुस्तक मम देउनी
दृष्टिपुढूनि मम नर तो झाला अंतर्हित सत्वरी. ॥ २ ॥

रम्य रेखिलीं होतीं चित्रें पशुपक्ष्यांचीं वरी
मुद्रिलें होतें हेमाक्षरीं;
आशा विभवप्रीति संपदा यांवर होते धडे
पुस्तकीं लिहिलेले रोकडे;
हर्षभरें मी नाचत गेलों सदना तें घेउनी
त्याजला नीट दिलें ठेउनी.
॥ चाल ॥ गेले वत्सर कांहीं पुढें,
दृष्टिस एके दिवशीं पडे,
पुस्तक तें मीं औत्सुक्यानें धरिलें अपुल्या करीं. ॥ ३ ॥
सुरम्य चित्रें कुरूप दिसलीं, गेलीं तीं अक्षरें
मागें पुस्तक कोरें उरे,
आशा विभवप्रीति संपदा सुदिव्य यांचे धडे
गेले विलयाला बापुडे !
एकवार जें कारण झालें सुखवाया लोचना
उपजवी उलटी तें भावना !
॥ चाल ॥ झालों खिन्न बहू मी मनीं,
बोललों आणुनि जल लोचनीं,
क्रूरा काळा ! असे तुझी ही कठोर करणी खरी ! ॥ ४ ॥
असती बाल्यीं उड्या मनाच्या उंच अहाहा किती
बेतही नित्य नवे चालती !
वाटे विक्रम करुनि कीर्तितें धरुनी आणूं घरा
इंदिरा सकल सुखाचा झरा.
सकल जगातें वदान्यतेतें लावूं कीं हा खरा
जन्मला धन्य जगीं मोहरा.
॥ चाल ॥ जातां बाल्यदशा ती दुरी,
उलटा अनुभव येई परी,
दुःख निराशा यांचा पगडा बैसे हृदयावरी ! ॥ ५ ॥

---

## २. कृष्णाकोयनांचा संगम.

पद.

चाल–गडे हो सत्य गुरूची खूण–

सखे गे, सुरेख संगम किती ! कृष्णा मिळली कोयनेप्रती ॥ ध्रु० ॥
किति विशाल तट हे अहा !

प्रियसखे उभी तूं रहा,
क्षण येथिल शोभा पहा. १ सखे०
बहु चकाकते यावरी
ही सुरेख सिकता, परी
जाय गळूनि धरितां करीं. २ सखे०
जगिं असे सुखाचे क्षण
नर झटे धराया, पण
जाति तयास ते फसवुन. ३ सखे०
झष जलीं उड्या मारिती,
भय न यां सुखीं हे किती !
भवजलीं रमूं या रिती. ४ सखे०
बघ दोघींची मैत्री किती
एकमेकींस आलिंगिती
दोन असूनि एकचि होती. ५ सखे०
जर अशींच अपुलीं मनें
१एक होतील गे प्रीतिनें
मग सुखास कुठुनी उणें ? ६ सखे०
स्थल पवित्र हें गे जनीं
जन बघेल जो लोचनीं
अघ हरेल त्याचें क्षणीं. ७ सखे०

---

## ३ फुलांचा झेला.

### साक्या.

फुलला बघ हा गुलाब सुंदर उद्यानाचा प्राण,
इंदुकरांही खुलला न भुले पाहुन याला कोण ? १
लाजवील हा निजतेजानें रतिच्या रक्त कपोलां,
सुजना जैसे नीच पीडिती कठोर कंटक याला ! २
किंवा जैसें जगीं वेष्टितें दुःख सदा सौख्याला,
तैसे कंटक वेष्टुनि बसले कांति या कुसुमाला !. ३
व्हावा तुज हा जरी सुंदरी स्वशिरीं घालायातें,
रुतले कंटक करांस कोमल सोस तरी तूं त्यांतें. ४
मंद मंद किति सौरभ सोडी निर्मल हा निशिगंध !
पसरुनि वदना अमृतकरांतें सेवितसे स्वच्छंद. ५

लावुनि गगनाकडे स्वदृष्टी शांतपणें वर जाई,
सरल सदोदित वाट वांकडी माहित यातें नाहीं. ६
निशिगंधासम सरल जगीं या मनुज जरी वागेल
मोक्ष तयाला मिळवायाला विलंब कां लागेल ? ७
पहा मोगरा वळुनि जरा हा डुलतो कलिकाभारें,
फुलविति याच्या गोंडस गेंदा स्पर्शुनि चंचल वारे ! ८
प्रिये पाकळ्या पहा कशा ह्या कथिती गोष्ट हिताची
परस्परांतें बिलगुनि शोभा वाढविती कुसुमाची ! ९
इतुक्या प्रेमें परस्परांशीं वर्तन होय नराचें
तरी सुखा मग काय कमी त्या ? दुःख उरे ना साचें. १०
पुष्पवती ही सदाफलीची वेल मनातें मोही,
विनयवतीला पाहुनि ऐशा मुग्ध न कां कवि होई ? ११
या लतिकेचें पुष्प दाखवी रंग तीन बहु रम्य,
प्रथम पांढरें लाल मागुनी अंतीं मिश्र अगम्य ! १२
प्रिये इंदिरे ! प्रेम असावें असें तुझें मजवरतीं,
निर्मल आधीं रक्त मागुती अगम्य केवळ अंतीं ! १३
चार फुलांचा रचुनी झेला करितों केशाभरण,
जातिल माल्यें सुकून त्यांचें ठेव परी तूं स्मरण. १४
सुमनांसम या मानस अपुलें सखये ठेवित जाई,
सरल सहिष्णू सहानुभूतिक सत्प्रेमल सुखदायी. १५

## ४. दीपविसर्जन.

### श्लोक.

करीं आरती घेउनी आर्यबाला, त्वरें पातल्या नर्मदेच्या तटाला,
करूनी तयांनीं सरित्पूजनाला, प्रवाहीं दिली सोडुनी दीपमाला. १
अहा काय शोभा वदूं त्या क्षणाची, तृषा शांत झाली मदीयेक्षणांची,
तदा अस्तगामी जरी अंशुमाली, मला वाटलें यामिनी काय झाली ! २
सरित्पात्र तें स्वच्छ तैसें विशाल, तदा भासलें कीं दुजें अंतराल !
तटीं त्यावरी शोभली दीपिकांची, उदेली जणों पंक्ति कीं तारकांची ! ३
जशी अंतरिक्षीं फिरे चंद्रकोर, प्रवाहीं करी रम्य नौका विहार,
नभीं स्वैर संचारती मेघखंड, जलीं खेळती वीचि तैशा उदंड. ४
अशी दिव्य शोभा पहातां पहातां, मनीं शांत झालों लया जाय चिंता,
क्षणीं सूचली कल्पना एक चित्ता, असे सर्व सृष्टीस जी मूलभूता. ६

दिले सोडुनी दीप जैं बालिकांनीं, दिला सारखा वेग सर्वां तयांनीं,
तयांची स्थिती तत्क्षणीं भिन्न झाली, वरी दृश्य कोणी कुणी जाय खालीं! ६
कुणी गुंतुनी राहिले भोंवऱ्यांत, जलौघासवें जाय कोणी वहात,
तयांतील कांहीं तटा अन्य गेले, पुढें जाउनी अल्प मार्गेंचि आले. ७
जसे दीप तैसे असंख्यात जीव, प्रभू निर्मितो थोर ज्याचा प्रभाव,
तयां सोडुनी देत कालप्रवाहीं, वहाती तदोघासवें सर्व देही. ८
कुणी रंक होई कुणी होय राजा, दुजा देखणा हो तिजा हीनतेजा,
कुणी मूर्ख होई कुणी हो शहाणा, कुणी धैर्यशाली कुणी भ्याड जाणा. ९
तसें कां करावें ? असें मी करीन, वृथा वल्गना मानवाच्या अजाण,
स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र, स्थिती त्या करी पात्र किंवा अपात्र १०
जरी राहिलें नर्मदातीर दूर, जरी आज बाला न दृष्टीसमोर,
स्मरोनी तरी दीपसर्गप्रसंग, भरे हर्षयोगें झणीं अंतरंग ! ११

---

## ५. मूर्तिकार.

### दिंड्या.

दृष्टि फेंकित आपुली सभोंवार, फिरत असतां स्वच्छंद मूर्तिकार,
शिला दिसली मार्गांत भव्य त्याला, बघुनि तीतें थांबला मुग्ध झाला. १
मूर्ति होती प्रच्छन्न शिलेमाजी, मूर्तिकारा मात्र ती दिसे आजी,
दिव्यदृष्टी कवि चित्रमूर्तिकार, सहज येतें त्यां कळुनि वस्तुसार. २
कशी आणूं मूर्ति ती व्यक्ततेला, विचारीं या तो कुशल मग्न झाला,
पुरें जाणुनि तद्रूप कल्पनेनें, करी सुस्थिर तें शांत चिंतनानें, ३
करीं एक्या टांकीस धरुनि वेगें, शिलेवर तो आघात करूं लागे,
स्वकर्तव्यीं संलग्नचित्त होत, इतर सारें विसरला वस्तुजात, ४
करायाचें ज्या असे महत्कार्य, वचन त्यानें हें सदा शिरोधार्य,
जरी उत्तम वाटतें कार्य व्हावें, स्वकार्यातें सर्वस्व तयें द्यावें. ५
शिलेवर जे हळुहळू होत घाव, दिसूं लागे सत्वरी तत्प्रभाव,
रूप पूर्वींचें जाउनी लयाला, शिला लागे साकार दिसायाला ! ६
दूर सारे जैं मलिन मेघ होती, रम्य तारे चमकती नभःप्रांतीं,
शिलाशकलें त्यापरी निघुनि गेलीं, सुभग सत्वर बाहेर मूर्ति आली ! ७
मूर्तिकारें काढिली शिलेंतूनी, मूर्ति सुंदर संपन्न अवयवांनीं,
तीस पाहुनि कृतकृत्य मनीं झाला, हर्षरंगीं नाचला ! गृहा गेला. ८
सफल होती सद्यत्न मानवाचे, हृदय त्याचें तैं हर्षभरें नाचे,

शीण सत्वर सर्वही लया जाई, कार्य करण्या सामर्थ्य नवें येई. ९
त्याच ठायीं मग एक भक्त आला, मूर्ति पाहुनि चित्तांत फार धाला,
रम्य मंदिर बांधूनि एक तेथें, मूर्ति नेउनि ठेविली तयें हातें. १०
शिला पूर्वी जी एक रूपहीन, तीस देऊं लागले लोक मान,
विजन होती जी भूमि एक काळीं, तीच पुण्यक्षेत्रभू पुढें झाली ! ११
क्षुद्र दगडा देवत्व द्यावयाचें, असे मनुजा सामर्थ्य तुझें साचें !
कसा दीनाहुनि दीन असा होसी ? मूर्तिकाराचा कां न धडा घेसी ? १२
तुझ्या मार्गीं जे दगड आड येती, घाव त्यांवर आपुल्या घाल हातीं;
काढ त्यांतुनि रमणीय दिव्य मूर्ति, करिल मग ती तव सर्व कामपूर्ति. १३

---

## ६. कुबडीतीर्थ.

### श्लोक.

घेऊनि एक दिवशीं शिवभूपतीस, गेले वनांत फिरण्या गुरु रामदास;
जायास सांगुनि समस्त जनांस मागें, ते चालले हळुहळू विपिनांत दोघे. १
होती तदा किति तरी रमणीय वेळा, तेजोनिधी दिनमणी गगनीं उदेला;
नानापरी विकसलीं सुमनें सुरेख, यद्रूप पाहुनि वरी मन फार तोख. २
पुष्पांतला मधुर सेवुनि गंध सारा, होता वहात गगनीं बहु मंद वारा;
वृक्षांवरी बसुनि पक्षि समस्त होते, रम्यस्वनें करित मंजुल गायनातें. ३
चाले प्रभातसमयीं गुरुशिष्य जोडी, ओढे नद्या गहन लंघित खोल खिंडी;
होत्या वनीं उपलकंटकयुक्त वाटा, त्यांच्या परंतु चरणीं रुतला न कांटा. ४
मार्गीं शिवास शिकवी गुरु राजनीति, नाना कथा कथुनि दाखवुनी प्रतीति,
ऐकूनि शब्द गुरुचे बहु दिव्य गोड, चित्तीं झणीं नृपतिच्या पडला उजेड. ५
हर्षोदधींत शिवभूपति मग्न झाला, झाला प्रवास किति तो कळलें न त्याला,
मार्गक्रमीत असतां भरली दुपार, चालूनि फार थकला नृपती अखेर. ६
संताप दे वरुनि दारुण अंशुमाली, धूलीमुळें चरण पोळति फार खालीं;
लागे तहान नुरलें बल चालण्याचें, कोमेजलें वदनपंकज भूपतीचें. ७
थांबा म्हणूनि वदवे गुरुतें न त्याला, होता सुशिष्य गुरुमागुनि चाललेला;
कैसा तरी हळुहळू उचली पदांतें, तों पाहिलें वळुनियां गुरुनें तयातें. ८
कां रे हळू उचलिसी शिवबा पदांतें, गेलास काय दमुनी? तुज काय होतें ?
ऐसें पुसे सदय सद्गुरु त्या शिवाला, देई परी न नृप उत्तर तें तयाला. ९
ज्याचीं पदें स्मरुनि किंकर मुक्त झाले, ज्यावांचुनी नच चराचर विश्व चाले;
त्या जाणिलें गुरुवरें नृपतिस्थितीतें, बोले सगद्गद म्हणूनि गुरू शिवातें. १०

' वत्सा मनीं तिळभरी नच खेद मानी, देतों तुला त्वरित निर्मळ गोड पाणी;
ऐसें वदूनि अपुला उचलूनि पाणी, भूमींवरी शिवगुरू कुबडीस हाणी. ११
तों वर्तलें नवल, भूमि दुभंग होई, आंतूनि निर्झर मनोहर एक येई!
आकंठ तज्जल पिऊनि नृपाल धाला, चित्तीं स्मरे गुरुचिया विमलां पदांला.

गीति.

तेव्हांपासुनि झाली ती भूमी सुप्रसिद्ध या लोकीं;
कुबडीतीर्थ सुनामें वर्णियली माधवानुजें श्लोकीं. १३

---

## ७. काल, कीर्ति आणि विस्मृति.

श्लोक.

मातें भव्य अशी इमारत पुढें विच्छिन्न झाली दिसे;
कोणाच्या करण्या चिरंतन यशा ही बांधियेली असे?
काला प्रश्न विचारिला, मज परी देतां न तो उत्तरा
गेला पंख उभारुनी उडुनिया व्योमीं करोनी त्वरा! १
व्हावें स्मारक हें ह्मणोनि कवणें प्रासाद हा बांधिला?
केला प्रश्न असा फिरोनि, बघुनी मार्गीं उभी कीर्तिला;
माझा प्रश्न तिनें जसा परिसिला, दुःखीं बुडाली सती,
वेगें निश्वसुनी बघे निज मनीं लाजूनी ती खालतीं! २
गेलों चालत मी तसाच पुढती तों देखिली विस्मृति
प्रासादावर एकली विहरतां स्वच्छंद गर्वें अती;
केला प्रश्न तिला न जों मज करी ती सत्वरी उत्तरा
पूर्वीं बांधियला कुणास्तव असो—हा आज माझा खरा! ३

---

## ८. अळवावरचें पाणी.

मराठी ग्रंथ स... ठाणे.

पद.

चाल—कसें मी मारूं माझें नवलाचें पाखरूं—

धरी रे ध्यानीं, जग अळवावरचें पाणी ॥ ध्रु० ॥
पडतां पत्रीं बिंदु जलाचा
मुक्ताफलसम शोभे साचा,
मनुजा उपजे लोभ तयाचा,
जाय भुलूनी. १

सुंदर किति हें दिसतें मोतीं !
घेइन ऐसें चिंतुनि चित्तीं
जातां त्यातें धरण्या हातीं
जाय फुटूनी. २

मोहक चंचल कण सलिलाचे,
जीवित तैसें नश्वर त्याचें,
होइल केंव्हां हरण तयाचें
ये न कळूनी. ३

मिथ्या सारा जगिक पसारा,
दुःखें भरला न सुखा थारा,
मोह घालिती धनसुतदारा,
सत्य न मानीं. ४

दिव्य चिरंतन सुख जें त्यातें
निशिदिनिं झट तूं मिळवायातें
जाउं नको परमेशपदातें
क्षण विसरूनी. ५

---

## ९. रामविलाप.

लक्ष्मणास शक्ति लागून तो मूर्च्छित पडला असतां श्रीरामानें काढलेले शोकपर उद्गार खालीं दिले आहेत.

### गीति.

नयनाश्रु राघवाचे गळती रक्ताक्त बंधुच्या भालीं,
वाटे जल मेघाचें गैरिकयुत गिरिवरी पडे खालीं. १
" आलों जैं वनवासा आशांवर सर्व सोडुनी पाणी,
बा ! लक्ष्मणा ! अहर्निश मजला जपलास तूं धनुःपाणि. २
रात्रीं पर्णकुटीच्या द्वारीं जागृत सदैव बसलास,
दिसलास मत्परायण तेंव्हां कां सांग आज रुसलास ! ३
वत्सा ऊठ द्रुतगति, किति पडुनी राहशील भूवरतीं
रक्षील कोण मातें करिशी कां मजवरी दया परती ! ४
अपराध काय ऐसा घडला वद बांधवा मजकडून ?
बघसी अंत किती बा ऊठ झणीं भेट ये कडकडून ! ५
पात्र जरी मी दोषा योषा माझी न सत्य अपराधी,
रडते तूतें स्मरुनी, विसरशि कां तिज धरूनि अपराधी ? ६
मातेसम मान जिला आदरपूर्वक दिला तुवां नित्य

कैसी उपेक्षिसी तिज वर्तन हें उचित का तुला सत्य ? ७
पडली कारागारीं रघुकुलनारी न का तुला स्मरण ?
शयन न योग्य तुला हें केल्याविण शत्रुचें रणीं हनन. ८
हे रघुकुलजयकेतो ! रणधीरा ! ऊठ रे ! महाबाहो !
तुजविण मी एकाकी शत्रूतें संगरीं कसा साहों ? ९
समरक्लांत जरी तूं असती, होऊं त्वरेंच रणविरत,
सीतोद्धार नको तो, चल जाऊं फिरुनि काननीं परत. १०
सुतवत्सला सुमित्रा शरयूतीरीं करी सदा रुदन
तुजविण कसें तिला मी, जाऊनी परत, दाखवूं वदन ? ११
नागरिकां काय कथूं, कैसा मी उर्मिलेस समजावूं ?
भाऊ तूं प्राणप्रिय तुजविण भवभार मी कसा वाहूं ? १२
वर्षुनि शिशिरासारा करिसि सुमें फुल्ल तूं निदाघार्त,
म्लानप्राणसुमातें जीवावि गे रजनि तूं सुधा मूर्त ? १३
हे अमृतकरा चंद्रा ! कवि तुज संबोधिती सुधासिंधु,
माझ्या प्रियतम अनुजा दे जीवन सिंचुनी सुधाबिंदु !" १४
अंकीं घेउनि अनुजा राम करी यापरी विलापाला,
झाला दारुण दुःखें वानरचमुभार शुष्क कीं पाला ! १५

मेघनादवधकाव्य.

---

## १९. पंचवटीवास.

श्रीसीतादेवी पंचवटींत वास करीत असतां तिनें अनुभविलेल्या गोष्टी सरमेस सांगितल्या. हा प्रसंग पुढच्या उतान्यांत आहे.

### गीति.

" पंचवटीघोरवनीं होतों गोदावरीतटीं आह्मी
वास सुखें करित सदा, मी माझे परमपूज्य गे स्वामी. १
होते वनांत अमुची प्रेमें सेवा करीत भावोजी
आणूनि नित्य देती सेवायातें फळें मुळें ताजीं. २
प्रभु जाती मृगयेतें परि घेती जीव ते न जीवांचा,
करुणासागर राघव विदित जगातें स्वभाव हा त्यांचा. ३
कन्या मी राजाची तुच्छ परी राजवैभवा मानीं,
राम वनाचा राजा मी त्याची तत्परायणा राणी. ४
सांगूं काय तुला मी वैभव सखये मदीय उटजाचें,

फुलती फुलें सभोंतीं भ्रमरतती त्यांवरी सदा नाचे ! ५
प्रातःकालीं कोकिल मधुरालापें करी मला जागी,
सांग अशी कोणाची राणी धन्या जगांत सुख भोगी ? ६
पसरुनि दिव्य पिसारा नाचे हर्षें मयूर मद्द्वारीं !
येती खग मृग अतिथी आदरिलें त्यां सदैव सत्कारीं. ७
पुष्पांचे रम्य सखे ! करुनि अलंकार घातिले इतुके
कीं, मूर्तिमती आली वनदेवी नाथ बोलले कुतुकें. ८
पंचवटीकांतारीं वसतां सौख्यें अनंत अनुभविलीं
स्वर्गीं वनदेवींचीं मंजुळ गाणीं मनोहर श्रविलीं. ९
येति कधीं ऋषिपत्नी साध्वी प्रेमें मदीय उटजाला,
त्यांचा पुण्य समागम हृदया आनंद वितरिता झाला. १०
केव्हां सुखें बसें मी अजिनासन घालुनी तरूखालीं,
छाया सांद्र तरूची, सखये ! मज सहचरीपरी झाली. ११
केव्हां कुरंगललना– संगें एकाकिनी करीं खेळ
मंजुळ कोकिलकूजित अनुकरुनी दवडिला कधीं वेळ. १२
केव्हां तरुण तरूंचे लावितसें मी विवाह लतिकांशीं,
केव्हां फिरें प्रभूच्या सांगातीं मी सरित्तटापाशीं. १३
नाथासवें कधीं मी विहराया पर्वतावरी जाई
प्रभुच्या वचनसुधेतें सेवुनि आनंद मानसीं होई. ” १४
असतां अशा रितीनें पंचवटीकाननांत सुखमग्न
येउनि शूर्पणखेनें अमुच्या सौख्यांत आणिलें विघ्न ! १५

मेघनादवधकाव्य.

---

## ११. जीवितसाफल्य.

### श्लोक.

प्रफुल्ल कमलावरी चमकती रवीचे कर
तसें स्मित तुझ्या मुखीं शिशुवरा ! दिसे सुंदर !
बघोनि वदना तुझ्या रुचिर, हर्ष होई मना,
पवित्र तव दर्शना सुरमनांतही कामना. १
तुझें हृदय भासतें विमल गांगतोयापरी
अजूनि शिरली नसे कपटभावना अंतरीं;
सदा हंसत तूं रहा जननिच्या सदंकावरी
करीं श्रवण तद्गिरा स्रवत जी सुधामाधुरी. २

फुलें विकसती किती उपवनीं अहा सुंदर!
मरंदमधु सेवण्या भ्रमर गुंगती त्यांवर !
क्षणैक चमकूनि ती त्वरित सर्व कोमेजती;
अशीच तव अर्भका, क्षणिक शैशवाची गती ! ३
शिशुत्व तव संपलें, झडकरी उठीं बालका,
सखे संवगडी तुझे जमवुनी रमें, घे सुखा;
घडी न दवडीं फुका, विविध रम्य लीला करीं,
असा समय का पुन्हां तुज मिळेल केव्हां तरी ? ४
विहंग उडती किती तरुलतांतुनी सुंदर,
फळें मधुर सेवुनी करिति गान चेतोहर;
सुखें निशिदिनीं सदा विहर बालका! त्यांपरी
न जों उदय पावली अजुनि काळजी अंतरीं. ५
कसे अहह! बालका! त्वरित संपले त्वद्दिन!
तुझ्या तनुवरी दिसे सुभग थाटलें यौवन;
असे उदय पावला प्रणय अंतरीं बा! तुझ्या
न काळ, तरुणा! वृथा दवडिं तूं करी रे मजा ! ६
असत्य, अपवित्रता, अनय या जगीं संचला,
न सौख्य कवणा मिळे मनुज संकटीं त्रासला;
असें जरि असे, तरी प्रणय हे सुखा त्याप्रती
तयास उपभोगितां क्षण पडे विपद्विस्मृति. ७
परी प्रणयकाल तो नच सदा, सुखस्वप्न तें,
क्षणैक रमवी मना, फिरुनि त्या तमीं लोटतें;
तुझ्या प्रणयसागरा भरति ये पुरी संप्रति
तयांत तरुणा! रमे अनुभवीं सुखातें अति. ८
अहा हिमकणांपरी क्षणिक संपलें यौवन
त्वदीय; तरुणा! तुला पुरुषभाव दे दर्शन;
प्रयत्न करिं तूं जगीं सतत निश्चयें संप्रति,
प्रयत्न मनुजास दे अधम उत्तमा वा गती. ९
प्रयत्न करिशी जरी मिळविण्या नरा! तूं धन,
जरी झगडशील तूं मिरविण्या जगीं मीपण;
तुवां मिळविलें नरा! विपुल वैभवातें जरी,
सुखा न वितरील तें, क्षणिक सर्व या भूवरी. १०
दिलें प्रभुवरें तुला सुमन मानवा! सद्धन

करीं विमल तूं तया सकल पाप संशोधुन;
समस्त पशुवृत्तितें त्यजुनि नीच निंदा स्तुति
अहर्निश करावया झगड तूं निजात्मोन्नति. ११
जगीं असति मूढ जे सतत निंद्यमार्गी रत
अशा मग सुधार तूं करुनि तन्मनें संस्कृत;
परार्तिहरणीं करीं मन परोपकारीं रत,
जरी तुजसि पाहिजे सुख, नरा! खरें शाश्वत. १२
उदात्त पुरुषार्थ हा जगुनि या जगीं साधणें,
गमे खचित त्याविना विफल मानवाचें जिणें;
करोनि कृति यापरी, सफल जीवयात्रा करीं
खरा, पुरुष, बा तुला समजतील लोकीं तरी. १३

---

## १२. प्रियेचे अश्रु.

### श्लोक.

अश्रु हे किति तरी रमणीय! यांस पाहुन मना सुख होय,
प्रीतिचा खवळला तव सिंधु, स्पष्ट दाविति सखे जलबिंदु. १
प्रीति सत्य नसतां हृदयांत, कोठुनी जल निघे नयनांत,
प्रीति अश्रुजननी मज वाटे, दाटतां जलमिषें उर फाटे. २
अश्रु दुःख तव हे कथितातीं, सुंदरी मज परी सुख देती,
प्रीतिची उलट ही बघ रीति, भिन्नभाव हृदयीं उठवी ती. ३
अश्रुंनो! स्थिर रहा नयनीं या, चालला त्वरित कां गळुनीयां
कामिनीनयनकंजदलाची, संगति प्रिय तुह्मां नच कैची? ४
दिव्य शक्ति तुमची समजें मी, टाकितां सहज भारुनि कामी,
कोणता प्रणयि जो नच कांचे, अश्रु चारु बघतां ललनेचे? ५
प्रीतिमुग्ध असतो जन कामी, दूषितों ह्मणवुनी न तया मी,
जे परी गतविकार महंत, तेहि पाहुनि तुह्मां द्रवतात. ६
स्फूर्तिदान करुनी बहु दिव्य, सांगतां कविस गा नव काव्य,
भाग्य त्यास अनुकूल न झालें, ज्यांस साह्य तुमचें न मिळालें. ७
अश्रुंनो! स्थिर रहा नयनीं या, चालला त्वरित का पळुनीयां,
हाय हाय! परि अश्रु गळाले, स्फूर्ति सर्व मम घेउनि गेले. ८
अश्रुंस या घन जरी करण्यास येतें, माते अहा! विपुल सौख्य सदैव होतें
गुंफूनि अश्रुमणिंचा मग रम्य हार, कंठांत घालुनि तया करितों विहार! ९

## श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

जन्म–इ. स. १८७१.

रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए. एल एल. बी., यांचीं वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष आणि मतिविकार अशीं चार संगीत नाटकें प्रसिद्ध आहेत. यांची कांहीं स्फुट कविताही मासिक मनोरंजनांत प्रसिद्ध झाली आहे.

### १. छत्रीचे उपकार.

पद.

छत्री गे मानितों तुला मी माझि खरी माउली,
 कृपेची करिसि बरी साउली ॥ ध्रु० ॥
आटपसर कधि वस्त्र चुण्याचें नेसुनि येशी सवें
 यष्टिशीं सेविसि मज गौरवें;
श्वापद रोंखिति मार्गा जेव्हां त्यांतें तुज टोंचुनी
 लावितों क्षणांत मी पळवुनी;
  कधिं खांचा खळगे अवाचित पथ रोधिती,
  कधिं तिमिर खुंटवी समूळ माझी गति,
  सोपान कधीं मज उतरावे लागती,
ऐशा संकटिं देउनि टेंका, रक्षिसि सांधे भलीं,
 कृपेची करिसि बरी साउली. १
निजवस्त्रा कधिं रूप झग्याचें देउनि वातावरी,
 पोहसी दिससि भव्य किति तरी,
चंद्रा जैसा परिवेष तशी शोभविसी मम मुखा
 दागिना कोण तुझ्या सारिखा ?
  मम शिरीं तरंगुनि या रीतीनें सदा,
  वारिशी रवीच्या करमूलक आपदा,
  जल बलें निवारुनि विडंबिशी अंबुदा,
निवारितों नच नेतिस तरि नभि सुंदर वेगानिलीं,
 कृपेची करिसि बरी साउली. २
दैवाच्या दुर्विपाकयोगें अग्नि जयीं पेटतो,
 नराला सौधांतरिं गांठितो;

अथवा दुर्गावरी नराला शत्रु जयीं कोंडितो
भोंवतीं रक्षकगण ठेवितो;
जरि असती त्यांच्या सन्निध तूं देवता,
तो क्षणार्धांत करि तुजसह निजमुक्तता,
अग्निच्या जिभा अरिशर किंवा तत्त्वतां,
पोंचति नच त्या चुकविसि यापरि महासंकटावरी;
कृपेची करिसि बरी साउली. ३
अजुनी माते उपकार तुझा कथण्याचा राहिला,
पूर्विच्याहुनि जो बहु आगळा;
मत्त वृषभ जें दारुण गर्जत मजवरि ये धांवुनी,
वांचतो उभारुनी तुज म्हणीं;
मार्गानें भेटति खल जें मजलागुनी,
व्यवधान म्हणोनि तुज मध्यें घालुनी,
रक्षितों स्वतांला तद्दृष्टीपासुनी;
भर रस्त्यामधिं निर्मिशि यापरि निवांत खोली खुली,
कृपेची करिसि बरी साउली. ४

---

## २. मृत अपत्याचें शेवटचें चुंबन.

### दिंडया.

अहा बाळा ! कां टाकुनी आम्हांसी, शीघ्र झालासी अजीं स्वर्गवासी ?
काय गमला हा विरस मर्त्यलोक, पूर्ण राहे जो पातकीं अनेक ? १
लाड पुरला नच आमच्याकडोनी, म्हणुनि गेलासि स्वर्गिं कीं उडोनी ?
दुग्ध मातेच्या पाहुनियां खोड, जासि चाखाया अमृत काय गोड ? २
बोल बाळा एकदां गोड बोल, शब्द अव्यक्तहि गमति मज अमोल;
तुझ्या वचनां या कर्णिं सांठवीन, तयां प्रेमें आमरण आठवीन. ३
गजबजावें तव मंजुवचें गेहें, मूक तुजसम तें आजि पहा राहे,
जाइ आत्मा केवळ तयामधोनी, अह्मां मृत्पिंडां मागुतीं त्यजोनी. ४
लाभ काय असे पुसुनि तुला प्रश्न, उत्तरातें देईल आतां कोण ?
मींच अपुली समजूत करुनि घ्यावी, अभाग्याच्या हें लिखित असे दैवीं. ५
मला ज्यांनीं बघुनी सतेज व्हावें, नेत्र मिटिले ते नेहमिंचे दैवें;
सिद्ध परिसाया शब्द मत्पदांचे, बधिर झालें हे कर्णही सदाचे ! ६

तुझा मजवरि विश्वास असे मोठा, परी अंतीं ठरला असेल खोटा,
जईं काळाची पडलि शिरिं कुऱ्हाड, निकट रडतच बैसलों जसा भ्याड. ७
अश्रु गळती हे नसति अश्रुबिंदु, तुझें संजीवन जयांकरविं साधूं;
स्नेह वाहे हा ज्योत पेटवाया, अग्निविण तो परि जाइ मुळीं वाया. ८
तुला माझा आत्माचि गणित होतों, दूर झाला सर्वथा भ्रम परी तो,
पडसि निश्चेतन लोचनांसमोर, परी आत्मा मम सोडिना शरीर !
आटपोनी जें सर्व कामधंदा, घरा परतें मी करुनि गति अमंदा,
दुरुनि पाहुनि तव फुल्लवदनपुष्पा, निमिषमात्रीं श्रम पावतसे लोपा ! १०
घरीं येण्या उत्साह अतां काय ? आड होतां दृष्टिच्या तुझा काय;
पाहतां त्या सुखमया गृहा शून्य, करूं रडण्याहुनि कार्य काय अन्य? ११
एकदां मीं दाविला कोप मिथ्या, अश्रुपूर्ण परी पाहुनी त्वदास्या,
तुला धरिलें हृदयासि करुनि घाई, स्मरण होतां रोमांच उठति देहीं. १२
पुढें मोठा तूं थोर निपजशील, सुज्ञ, धार्मिक, सुंदर, क्षमाशील;
सकारण ऐसी होति मला आशा, पळामध्यें ती जाहली निराशा ! १३
शीघ्र चालाया लागलासि जेव्हां, मला स्वप्निंहि वाटलें नसे तेव्हां
शीघ्रगतिनें कीं एकदिनीं स्वर्गीं, जावयाची सिद्धता करिशि अंगीं ! १४
कडेवरुनी तुज मींच कसा ओढूं ? उदरिं भूमीच्या स्वकरिं कसा सोडूं ?
अदय कीटक तुजवरी क्षमेतील, हाय ! बघतां तुज झडप घालितील ! १५
तुला विवरीं लोटिल्यावरि मनास, स्वयें बघण्याची होइलची आस;
धरुनि उत्कंठा येइन मी जेव्हां, दर्शनातें देशील काय तेव्हां ? १६
भूमि होइल पर्जन्यकालिं आर्द्र, तुझ्या भोंवतिं माजेल पंक सांद्र,
शीतपीडित तव करुण रुदन खास, पोंचणार न मज सुखासनस्थास. १७
मीच येतों तुजसवें भूमिकेंत, राहुं अन्योन्यसमागमीं सुखांत;
तुझा आहे हा दूरचा प्रवास, मित्र आवश्यक तुला बालकास. १८
निवारण करिती अदय समीपस्थ, तनयजनकांसी बघति करुं वियुक्त!
असो आतां अंतिची भेट बाळा, देईं, असली या जिवासी जिव्हाळा. १९
दृढालिंगन देउनी एकरूप, तुजसि होतों निमिषांत विगतताप,
घेउनीयां चुंबना मुखेंदूचें, शोषितों मी तुज अंतरीं स्वतांचे. २०

---

## ३. अनुपम सुख.

दयालु ईशें नश्वर जगतीं मनुजा जें दिधलें,
धन्य धन्य मी, अवघें तें सुख नुकतें अनुभविलें.

रम्य निशा बहु होती, गगनीं चंद्रकला डोले,
स्वच्छ चंद्रिका भरुनि तियेनें जग हें बहु न्हालें !
सुखदुःखांची मैत्रि सदांची दावित त्या काला,
वृक्षांच्या घन छाया होत्या पडल्या सुविशाला.
प्रेमदृष्टि मम वदनीं देउनि बसली प्रिय कांता,
वृक्षराजि ती स्तब्धचि राहे क्षितिही निर्वाता.
झुळुक वायुची जरी उठे कधिं भिउनी वाहे ते,
श्वासचि सखिचा गमला असता केश न जरि हलते.
प्रेमकथा करितांना न कळे काळ कसा जाई,
पवित्र भाषण तें परिसाया विश्व मुकें होई.
दृढालिंगनीं बसलों होतों, मग्न कथासरितीं,
प्रिय हृदयें जरि निकट कथांचें कार्य अटोपीती !
बालपणाचा मार्ग क्रमिला पुनरपि दोघांनीं,
सुगंध कोमल कुसुमांचें जणुं उपवन गमत मनीं.
जडली कैसी प्रीति आमुची परस्परांवरती,
आणा शपथा वाहुनि केली मुद्रांकित अम्हि ती.
पितरांच्या संमतिची वाहिली भीति मनीं कैशी,
मिळतां तीही शेवटिं मावे मोद न आकाशीं.
विवाह होतां घालविले दिन कैसे आनंदें,
हंसुनी, रुसुनी, रमुनी, भ्रमुनी, मंदिरिं स्वच्छंदें !
प्रेमा अनुपम पाहुनि ईशें वर्षाच्या अंतीं
बालकरूपें पारितोषिका धाडियलें जगतीं !
परस्परांच्या काढुनि साम्या चुंबितसूं बाला,
गुरुजन निकटीं असले तरिही स्थल नच लाजेला.
ज्या जागीं चुंबियलें एकें अन्यें त्या जागीं
चुंबावें लागलेंच होउनि रोमांचित अंगीं !
लागोपाठ अशा रीतीनें चुंबित असतांना,
तिन्हि वदनांचा संगम घडला दुसरें नसतांना !
यानंतर जेव्हां देवानें विपत्ति पाठविल्या,
लेशभरहि त्या कालिं आमुच्या न चित्तवृत्ति ढळल्या
नीतिपथानें काळ काढिला आजवरी आह्मीं,
अन्योन्यप्रेमें उत्तेजित स्थिर ईशप्रेमीं.
आयुष्याच्या मध्यभागिं अह्मि वसतों या कालीं,

सद्गुणफल अनुभवीत चिंतित ईश दयाशाली.
‘ विधिनें दिधला एक जन्म परि तच्चिंतनमार्गें
नर अनुभवितो अनेक जन्मां सुखमय सुंदरि गे. ’
ऐसें वदतों प्रियेलागिं तों अंबरमध्यातें,
भेदुनि भूवरि पडला तारा धरुनी वेगातें.
मरणशकुन जाणुनी निरखिलें स्तिमित अशा नयनीं,
एकामेकां, त्यानंतर निज लाविलि दृक् गगनीं.
असंख्य तारे अढळ चमकती उज्ज्वलशा तेजें,
पाहुनि ईशा स्तविलें आम्हीं प्रेमें निर्व्याजें.
हे जगदीशा अंत करिसि जरि या तव बालांचा,
करिं एका क्षणिं वियोग होवो नच एक पळाचा !
कवण्या गोलीं देशीं जन्मा सवें तरी देईं,
एका देशीं एका जागीं, हीच विनति पायीं.
मुक्ति लाभुनी तुझ्या स्वरूपीं लीन जरी होऊं,
दोघांच्या तैं तादात्म्यानें सुखानुभव घेऊं.

---

## ४ सुखकर जागृति.

### साक्या.

आम्रतरूच्या छायेखालीं पडलों एके कालीं
भागीरथीप्रियेच्या अंकीं ठेवुनियां निज मौली. १
आम्रतरु दुजा क्षितिजावरि जो घेत असे विश्रांति,
दुरुनि पाहिला, जाण्याची तन्निकट उपजली प्रीती. २
दूर दूरची वस्तु निकटिंच्या वस्तुहुनी प्रिय भासे,
व्यक्ताहुनि अव्यक्त पदार्थचि प्रिय गमतो, हें कैसें ? ३
स्मरणपटावरि अंधुक ऐशा नरा दिसति ज्या रेखा,
त्याच गिरवुनी पुनरपि मिळवी शांतिसुखा तो देखा. ४
भोंवतालच्या वस्तु वास्तविक इतक्या असती ग्राम्य,
दूरस्थचि कीं असतां दिसती नयनांतें त्या रम्य. ५
प्रकृति मूळ अव्यक्त असे जी तत्साम्यातें वाहे,
पदार्थ तो कीं स्मरणपथीं तिज आणुनि प्रिय गमताहे. ६
किंवा दुर्लभ वस्तु सदोदित नरा हवीशी वाटे,
अमर्याद अभिलाष निसर्गा अखिला भाकळूं थाटे. ७

अशा विचारीं मग्न जाहलों, तों मज निद्रा आली;
अस्फुटसृष्टिरहस्या दावूं सिद्धचि जणों जहाली. ८
स्वप्नामध्यें भूगोलींचा आत्यंतिक दूरस्थ,
झालि लालसा देखायाची निजनयनांहिं पदार्थ. ९
दुसऱ्या गोलार्धीं मत्स्थाना स्थान विरुद्ध असे जें,
वस्तु कोणती मोहकतेची खंति त्या स्थलीं विराजे. १०
पुरुष असेल तरी त्या मानिन मित्र खरा निःसीम,
असेल ललना तच्चरणीं तरि वाहिन अंतर्याम. ११
ऐसा निश्चय करुनि निघालों मनोविमानिं बसोनी
कल्पनामयी अन्नसिद्धता पूर्ण सर्व घेवोनी. १२
मार्गीं जातां इराण लागे, जेथें यवन अनेक
तत्रस्थांना करीत दिसती रुधिराचा अभिषेक. १३
किती इराणी पळती घ्याया आश्रय हिंदुस्थाना,
सार्धचंद्र घेउनी पताका अनुसरती रिपु त्यांना. १४
चमत्कार हा बघुनि निघालों, तों दिसलें बगदाद!
कुराणपठनाचा मशिदींमधिं जेथिल चाले नाद. १५
उंच मनोरे येऊं बघती माझ्या गमना आड,
अर्धचंद्र देण्याची परक्या पुरुषा धरुनी चाड. १६
सकल मुखेंदुसि परिवेषानें बुरख्यांच्या रूपानें,
वेष्टुनि ललना चालति यौवनदत्त सलीलगतीनें. १७
स्नानगृहीं स्नानकृत्य उरकुनि पेटवुनीयां हुक्का,
अमिर लांबशा गप्पा झोंकिति जणुं हुधूक्याच्या नलिका- १८
नळीं, यवनमुख, कूर्चरंध्र, यांमधुनि शुद्ध होऊन,
धूम्र जाइ वरि तिर्यग्गतिनें नलिकामात्रसमान. १९
नृपति हरूनलूरशीद मार्गीं चाले बदलुनि वेषा,
वजीर खोजा सर्व घेउनी, बघुनि पावलों तोषा. २०
मनिं वदलों कीं " महाभाग मम समकालीन असे हा!
आजवरी मज पूर्ण फसविलें इतिहासांनीं हा! हा! २१
परतोनी जाईन स्वदेशा पर्यटना उरकोनी.
बहु सन्माना पात्र होइन प्रमाद हे दावोनी." २२
पुढें लागलें बाबिलोनपुर अति सुंदर विस्तीर्ण
उंच तटीं संरक्षित मोहक उद्यानीं संकीर्ण. २३
सरल सुरेख पथांनीं केलें अवाढव्य जणुं जाळें,

मजसम नवखा सांपडेल तरि निघेल कधिं नच काळें. २४
हेंच नगर कीं इतिहासांनीं केलें जें स्मृतिशेष ?
मूर्ख अंध का होते लेखक स्वर्गीं काय अनीश ? २५
ऐसें चिंतुनि तिथुनि निघालों अरबस्थानीं रिघालों,
उष्ट्रांचा समुदाय विलोकुनि अतीव अंतरिं धालों. २६
हे शरभा ! मूर्तिमंत असशी अगस्त्य तूं जलपानीं,
दुष्ट कंटकांच्या दोषांही घालिशि पोटीं ज्ञानी. २७
परोपकारा संपादाया सदा झिजविशी काया,
सौंदर्यातें तुच्छ मानिसी, उच्च असुनि पशुराया ! २८
व्यापक दृष्टि करोनी गणिसी भोंवतालच्या भागा
नीरस मरुदेशासम, असशी तत्त्वज्ञचि शरभागा ! २९
थोर जाति त्या मार्गें जावें अनुसरोनि या न्याया,
घंटायुत उंटांच्या मागें चालें लागोनीयां. ३०
कांहिं दिनांनीं सर्व पातलों मक्केप्रती समेत,
निमाज पढलों अनन्यभावें जाऊनि मशीदींत. ३१
मुल्ला आज्ञापितां ह्मणाया ईशस्तुतिसि अमूक
संतोषविलें त्या उच्चारुनि पुरुषसूक्त बिनचूक ! ३२
पुढति चालतां गगनस्पर्शी आड मनोरे येती
त्यांतें चुकवुनि विमान धांवे पवनतुल्य पुढपुढती. ३३
नीलनदीच्या स्कंधावरि जें करि वसति शिकंदर्या,
त्या पाहोनी विस्मित झालों पाहुनि त्याची चर्या. ३४
नानादेशीं नानावेशीं जन फिरती निजकार्या,
राधास्कंधीं हरिच विविधमुख नदीस्कंधिं हा दर्या ! ३५
एकाएकीं धूम चालली नगरिं लागली आग,
जनसमुद्र तिजशीं झोंबाया धांवे तेथ सवेग. ३६
मद्विमानही अग्निकीटसें ज्वालांवरि करि हल्ला,
ऐशा अवसरिं जीभ अग्निची चाटुनि गेली कल्ला ! ३७
पावकराया ! पावन करण्या मज कां केली घाई ?
कृष्णांगुष्ठा चुंबाया जणुं उसळे यमुनामाई ! ३८
दूर जाहलों अग्निचुंबना पुसुनी गालांवरुनी
तों कळलें हा पुस्तकसंग्रह जाई खाक जळूनी ! ३९
कपोल चोळित वदलों कीं हें कपोलकल्पित खास,
मुखविवरीं अग्निच्या शिराया योग्य असति इतिहास. ४०

मग नीलनदीप्रवाहमार्गें विमान चालूं केलें,
नीलाकाश वरी नीलोदक खालीं ऐशा डौलें. ४१
मध्यें नौका भेटलि एका जीमधिं सुंदर खाशा,
बसल्या होत्या तरुणी रतिहुनि रूपिं आगळया ऐशा. ४२
दुर्भिण लावुनि बघें दिसें तों अँटनिचें प्रियपात्र,
अनिमिष इच्छी नयन नर जिचें बघुनी सुललित गात्र. ४३
एककरें प्रियकरकंठातें मिठी मारुनी बाला,
कुसुमदलातें दुज्या करानें तोडि कंठधृतमाला. ४४
क्षणांत एका प्रेमरसें निज रमणाधरासि खंडी,
दुज्या क्षणीं निज अधर चाविते प्रणयक्रोधें चंडी. ४५
गुलाबकुसुमा निज गालावरि अर्पुनि पृच्छा करित,
पुष्पाची मर्यादा कोणति सांगा चतुरा त्वरित. ४६
स्तुतिपर वाक्यें लाजवुनी तिज कुसुमकपोलांमधलें,
तारतम्य ओळखुनी रमणें कठिण कूट सोडविलें! ४७
रमणी नयनज्वाला मजवरि प्रेषुनि करील दूरी,
मुखिच्या वैषम्यातें, ऐशी आस होति मज भारी. ४८
सुंदर वस्तूच्या संसर्गें कुरूप जाइ लयाला,
अग्नि अग्निसी विझवी, यांचा प्रत्यय असता आला. ४९
केलिमग्न परि तिजला बघुनी पुढें चाललों खेदें,
तदनंतर वालुकाप्रदेशीं मुख डबडबलें स्वेदें. ५०
इतुक्यामध्यें काय जाहला चमत्कार तो ऐका,
युद्ध भारती दुरुनि हेरिलें चालत मार्गीं एका. ५१
युद्धरीति ही नूतन मजला गमलि मनापासोनी,
जिच्यामुळें सदनक्षेत्रादिक चुके वस्तुची हानी. ५२
युयुत्सु लोकां कर जोडुनि मी एक करीं उपदेश,
परस्परीं झुंजाया निवडा पुढति सहारा देश. ५३
भारतियुद्धसमय ठरवाया दवडुं नये ही संधि,
ह्मणुनि थेट पोंचलों चालली जेथ रणाची गर्दी. ५४
पांडव हो कौरव हो! थांबा! करा लढाई बंद,
प्रश्न एक करिं तोंवरि तुमची वीरश्री हो मंद. ५५
लढुनि जाल अजि परी मागुतीं पडेल पंचाईत,
सुकर युद्ध हें नच करणें तत्काला परि निर्णीत. ५६
संपात असे बोला झडकरि कवण्या नक्षत्रांत?

सप्तर्षींचा थवा कोणत्या स्थानीं मग्न तपांत ? ५७
युधिष्ठिराचा किति वर्षांनीं होणार शकारंभ ?
कलियुग केव्हां होईल सुरू सांगा मज अविलंब ? ५८
धर्मराज कधिं जाइल नश्वर जग सोडुनि निजधामा ?
रामकथा या पूर्वींच झाली कीं भावी अभिरामा ? ५९
अंत्य प्रश्न परिसुनि कपिराया ! पार्थरथध्वजवासी,
हंससी कां तूं दाखवुनीयां शुभ्र दंतमालेसी ? ६०
अकार्य करुनी जाल, परी तें निस्तरणें आह्मांसी,
विद्वत्पारिषचर्महि तुमच्या तनुचर्माधिक मजसी. ६१
वचनमौक्तिकें ऐसीं माझीं तत्रस्था वीरांनीं
शंखोद्गतरवजलधीमाजी बुडविलिं अपंडितांनीं. ६२
अवचित एका वीरें सोडुनि वातास्त्रा सुखरूप
मनोविमाना मम हेतूंसह दावियलें यूरोप. ६३
अथेन्स शहरामाजि उतरलों, भेटें तत्त्वज्ञाना
अरिस्टॉटला थक्कचि केलें विषय काढुनी नाना. ६४
अर्वाचीना इतिहासाची दिधली त्यासी संथा,
सत्य सांगतों, मानुं नका ही सत्यानृतमय कंथा. ६५
अमेरिका खंडही तयाला अविदित पाहुनि मोठा
चमत्कार वाटला मनाला, हंसलों धरुनी पोटा. ६६
नृपति शिकंदर ऐकुनि सादर या वक्तृत्वा माझ्या
ह्मणे, असे ज्या देशीं पंडित जोडिन त्या मद्राज्या. ६७
दचकुनि वदलों कीं पांडित्यज्ञान नसे हें माझें
जेथुनि शिकलों तेथिल व्हा तुह्मि सुखेनैव हो राजे. ६८
असा यशस्वी बनुनि निघालों रोमपत्तना आलों,
सभामंडपीं पाहुनि सीझरवधासि शोकिं बुडालों. ६९
स्विट्झर्लंडीं तेथुनि गेलों दुःखित मन रमवाया,
आल्प्स नगाच्या मस्तकिं राहुनि पुढें करीं मन जाया. ७०
जर्मनींत या काळीं राजा शार्लमेन धरि सूत्रां,
गेटि राजकवि असे मोल्टके चालवि तद्गणसत्रां. ७१
राजाशीं गीर्वाणगिरेमधिं भाषण बहुत करोनी
पदवी जोडिलि सन्मानाची; पुढतिं निघे तेथोनी. ७२
जर्मनिची मर्यादा जों मी ओलांडीं सोत्कंठ
चिनी लोक बहु दिसले ज्यांच्या शेंड्या लोंबति नीट. ७३

फ्रान्सामध्यें चिनिलोकांची हो सत्ता सर्वत्र
ऐसें वादानें उभा राहिलों होउनियां स्थिरगात्र. ७४
क्षण न लोटतां कळलें कीं तो चीनदेश प्रत्यक्ष
असत्य गमलें असतें जरि हे नेत्र नसति मज साक्ष. ७५
भुगोलामधिं सदा फसें मी परीक्षांत जें बाल,
याचें कारण आतां उमगे विद्युत्सम तत्काल. ७६
भुगोलांचे लेखक असती सगळया जगतीं खोटे,
खोलीमध्यें बसुनी लिहिती मनःपूत जें वाटे! ७७
व्यापक दृष्टि करोनी बघण्या उंचाविलें विमान,
तों देशाच्या सीमा दिसल्या विविधजनांनीं पूर्ण. ७८
चहुं बाजूंसी रशिया, जर्मनि, इंग्लंड तसा फ्रान्स
देश दिसति लागुनियां चीना कंवटाळिति जणुं त्यास. ७९
देशचतुष्टय पाठवि अपुल्या योद्धयांसी सीमांतें,
तेही खड्गा कुंचे लावुनि रंगविती चीनातें. ८०
अहा, सत्ययुग सुरू जाहलें! वीर टाकुनी खड्ग,
ईर्ष्येनें परराष्ट्रा असती रंगविण्यांतचि दंग. ८१
होळिपुढिल सण रंगपंचमी उरकुनि ऐशा थाटें
निज उद्देशा संपादाया लागें अपुल्या वाटे. ८२
वरि आकाश, जलाशय खालीं, जातां ऐशा मार्गें
कंटाळा आला असता जरि सोबत नसती संगें. ८३
परि या समया कोलंबस या नामें असे प्रवासी,
तोहि निघाला अमेरिकेसी शोधुनि काढायासी. ८४
जलकन्या तें भेटति मार्गें अर्धांगीकृतमीना
वडवाग्नीमधिं पाक उरकिती सुगुणरूपसंपन्ना. ८५
भेटति मध्यें योजन योजन लांबीचे बहु सर्प,
भूभारक्षमशेषतनय जणुं विहरति जलीं सदर्प! ८६
सरतां जलनिधि सोडि एकटे सहगामी लोकांसी
तद्देशीय जनांची मृगया धर्मार्थ करायासी. ८७
नैगारा धबधबा भेटला मार्गीं बलें अमोघ
कड्यावरुनि पडतां गमला हरशिरोमुक्त गंगौघ. ८८
भुव्य अलौकिक बघण्या स्थल तें थांबें कांहीं अंक,
मद्विमानही दिसलें तत्क्षणिं हरशिरिं जेविं शशांक. ८९
सरसावतां सवेग पुढें मज सुळका लागे तुंग,

एक उभी स्त्री वरि, लावण्यामृतसिक्त जिचें अंग. ९०
जिच्या मस्तकीं सुबद्ध राहे अर्धा केशकलाप,
स्वैर धांवुनी इतर चिकुर परि पावति पवनीं कंप. ९१
एक नेत्र भूतलिं खिळलेला नतपक्ष्म विनयधारी,
दुजा सभंतात् कटाक्ष फेंकुनि चांचल्यें संचारी. ९२
सुवर्णनिगडीं बद्ध एक कर तनुसी लगटे भीत.
निराभरण अनिरुद्ध अन्य परि ऊर्ध्वगमन अविनीत. ९३
सुधारणेची जणों पताका फडके अंचल एक,
तनुसि अन्य बिलगे जणुं गंगेप्रति धूतभंगि तटाक. ९४
मिश्ररूप हें बघुनि ताडिलें ही स्वतंत्रता देवी,
चरणीं अन्यां नच तुडवीतां स्वैर फिरे जी उर्वी. ९५
घनगंभीर रवें मज बाहुनि वदते विभ्रममूर्ती,
यदर्थ गोलार्धा क्रमिलेंसी वस्तु समोर उभी ती. ९६
तव वदनासि विरुद्ध दिशेला वसतें करुनि सुखास
पारखुनि हें तत्पदिं पडला " कां वदत विमुख झालीस ? ९७
मत्तनुची ती त्वत्तनुची ती संगति असे, ह्मणोनी
अर्धांगी तुज गणितों राहिन येथें आनंदोनी." ९८
वचन परिसुनी किंचित् हंसुनी वदे जाई येथून,
तव देशीं मम सुत त्यापासुनि लाभेन तुला तूर्ण. ९९
अमृततुल्य वच ऐकुनि वंदुनि देवी त्वरित निघालों,
वेगें थोडया दिनीं हिमाचल मस्तकिं येवुनि ठेलों. १००
तत्कुक्षींतुनि निघते मिळण्या भागीरथी समुद्रा,
अनुरोधानें तिच्या चाललों पहात तीर्था भद्रां. १०१
हिंडत हिंडत कांहिं दिनीं ये भागीरथीमुखासी,
अगणित जेथें चुळा टाकुनी खेळत ती जलधीशीं! १०२
पावन वारि निरीक्षुनि निर्मल झाली ऐशी वाञ्छा
कीं मुखमार्जन स्वयें करावें तेथें उदकीं स्वच्छा. १०३
शीतस्पर्शें जागा होउनि भागीरथीस पाहीं
तन्मुखिं मन्मुख पावन झालें नलगे कथणें कांहीं ! १०४

# नरसिंह चिंतामण केळकर.

जन्म–इ. स. १८७२.

रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एलएल. बी., यांच्या स्फुट कविता पुष्कळ आहेत. त्यांतून कांहीं खालीं दिल्या आहेत.

## १. मराठा वीरस्त्रीचें गाणें.

पद.

[ चाल—अजि शेवटचा लाभचि हा ममतेचा ]

[1]गिरिशिखरिं असे धवल धुकें तें जडलें, रविकिरण न भुवरि पडले;
तथिं जिवलग शृंगारुनि वारू अपुला, चुंबुनि मज प्रेमें गेला,
घनवनां वरूनि भरारी—मारुनी
मैदानीं जाइल स्वारी— धांवुनी
शिवरायहिता सिद्ध कराया सजला, रणधीर रक्षि दयाळा. १
शिरिं चढवुनियां पिळदार शिपाईपगडी, मोत्यांच्या शिरपेंचि लडी
लटकवुनि, सखा अंतरिं चिलखत बसवी, वरि रूभरि जामा सजवी;
समशेर सोडिली नंगी—कटिवरी
रणतेज झळाळे अंगीं—रविपरी
शिवरायहिता सिद्ध कराया सजला, रणधीर रक्षि दयाळा. २
रिपु अधम पहा देशमाउली छळिती, निजधर्मकर्म दूषविती;
चिरसंस्थित जी राजभजननयरीती, मळवुनि नृप वैरी बनती;
सरसावुनि बळकट भाला—निजकरीं,
गर्जुनी घालि सखि घाला—रिपुवरी,
शिवरायहिता सिद्ध कराया सजला, रणधीर रक्षि दयाळा. ३
अरिकंदन करो गे रणपण जिंकुनी साचा, खड्ग होउ जयलाभाचा;
परि रमण कधीं पाहिन मी सखि नयनीं, जयशाली करिं आदरुनी ?
जयदुंदुभि वाजु सख्याची—जगभरी
घडि येवो परि भेटीची—झडकरी
प्रिय राजहिता सिद्ध कराया सजला, रणधीर रक्षि दयाळा. ४

---

१ शिवाजीमहाराजांच्या वेळचा हा एक प्रसंग कल्पिलेला आहे.

१२३

## २. गंगास्तोत्र.[1]

### भूपाळी.

मातें भागीरथी ! वंदितें कर जोडुनियां तुला
जन्मजन्मिचें पातक धुउनी करिं तूं पावन मला १
तव तटिं बसतां तव जळ पीतां लाटांवरि लोळतां,
नामहि घेतां मरण येउ मज लाभ न या परता. २
तव तीरावरि वृक्षकोटरीं वसणारा खग बरा,
तवजलवासी मत्स्यकूर्म वा धन्य मानितें खरा. ३
नको नको तें तुझ्या संगतीवांचुनि जरि लाभलें
अन्य ठायिं सिंहासन नृपपद गमत न मजला भलें. ४
चंचल पैंजण कंकण–किंकिणि गोड शब्द ऐकतां,
स्तुतिपाठी बहुभाष भाट कवि यांच्या सुरसा कथा, ५
चंदनचामर हातिं घेउनी घालिति वारांगना
शीत पवन चिर सेवुनि सुखवी अनुदिनिं जो निजमना. ६
अशा नृपाळाहुनिहि वाटतें कीटकयोनी बरी,
सर्पतुरगगजपक्षी यांची स्थिति किति सुखदा तरी ! ७
हत शव माझें तव प्रवाहें क्षणभर जरि वाहिलें,
तटजल अथवा पुलिन यांत तें एकवार घोळलें; ८
तरंगहिंदोलावरि किंवा जरि तें आंदोळिलें,
सुरस्त्रिया मग चमऱ्या वारुनि करुनि टाकितिल भलें. ९
चरण विष्णुचे कमल तयांची तंतुवल्लि ही असे,
शंभुशिरीं रुळणारी अथवा मालतिमाला दिसे. १०
जिनें टाकिला धुउनि कलीचा कलंक सारा अशी,
मोक्षश्रीजयपताक करु ही पुनीत गंगा मशीं. ११
निबिड ताल तरु तमाल सालहि अन्य विविध वेली,
रविकिरणांचा ताप वारुनी धरिति जिथें साउली; १२
गंगासैकत शंखशशीपरि धवल जेथ चमकतें,
सुरस्त्रियाकुचकुंकुमचंदनगंध ज्यांत वाहतें. १३
हरिचरणाची धूलि पुण्यकर असे ज्यांत मिसळली,
हिमाचलाच्या गुहा विदारुनि भूवरि ये खालीं. १४

---

१. स्त्रियांनीं प्रातःकाळीं ह्मणण्याकरितां वाल्मीकीच्या गंगाष्टकावरून हें स्तोत्र तयार केलें आहे.

पापहारि तें तरंगचंचल पुण्यद जल गंगे,
पावन करुं दे प्रतिदिनिं माते ! दुर्गेचीं अंगें. १९

---

### ३. माझा आवडता फकीर.

चाल–लंडे गुंडे हिरसें तट्टू–

जेउनि खाउनि सुखें बैसलों रात्रहि दस घटका झाली
तंव फकिराची दीर्घ हांक ती मार्गामधिं ऐकूं आली.
न करि याचना न करि वंचना आशीर्वाद फुका देतो,
भिक्षा मागुनि जरब राखितां धनी जगाचा हा दिसतो. १
जसा एकला जगीं उपजला तसाच अजवरि तो राहे;
पुत्रकलत्रें स्नेही चाकर यांचा बंध न कुठिं साहे.
अन्य उपाधी कांहिं न जाणे; देहावांचुनि सुखदुःखा
स्थान न उरलें; 'अल्ला–' नामा शिवाय इतर न येत मुखा.
जसा पाहुणा दों दिवसांचा तटस्थ हा तैसा असतो;
भिक्षा मागुनि जरब राखितां धनी जगाचा हा दिसतो. २
जरी विरागी प्रपंचविन्मुख न करि जिवाचा कंटाळा;
ज्या देवानें निर्मियलें त्या सहज न ह्मणतो कां पाळा ?
क्षुधातृषादिक देहधर्म हे जनरीतीनें वारावे
याच हेतुनें केवळ खाउनिपिउनि पुष्टता तो पावे.
परि रुचि अरुची गोड कडू हा विवेक किमपि न मनिं करितो
भिक्षा मागुनि जरब राखितां धनी जगाचा हा दिसतो. ३
जीवावरती लुब्ध असति जे त्यांचे प्राण हरायाला
विशेष गोडी मनीं वाटते क्रूर दुष्ट यमरायाला.
मृत्युभयातें हा नच जाणे; चाड त्या न या जीवाची;
चित्रगुप्त मग पान काढुनी फुकट कशाला हो वाची ?
नव्वद झालें वय फकिराचें सदा निरोगी तरि असतो,
भिक्षा मागुनि जरब राखितां धनी जगाचा हा दिसतो. ४
दिवसवेळचे प्रहर चारही निवांत जागा पाहोनी
अंधारामधिं सुखें घालवी ध्यानीं 'अल्ला' आणोनी.
रवितेजानें उजळुनि जातां प्रकट होउनी स्पष्टपणें
रूप जगाचें मलिन नीचसें दिसेल नयना या भेणें
भिउनि तमाचा धरी आसरा घूकापरि विवरीं बसतो;

भिक्षा मागुनि जरब राखितां धनी जगाचा हा दिसतो. ५
रवि मावळुनी सकळ जगावरि छाया काजळि जंव पडते,
व्याघ्र सर्प वा तस्कर यांच्या नयनांनीं रजनी बघते,
तंव फकिराची स्वारी सोडुनि गुहा हळुहळू मग निघते.
अंगिं गोधडी तशि लंगोटी मिण मिण ज्योती धरि हातें !
थाट असा हा विचित्र पाहुनि कुतरा अंगावरि भुंकतो
भिक्षा मागुनि जरब राखितां धनी जगाचा हा दिसतो ! ६

---

## ४. वनदेवीचें मंदिर.

### साक्या.

सकल वनस्पतिगण ही माझी प्रजा असें मी राणी,
वनभुवनाचें राज्य करित जणुं अमरपुरीं इंद्राणी ! १
हिमपुष्पांच्या माला शोभति विशुभ्र ज्यांच्या शिखरीं,
हरितलतांच्या ध्वजा फडकवी मंद वायुच्या लहरी, २
नीलवर्ण ते प्रचंड पर्वत रोधिति अष्ट दिशांनीं,
गति कोटासम निवास मंदिर असें वसे मम रानीं. ३
भूतळ भेदुनि सहज काढिती ठावहि पाताळाचा,
मुळें जयांचीं, शिखरें ओढिति घुमटहि आभाळाचा. ४
प्रचंड ऐसे पादपनायक जेथ पहारा करिती,
सकल वन्य पशु नम्र आचरिति जेथ सुसेवकरीति. ५
पक्षिकुलें किति नागरिकां सम सुखें वसाहत करुनी,
मदाश्रयें संसार थाटती प्रजाभाव मनिं धरुनी. ६
कोकिल बुलबुल कीर पारवे गोड फळें मम खाती,
गोड गळयानें कीर्तिगायनें कृतज्ञतेनें गाती. ७
सहस्रपरिचीं फुलें प्रतिदिनीं उमलुनि परिमळभारें,
वासित करुनी टाकिति माझें वनस्थलीपुर सारें. ८
भृंग विलासी उद्यमरत त्या फिरति मक्षिका वेगें,
मकरंदाची सार्थकता बहु करिति खरी विनियोगें. ९
स्फटिककांति जळ कांच तयानें महाल माझा रचिला,
शैवालावृत शिलाशकल या सुखासनांनीं खचिला. १०
जलवेलींचे सुबक गालिचे ठायिं ठायिं पसरीले;
सुवर्णकमलाचें सिंहासन त्यांत एक बसवीलें. ११

सुरम्य माझी वनस्थली जणुं नंदनवन स्वर्गाचें,
कौतुककारण यक्षसुरासुरकिन्नरवरवर्गाचें. १२

---

## ५. गंगातटाकांवरील उषःकाल.

### गीति.

उजळुनि अष्ट दिशा, रविसारथि हळुहळुहि येतसे उदया,
प्राचीमुखिं बहु खुलली रंगछटा फिकट गोड रागमया! १
पावूं लागलि हळुहळु भंगा, जी शांतता त्रियामभरी,
बसली होती व्यापुनि गगनांतरिं तेंवि सर्व पृथ्विवरी. २
काळतमोमुखिं पडलें, दडलें कीं शून्यता-उदरकुहरीं,
वाटे अरुणकरचमू उद्धरुनी सकल विश्व मुक्त करी. ३
किंवा गतदिनिं रविपति सिंधुजळीं मग्न जाहला बघुनी
प्राणव्यसनीं जाणुनि पडली मूर्छित नितांत खिन्न मनीं ४
त्या पृथ्विकामिनीप्रति रविवार्ता कुशल अरुण समजवितां
वाटे सावध होऊं लागे तद्दर्शनिं येतही शुचिता. ५
कीं तम-चांडाळाच्या स्पर्शें अपवित्रता भुवन भोगी,
पावनता त्या द्याया सकरुण सरसावला अरुणयोगी ! ६
रवितेज-तीर्थ नभपुटकमंडलूमधुनि काढुनी हातीं,
प्रोक्षणविधि करि तो तंव विनटे भुवनांगिं सर्व ही कांती. ७
रवि पश्चिमेसि जातां भूलोक न्यस्त करित जेंवि धना,
प्रत्यर्पुनि तो रविकरिं दिक्पालहि अष्ट जाति स्वस्थाना. ८
पंच उषःकाल महापुण्यद पर्वासि जाणुनी बुडती,
गंगाजळिं तारागण होउनि सुस्नात गुप्त ते जाती. ९
भरला प्रकाश गगनीं आश्वासन सकल येत जीवगणा,
कीं अंधकारसंकट निरसुनि जगदीश दावितो करुणा. १०
मोदभरें वृक्षाश्रित पक्षिकुलें मंजुशब्दरव करिती,
कीं परमेशोपकृती जाणुनि तत्स्तोत्रपाठ आचरती. ११
ऐन उषःकालिं अशा तापसमुनिगण पहा सकल आला
गंगातटिं शिष्यांसह प्रातःस्नानादि विधि करायाला. १२
उपकरणें संध्यार्चनाविधिंचा करंड वेताचे
आणुनि, केले पुलिनीं स्थंडिल-आकार विविध वेताचें. १३
जल न दिसे घन पडलें वाफेचें धवल आवरण वरती.

सुरसरितापावनताउद्धारचि उजळ वाटले निघती. १४
करुनि निमज्जन मुनिगण कर पूर्वाभिमुख होऊनी जोडी
बालार्ककलादर्शन होतां प्रथमार्घ्य भक्तिनें सोडी. १५

---

## ६. सरस्वतीचा वाल्मीकिकवीस आशीर्वाद.

### साक्या.

नांव[1] असे मम सरस्वती मी वीणापाणी देवी,
नांव आद्यकवि तुझें वाल्मिका कथितें होइल कैंवी ? १
आलें जगतीतळीं तुजसि, गा ! शिकवाया गानातें,
पाषाणाचीं मनें वितळतिल सहस्र ऐकुनि ज्यातें. २
ज्या गानातें ऐकुनियां तव हृदय कठिण तें द्रवलें,
तेंचि कंठिं तव सदा सर्वदा राहिल, वाल्मिकि ! भरलें. ३
गान ऐकुनी तव काव्याचें तव चरणीं लागोनी,
गभीर सिंधू रडेल चंचळ प्रेमभरें होवोनी. ४
दिक्पाळांच्या रमणी तुजवरि ढाळितील अश्रूंते,
आनंदानें मुग्ध होउनी विमल सुधारापातें. ५
तारागणही शिरीं गाळितिल शुभ्रजळाचे बिंदू,
अशनी वितळुनि होतिल त्याचे प्रेमरसाचे सिंधू. ६
ज्या कारुण्योदधिमधिं वाल्मिकि आज बुडुनि गेलासी,
त्यांतचि जगता स्वयें बुडविशिल सत्य होय हा आशी ! ७
जोंवरि गिरिवर असे हिमाचल उभा सृष्टिच्या पाठी,
तोंवरि राहिल अखंड तुझें नांव जनांच्या ओठीं. ८
जोंवरि पृथ्वीतळीं वाहते पवित्र गंगा माता,
तोंवरि राहिल तव काव्याचा प्रचंड ओघ वहाता. ९
अमर होय तव काव्य सुरापरि, रविशशि नवग्रह तारे
सत्य समज तव कीर्ति पूर्वी हे विलया जातिल सारे. १०
अनंत कालावधिवरि गाजत राहिल तव ही वीणा,
तूंच आद्यकवि अंत्य कविहि तूं सदैव कविकुलराणा. ११
मयुरासन मम तत्पदिं होइल वाल्मिकि तव चिर वसती,
नित्य नवनवीं कविताकुसुमें जेथ सुगंधि विकसती. १२

---

१. या साक्या एका बंगाली पद्याच्या आधारें रचिल्या आहेत.

कविबालक तव पदीं बैसतिल नम्रभाव मनिं धरुनी,
मधुर कंठरव तुझा ऐकण्या ठेवुनि मानस कानीं. १३
ही घे वीणा देतें माझी जतन करि इला बा रे,
जें जें गायन गाशिल तें तें निघेल यांतुनि सारें. १४

---

## ७. काजव्यास निमंत्रण.

### गीति.

स्वागत असो तुला. ये. ठेविलिं वातायनें पहा उघडीं,
खद्योता ! संगतिचा लाभ मला दे निदान एक घडी. १
पाहुनि तेज तुझें हें वेडावुनि पूर्ण हृदय मम गेलें,
लागे ध्यास तुज करीं घेइन केव्हां असें मला झालें. २
कृमिकीटक इतर पहा दीपशिखालुब्ध होउनी जाती,
मालवतां ती तन्नेत्रावरि येऊनि अंधता पडती. ३
परि देवें तुजजवळी पाजळुनी नित्य ठेविला आहे,
दिव्य दिवा स्नेहाविण स्वयंप्रकाशी अखंड जो राहे. ४
तेजस्वी तूंचि स्वयें किमपि अपेक्षा तुला न इतराची,
अन्या ज्योतिमतांची संगत ही नावडे तुला साची. ५
देह तुझा अणुमित परि तेज जणूं वीज सर्व सांठविली,
'नापेक्षिति वय आकृति तेजस्वी' ह्मण यथार्थ आठवली. ६
अद्भुत चमत्कृती तव सर्गी जी विश्वनायकें केली,
पाहुनि ती तूं भूतलवासी ही कल्पना विरुनि गेली. ७
पृथ्वीजळतत्त्वात्मक रसें तुझें अशनपान सांग मला,
होइल कैविं ? सुधेचा भोक्ता तूं मज विचार हा गमला. ८
रात्रिवधूकंठांतिल तारामौक्तिक सतेज जरि आहे,
काजळि शालूंतिल तूं हिरा विभूषण सतेजतर पाहें. ९
भूतलिं जलिं वृक्षशिरीं क्षणिं एके अंतरालिं तरि दिससी,
क्षणिं दुसऱ्या गति ऐसी चपल मनासम सलील तूं वरिसी. १०
स्पर्धा तुजसिं कराया एकच मज अखिल जगतिं वस्तु दिसे,
ती प्रेमपूर्णदयिताविमलनयन–जलरुहीं निमेष असे. ११
घनकांताराभ्यंतरिं पक्षिकुळें जेथ झोंप घेति सुखें,
सर्पादिक वावरती पिउनि निशावात थंडगार मुखें; १२
सलिलप्रवाह जेथें झुळझुळसा शब्द एकसरि करिती
रातकिडे किरकिरकिर करुनि द्विजवेदपाठिपद वरिती. १३

तेंव्ह तुझें आवडतें स्थळ लीलाविहर सर्व दाखविसी,
तेथें तूं प्रेक्षकजननयनांतें धन्यतेस पाववसी. १४
वाटे तुज पाहुनियां उडतां, मणिदीप उजळ बहु ज्याचे
हातीं घेउनि आनंदानें वनदेवता झुलत नाचे. १५
अथवा वाटे पृथ्वी पाहूनि दुरून मोह ज्या पडला,
ऐसा कोणी तारा स्वर्गांतुनि येथ येउनी रमला! १६

---

## ८. वेषभूषा.

### पद.

[ चाल—गुरुदत्त निरंजन बनमों ]

रचिसि वेषभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ध्रु० ॥
सुटले काळे केश मोकळे तैलबिंदु त्यां वरती,
विंचरिशी मग हस्तिदंतमय कंकत घेउनि हातीं.
रचिसि केशभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ! १
कुरळ कुंतलां स्वैर बालकांपरि आंवरुनी ठायीं,
उन्नतिमार्गीं हळुहळु रिझवुनि नेतां श्रम तुज होई.
रचिसि मौलिभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? २
पेड पिळाचा वळुनि बांधितां ऐटदार वांटोळा,
शिवपिंडीतें वाटे वेढी सर्पराज जणुं काळा !
रचिसि वेणिभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ३
अर्धोन्मीलित कुंदकळ्यांचा गजरा घालीस वरतीं,
गमतें गिरिशिरिं गंगामंडळ धरि रवि-किरणें कांती.
रचिसि पुष्पभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ४
स्थिर तर्जनिनें सुरम्य कुंकुमतिलक लावितां भाळीं,
रक्त गोल जणुं प्रभातरविचा प्रकटे प्राचीमूळीं !
रचिसि भालभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ५
रत्नमुद्रिकामंडित अंगुलि ईची करुनि शलाका,
विशाळ निर्मळ नयनसंपुटीं काढिसि कज्जलरेखा.
रचिसि नेत्रभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ६
भूषाभूषित देहयष्टि मग बघसी जयिं आदर्शीं,
प्रतिबिंबातें बिंब तेंवि मम मन तव मन आकर्षी.
रचिसि वेषभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ? ७

---

## ९. प्रेमाचे प्रश्न.

### पद.

[ चाल—किति कोमल तनुलतिका याचि मोहका ]

भेटसि मज पुनरपि कधिं सांग प्रियकरे ?
प्रेमासनिं सुस्थित कधिं करिसि निजकरें ? ॥ ध्रु० ॥
शयन करिन कधिं शिर तव अंकिं ठेवुनी,
चिर उन्मुख रुचिर नयनिं नयन लावुनी,
ओष्ठ व्यग्र उत्सुक जे असति चुंबनीं,
तत्कंपा शमविन कधिं सांग मज बरें ? ॥ भेटसि० ॥ १
वक्षःस्थलिं ठेवुनि तव मौलि साजिरा,
हुंगुनि स्नेहार्द्र चिकुरभार गोजिरा,
कंकतसम फिरवुनि त्यामाजि मम करा,
सेविन कधिं सौख्य अनिर्वाच्य परि खरें ? ॥ भेटसि० ॥ २
काव्यामृत गायनरस तव पितां पितां,
स्वैर चित्र आलापहि मधुनि सेवितां,
कधिं येइल वेला भर मम सुभाषिता
पौर्णमासपूर्णकलाप्रणयविधुकरें ? ॥ भेटसि० ॥ ३

---

## १०. कांटेरी गुलाब.

### पद.

अहा ही दैववशें लाधली,
विपिनीं फिरतां अवचित मजला कंटककलिता कळी ॥ ध्रु० ॥
करिं धरितां देई दिव्यगंधपरिमळा,
उघडितां नयन करि प्रेमदृष्टिसोहळा,
ओष्ठासि देतसे स्पर्शमोद आगळा,
स्नेहसागरा संचित करिते वाटे प्रतिपाकळी ॥ अहा ही ! ॥ १
परि वेष्टन इचें दुःख फार देतसे,
विषकंटक हस्ता ठायिं ठायिं तो डसे,
नैराश्य येऊनी जडत मनाला पिसें,
स्थिति ऐशी ही रक्त आटवी अंतःकरणा पिळी ॥ अहा ही ! ॥ २
तुज मान्य असे हें अमान्य अथवा कसें ?

दिल खुलवुनि कलिके ! बोल तुझें मन-जसें,
रक्षणार्थ देसी दास्यमूल्य कीं असें ?
परवशतेंतुनि मुक्त कराया तुजसि न कां कुणि बळी ?॥ अहा ही ! ॥३
वद अथवा तुजला वेष्टन हें आवडे,
दाविसी दास्य कीं सोय सुखाला पडे,
धरुं नको बोलण्या स्पष्ट मनीं सांकडें;
करिन मनाचें समाधान मग देउनि आशे बळी. ॥ अहा ही ! ॥ ४

## ११. अपूर्व देणगी.

पद.

[चाल–अवचित कां विस्मरसी गत गोष्टी]

अर्पिन ती तुज मौक्तिकमाला, प्रेमाभरणें इतर कशाला ? ॥ ध्रु० ॥
शुक्ल पौर्णिमा अश्विनमासीं, कोजागिरिदिनिं असतां परदेशीं,
तळपत गगनीं दुग्धधवल शशि, तो सौधावरि मीं देखियला. ॥ अर्पिन० ॥ १
दुग्धपान गायनादि केली, प्रियजनसंगमसौख्यें सगळीं;
स्मृतिपथगत तीं अजि मज झालीं, बघुनि उसळला दुःखउमाळा.॥ अर्पिन०॥ २
चंद्रवदन नभिं गवाक्षमार्गें, बघतां जणुं हृत्पुटिं दिसुं लागे
वदनचंद्रछवि सखि तव सुभगे, अश्रुपूर मग नयनीं आला. ॥ अर्पिन० ॥ ३
प्रशांत उज्ज्वल सागरपृष्ठीं, स्वातीजलकण शुक्तिसंपुटीं
पडतां मोत्यें बनति गोमटीं, दिव्य गर्भधारणविधि झाला. ॥ अर्पिन० ॥ ४
हृत्पुटिं मम तव स्मृतिजळ तैसें, बनवी मौक्तिक-दाणे खासे,
अश्रुरूपधर तत्सर विलसे, पक्ष्मसूचिनें जो ओंवियला. ॥ अर्पिन० ॥ ५

## १२. महानुभावप्रशस्ति.

श्लोक.

नयन सलिलें झाले ओले गळा बहु दाटला,
वच नच फुटे वाग्धारेचा झरा जणुं आटला !
हृदय भरलें आनंदानें अशी गति जाहली,

१ कोजागिरीपौर्णिमेचे रात्रीं स्वातिनक्षत्राचे जलबिंदु समुद्रांतील शिंपल्यांत पडून त्यांचीं मोत्यें बनतात यास उद्देशून, समुद्रापलीकडे परदेशास गेलेल्या एका मित्राचे विनंतीवरून, हें पद रचलेलें आहे. २ सातारा जिल्ह्यांत वाळवें गांवीं सन १८९३ सालीं 'छोटी राष्ट्रीयसभा' भरली होती. त्या प्रसंगीं हिंदुस्थानचे कैवारी मि० ह्यूम हे मुद्दाम तेथें गेले होते. त्यांस उद्देशून या कविता त्या वेळीं रचल्या होत्या.

सदयहृदया तुह्मां पाहोनियां अजि ये स्थळीं. १
विनतिवचना या मित्रांच्या तुह्मीं बहु मानुनी
परिणतवया अध्वक्लेशा मनीं नच आणुनी
सुदिन अजि हा या भेटीचा प्रमोदक आणिला,
उपकृति महा ती या वर्णूं नये मम वाणिला. २
सुकृत अमुचें तें पूर्वींचें असे लय पावलें,
विधिबल अह्मां दुर्भाग्यांना पराङ्मुख जाहलें;
कठिण समयीं या उद्धर्त्याविना अमुची गती
परम हत, या भावें देवें दिली अपणां मती ! ३
विविधविषयीं प्रेमाचें जें निबंधन वर्ततें,
जडत बहुधां अंतर्भावें उपाधिबळें न तें;
ठसत हृदयीं या वाक्याची प्रतीतिहि बाणुनी,
सुदृढ अपुला प्रेमा आह्मांवरील विलोकुनी. ४
श्रम करितसां तारायातें उदात्तमहामते,
तनमनधनें या आर्यांच्या जनीस उदार ते
बघुनि भरती सुप्रेमाचे समुद्रहि अंतरीं,
विमल जलसंकीर्णा नेत्रां कृतज्ञपणा करी. ५
अमित उपकारांचें ओझें शिरीं अमुच्या पडे,
अनृण अपुलें कैसें व्हावें पडे मज सांकडें;
सुजन करिती सत्कार्यातें अहेतुक तें जरी,
उपकृत जनें फेडावें ही सुनीति कसें तरी. ६
उपकृतिस्मरणानें येइ जी बाष्पधारा,
धरुनि कुसुमहारीं अर्पु आह्मी उदारा;
वरुनि सुमनगंधें युक्त पुष्पोपहारा,
विनति करित आह्मी, घ्या मनीं नित्य थारा. ७
अश्रांत श्रम ते करोनि सदया सत्कार्य आरंभिलें,
हें राष्ट्रोन्नतिबीज शिक्षितमनःक्षेत्रीं तुवां पेरिलें;
सेवीं बाल तरूवरील सुमनें जीं आज हीं अर्पिलीं.
तीं राहोत समीप नित्य तुझिया सद्भावचिह्नें भलीं. ८

---

## १३. रंगदेवतास्तवन.

पद.

वंदन तव चरणिं असो रंगदेवते !
तेजस्वी भरतपुत्र तव कृपामृतें ॥ ध्रु० ॥

लक्ष्मीपति रक्षि पहा अन्य युगिं सुरां,
रूपा धरि मोहिनिच्या श्रीगुणाकरा,
देहार्धीं दावि उमावरहि व्यतिकरा,
अवतरलें भूवरिं या नाट्यतत्त्व तें. ॥ १ ॥ वंदन० ॥
संसृतिची रंगसभा भुवनिं थाटली,
भूषाही नैसर्गिक रम्य दाटली,
नरनारीबालक नेपथ्यि विनटलीं,
वर्णावे किति कौतुककारि वेष ते ? २ ॥ वंदन० ॥
भावसूत्रिं कलि गुंफी हृदयमोहका,
नवरसमय त्रिगुण चित्र संविधानका,
त्यामाजीं विविधविषयभूत भूमिका,
पाहुनि मनिं धन्य न हो चरित कोण तें ? ॥ ३ ॥ वंदन० ॥

---

## १४. दुर्योधनाचे शेवटचे उद्गार.

### श्लोक.

अस्तासि जाउनि दिवाकर काळ झाला, अंधार घोर भुवनीं गगनीं रिघाला;
ऐश्वर्य सर्व सरलें गमतें दिनाचें, आपत्तिरात्रहि भयंकर नाच नाचे ! १
हे वृक्ष पर्वत तशा सरिता महा या, ज्यांतें सुहास्यमय जीवनतेज द्याया
जो मित्र तत्पर तया कळिकाळ नेतां, शोकांधकारिं जणुं मग्न लवोनि माथा २
झाली अनाथ पृथिवी करुणार्त खिन्न, डोळे मिटोनि रडते जणुं ही सुदीन !
गाळीत सांद्रनिबिडासितपक्ष्म-वाटे, दुःखाश्रु संतत अहा दंवबिंदु मोठे ! ३
आकाश अंगण विलिंपित काजळानें, ऐसेंच भासवि मला घन हा बळानें
शिंपीयला वरि सडा रुधिरोदकाचा, संध्या सुवर्ण बघुनी भ्रम हो मनाचा ! ४
नक्षत्रपुंज अणुरेणु जसे विकीर्ण, त्यांचा बघोनि बहु उज्ज्वळ तेंवि वर्ण;
हाडें चुरोनि गमतें जणुं चूर्ण केलीं रंगावळी विविध त्यांतुनि काढियेली !५
निःष्पंद निश्चलचि या जरि विश्व काळीं, गंभीर नाद भरला मम कर्णपाळीं !
हा एक मात्र करि किर्किर कोण नेणें, त्याचें मना गमत काय कि गोड गाणें ६
भाळीं स्रवे हिम करी मम थंड काय, कीं सर्व गार पडले मम हातपाय;
काळीज चंचळपणा बहुसाळ दावी, जैसी क्षणोक्षणिं तडित् तळपोनि जावी ७
येई स्मृती परि पुन्हा परतोनि जाते, नेणें असेंचि वरचेवर काय होतें !
ज्या देखिल्या कधि न पूर्वि अशा विचित्र जाणों चमत्कृतिहि अंतरिं पाहि नेत्र
आत्मा जणों वितळला जळरूप झाला, ब्रह्मांडगोल अवघा द्रववूं निघाला

कीं आरसा हृदय हें मम आज झालें, तेणेंचि विश्व प्रतिबिंबित आंत आलें १
मी कोण? मी नृप सुयोधन कौरवांचा? हें सत्य ना? भ्रम पडे मज थोर साचा!
हो, मीच मी अखिलकौरवलोकनाथ, हा हाय, हाय, स्मृति कां परतोनि येत!
कोठें असे मम पुरी मम राजधानी? ऐश्वर्यपूर्ण मणिकांचनरत्नखाणि!
हें काय मी चहुंकडे वन दाट पाहें? जैसें श्मशान बहु घोर तसें दिसे हें! ११
प्रासादगोपुर विलासगृहें अनंत, दीपावली चमकती मणिपात्रिं ज्यांत!
स्पर्शेंच जे गुदगुल्या करिती बिछाने, झाले अदृश्यचि कसे निमिषांत नेणें १२
प्रालंबि मौक्तिकफळें बहु झालरीला, वेलींत पाचुकण शोभविती जयांला
ते विंझणे बहु सुगंधित चंदनाचे, ज्या वारितां युवतिचा कर गोड नाचे १३
प्राणाहुनी अधिक जे ममता करीती, सेवेंत ज्यांचि दृढ भक्ति सुनम्र रीती;
देऊनि आशि यश शोभन चिंतणारे, जाती कुठें मजसि सोडुनि भृत्य सारे? १४
ही उच्च नीच बहु कंटकपूर्ण भूमी, कीं श्वान लोळत तसाचि पहा प्रभू मी!
हे शिपडे हिमतुषारहि फार गार, जीवासि गोठुनि जणूं हरि सत्त्वसार! १५
हीं वाजतीं फडफडां वरि वृक्षपर्णें, विस्तारि पंख जणुं वाजविले सुपर्णें
स्फुंदोनि उच्छ्वसन टाकित जीर्ण वारा, एकांत भासवि बळें मज हा निवारा १६
हे काजवे चमचमा चमकोनि जाती, मी नष्टवैभव गणोनिच हांसताती!
त्यांचे सुतीक्ष्ण करिती किरण प्रवेश, सोसे न टोंचणि मनीं बहु होति क्लेश १७
धिप्पाड काळतरु उग्र समंधरूप, माझ्या शिरावरि उभे असती कुरूप;
खद्योतनेत्र मिचकावुनि हातवारे, वारोनि दाविति मला भय काय सारे १८
मी चाललों त्वरित सोडुनि जीवलोक, होई विलंब न अतां पळमात्र एक,
ऐश्वर्य तें, घडत अंत असा पहातां, देवा तुला शरण नम्र लवोनि माथा १९
आहे असार जिव चंचळ राज्यलक्ष्मी, मारी कटाक्ष युवती जशि नेत्रपक्ष्मीं
मीं विश्वव्यापि अवडंबर जें रचावें, तें कां असें बुडबुड्यासम हें फुटावें! २०
तैलाभिषिक्त जशि वात जळे प्रदीपीं, हा जीवही फुरफुरे नव रक्त जों पी!
दोन्ही सवेंचि वमती मलिनत्व काळें, काळी मसी, अयश लांछन तेंहि काळें २१
मीं जाळिले सुगुण सज्जन सत्य सारें; मीं जाळिले सुहृद इष्टहि आप्त प्यारे;
स्वत्वासि आहुत करोनि सुतृप्त केला, आशाग्नि जो हृदयिं या भडकोनि गेला
कोठें सखा शकुनि कल्पक इष्टवादी? कोठें सुयोध मम कर्ण अरिप्रभेदी?
भीष्मादि साह्य करणार पुराण वीर, ज्यांच्यापुढें थरथरे रणिं काळ थोर! २३
ते गुंतले मजशिं सौहृदरज्जुपाशें, मी ओढिलों नियतिकल्पित सर्वनाशें;
औदासि [illegible] सर्वें मज सर्व आले, माझें कपाळ फुटकें इतरां फळालें! २५
मी कालकूट विषबिंदु महा जहाल, पीयूष गोड भरलें जगिं या रसाळ;
तें टाकिलें कटु [illegible] असें करोनी, उद्गार केवळ करीलचि जीवहानि! २६

जैसें सुदूर क्षितिजीं जळ तें मृगाला, आकर्षि राज्य धनलोभ तसाच माला
सूर्यास्त नाशित अवास्तविका जळाला, हा घोर अंतहि तसा मजलागिं आला!

---

## १५. देशमातेला शेवटची विज्ञप्ति.

### श्लोक.

माते[1] स्वदेशजननी! तव पुत्र पाहीं, मी आज अंकिं शिर ठेउनि तूज वाहीं
घेतों तुझें फिरुनि दर्शन हें प्रमोदें, बाळावरी सतत लोभ तुझा असों दे १
स्थापूनि मूर्ति तव या मनमंदिरांत, मीं दासभाव वरिला जननी नितांत;
तो आज अंतिं अवघाहि फळासि आला हा देह कारणिं तुझ्या बहु धन्य झाला
जें वाहिलें तुजसि तें तव; कैंचि माझें? न्यासें न लाभ कसला अवघेंचि ओझें;
अर्पूनि देह तुजला परलोकिं जातां, प्राणप्रयाणसमयींहि मला न चिंता. ३
होणार सत्य अपुला शरिरें वियोग, होवो; प्रसिद्ध दुरतिक्रम दैवयोग!
ठावें मला प्रणयरज्जु जरी असारा, अंगावरी परतवी तरि वज्रधारा. ४
मी चाललों तरि उरे मम नांव मागें, जें मत्कथा विविध या जगतासि सांगे,
तैसीच भोगियलि दुःखपरंपरा जी, ती ठेवण्या स्मरणचिन्ह ह्मणोनि राजी. ५
केले अनंत अपराध परोपरींचे, होवोनि मानवश सर्व तुझ्या अरींचे;
ठेवूनि जागृत अमर्षणवैरभाव, दुष्कीर्तिदूषित गमे करितील नांव. ६
होतां तसें जननि तूं रडशील काय? मातें स्मरूनि करुणे ह्मणशील हाय?
स्वनेत्रिं अश्रु जरि एकचि एक आला, तो दूषणें तरि समर्थ पुसावयाला. ७
जो काय लोभ अवघा हृदयांत होता, तूं एक तद्विषय नैव दुजा पहातां,
माझे विचार सगळेहि तुझेच होते, या आपुल्याच मुखिं काय कथूं अगे ते ८
स्वातंत्र्य-उज्ज्वल तुझे दिन वैभवाचे, मीं दैवहीन बघण्या न कदापि वाचे; ९
जे कोण पुत्र असती तव दैवशाली, त्यांच्याचतें सुख असें लिहिलें सुभाळीं
निर्वाणिं मी विनति दीन करीन देवा, माझा वियोग इजशीं न कधीं घडावा
जें काय दुःख सुख तें अवघें समान, आह्मांसि दे किमपि भिन्नपणा न मान. १०

---

[1] हे श्लोक आयरिश कवि थॉमस मूर याच्या एका कवितेच्या आधारें रचले आहेत.

# बाळकृष्ण अनंत भिडे.

जन्म–इ. स. १८७४.

रा. रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए., यांनीं विपुल काव्यरचना केली आहे. काव्यरत्नावली, मासिकमनोरंजन, सरस्वतीमंदिर इत्यादि मासिक पुस्तकांतून त्यांचीं काव्यें प्रसिद्ध झालीं आहेत. शिवाय फुलांचे झेले या नांवाचें स्वकृत काव्यांचें एक लहानसें स्वतंत्र पुस्तक त्यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. रा. भिडे यांचीं काव्यें खालीं दिल्याप्रमाणें आहेतः––

१. पद्मिनीकाव्य, २. विदुलापुत्रानुशासन, ३. अश्वत्थाम्याचा कट, ४. अन्योक्तिविलास, ५. करुणाविलास, ६. शोकक्षोभ, ७. बुद्धाचा उपदेश, ८. स्थित्यंतर, ९–१४. ऋतुवर्णनें, १५. खाणावळ, १६. भिक्षुक, १७. सासूची जबानी, १८––२६. सृष्टिवर्णनपर, ३६––४०. ईशस्तुतिपर. ४१–४४. आख्यायिकात्मक, ४५––५०. मिश्रविषयक, ५०–५५. किरकोळ.

## १. वीराचें स्वप्न.

### पद.

चाल–नृपममता रामावरती–

[1]रणविरामसूचक झाला [2]तूर्यघोष तोषाकर तो। [3]रणगतां, ।
[4]वैरवीरवधानें विटला रवि विर[5]क्तवृत्ती वरतो। सैन्यथा; ।
पश्चिमा। समरभूसमा। रुधिर[6]रक्तिमा।
धरुनिया झाली। भयदायक सायंकालीं। सर्वथा. १
जाउनी द्युति, तमःपट ये या वसुधावदनावर तें, । त्या क्षणीं, ।
स्वकिरणीं नभीं लुकलुकती दाखवी सुकृतितत्परते। चांदणी; ।
बहुपरी। समरचातुरी। प्रकट दिनभरी।
दावुनी श्रमला। शांतिशीं वीरगण रमला। हा रणीं ! २

---

१. युद्ध बंद करावें अशी सूचना देणारा. २. तुतारीचा गंभीर आवाज. ३. समरांगणांत लढत असलेल्या योद्ध्यांना. ४. मोठमोठ्या शूर शिपायांच्या मृत्यूनें. ५. शोकपूर्ण वैराग्य. ( विरक्त–विरागपूर्ण; पक्षीं तांबडी ). ६. रक्ताची लाली. ७. तेज.

मृतवीरतनूराशींनीं रणमहीप्रांत अति खचला । जो, पहा, ।
अशिवशा शिवांनीं तेथें कोलाहल तोषें रचला । काय हा ! ।
निष्ठुरा । खाति आतुरा । मांस भासुरा ।
ओढुनी हाडें । फोडिती कडकडां दाढें । हाय ! हा ! ३
किति हतप्राय झालेले वांच्छिती यमपुरीगमना । मानसें; ।
क्षतविग्रहविलापशब्दें[1] जणुं करुनि रणमही रुदना । निःश्वसे[2]; ।
परि दुजे । क्षततनू न जे । कवळुनी भुजें ।
सुप्तिशीं रमती । कां मती बघुनि न भ्रमती । हे असे ? ४
या स्थितींत रजनीकालीं पडतां मी आपुल्या कंथीं । भूवरी ।
हें मनीं भरे, नर गणिले अदयमति, वाटली खंती । अंतरीं, ।
तळमळी । माजुनी बळी । हृदय मम छळी; ।
श्रमाकुल नयनीं । अस्वस्थ तळमळें शयनीं । खरतरीं[3]. ५
मोहवी परि पुढें निद्रा चाखवून हृदया शांती । चांगली; ।
सुस्वप्न पाहिलें मग मीं रजनिच्या चरमयामान्तीं[4] । त्या स्थलीं ।
"हा बळी । संपुनी कळी[5] । शूर मंडळी ।
फांकली सारी । निज गृहा आमुची स्वारी । परतली. ६
अतिचिर प्रवासा करुनी पाहिलें निज ग्रामाला । लोचनीं; ।
तीं हरित[6] परिचित क्षेत्रें निरखुनी जीव मम धाला । तत्क्षणीं; ।
तीं मुकीं । असुनिया निकीं । करिति मज सुखी ।
भासती मित्रें । चित्रुनी बाल्यदिनाचित्रें । शुभ मनीं[7]. ७
हंबरे मज पथीं बघती सहवत्स आमुची कपिला[8] । प्रेमला; ।
तो श्वान बहुगुणी चरणीं अंगणीं मित्रसा भिडला । बहु भला; ।
भेटले । इष्ट, मंगलें । प्रेमसुखजलें ।
लोचनीं पूर । येउनी तदा भरपूर । वाहला.
बालकें प्रेमखनि माझीं धांवलीं म्हणत, 'हो! बाबा!। काय ? या'।
कमरेस बिलगती मग तीं चुंबनां देउं सुखगर्भा[9] । रसमयां ।
सत्वरीं । धरुनि तीं करीं । उचलुनी वरी ।
चुंबिलीं हर्षें ! मजवरी शांतिसुख वर्षे ! सुसमया[10]. ८

१. जखमी झालेल्यांच्या विलापांनीं. २. उसासे टाकी. ३. अतिशय कठिण व खडबडीत. ४. शेवटच्या प्रहरीं, उजाडण्याच्या पूर्वी. ५. लढाई. ६. हिरवीचार. ७. माझ्या मनांत बाळपणाच्या दिवसांचीं सुंदर चित्रें चितारून, मला बाळपणाच्या सुखाचें स्मरण देऊन. ८. गाय. ९. सुख व आनंद देणारें जें चुंबन त्याला. १०. त्या शुभ वेळेस.

मत्प्रिया विरहसंदग्धा,[1] रत सतीव्रतीं[2] अतिविमळीं । शुभफलीं,।
[3]संभ्रमें थडकली द्वारीं, विस्मयें निश्चळा पुतळी । जाहली; ।
ती सती । मोदिता अती । विकल संप्रती ।
इंदका काढी, । सम मोह दुःखसुख पाडी । भूतलीं ! १०
ती पुढें पदर लावोनी लोचनां आपुल्या सजलां । बोलली !
प्रेमला ! वियोगाभित कां टाकण्यास मजला सजलां । जणुं[4] बली[4] ?
सांगणें । बहु न, या रणें । जाहला व्रणें[5] ।
देह अंकित हा । काय ही अवस्था पाहा । पातली ! ११
कां गेलां होतां ? कांता ! टाकुनी पतिरतेस मला । भयमुखीं ।
तरि पुन्हां न जावें, भावें प्रार्थना हींच पदकमलां । सारखी ।
मी तिला । अभयवाणिला । वदें, " तों मला ।
जागृती आणी, तूर्यघोष भरुनी कानीं । दिनमुखीं[6] । १२

---

## २. चैत्रीचा बळी.

### दिंड्या.

शांत वेळा पौर्णिमा शुद्ध चैत्री, शांततेशीं लावितें हृदय मैत्री.
धवल पडल्या पाहुनी चांदण्याला, गमे दिव्य[7]कला येत नांदण्याला. १
पश्चिमेला ग्रह शुक्र ठळक गोळा, मिचक मिचकावी एक उजळ डोळा,
परी ज्वाळा प्रसवितो धवलकांती, चंद्रज्योत जळे जणों नभःप्रांतीं ! २
भला त्याचा शोभवी निकटभाग, लाल मंगळ हा दिव्य पद्मराग.
शुक्र शोभे नृप शुचि यशें अमूप[8], गमे मंगल रुधिराक्ष[9] वर चमूप[10]. ३
गगनमध्यीं गुरु असे उभा शांत, आदराया उगवला निशाकांत[11].
सुमांजलि जो वाहिला मग शशीला, तोचि[12] दावी तारकासंघलीला[12]. ४
मधुनिमधुनी घन चढुन चंद्रराजीं; उघडझांप करी श्वेतरश्मि[13]राजी;
क्रमानें जणुं रंगेल करुण सूर, मनीं उमळविती मोदशोकपूर. ५
पवन पडला होउनी गतस्पंद[14], त्यजुनि चंचलता आणि इतर फंद;

---

१. विरहदुःखानें पोळलेली. २ मंगल व शुद्ध असें पातिव्रत्य मनोभावानें पाळणारी. ३. मोठ्या गडबडीनें. ४. जणूं काय होमांत टाकलेला हा बळीच होय. ५. घायांनीं, जखमांनीं. ६. प्रभातकाळीं. ७. स्वर्गीय सुखाची प्रभा. ८. अपरिमित, अमोज. ९. ज्याचा डोळा लालबुंद आहे असा. १०. सेनापति. ११. चंद्र. १२. त्या पुष्पांजलीनेंच जणूं काय तारागणाचें सुंदर रूप धारण केलें आहे. १३. चंद्राच्या पांढऱ्या किरणांचा समूह. १४. ज्याचा सर्व प्रकारचा वावर व चंचलपणा गेला आहे असा.

जणूं साधुनियां सिद्धिला अबाध, असे लावित हा पूर्ण निजे-समाध[1]. ६
देवळाच्या बैसलों आंगण्यांत, दोन मित्रांसह उजळ चांदण्यांत;
सरस चाले शुचि विनोदप्रवाह; तनुस चित्तासहि पळे त्यजुनि दाह. ७
जरा उष्मा भासतो शरीरास, सुमासह परि मधुमास करी रास[2];
त्यांत लावी चंद्रिका चंदनाची उटी जगतीला शुद्ध शीत साची. ८
गगन महिला न्हाणितें अमृतसेकीं[3], मही गगनाला प्रणय[4] देतसे कीं;
मना वाटे, हें प्रेम असें राहो, कधीं चंचलता-स्पर्श हें न साहो. ९
तोंच-कानीं ये ढोल भैरवाचा, भयोत्पादक मानसा स्वैर वांचा[5].
ढोल-बोलाचा अर्थ कळुन पूर्ण, अशनि आदळुनी करी शांति चूर्ण! १०
मति--स्मृतिचें जाहलें खुलें द्वार, चंद्रिकेचें शीतत्व पळे पार;
लुप्त झाला अवतार वसंताचा, नाच झाला सुरु नीच असंताचा[6]! ११
हृदय विटतां, विटतसे सृष्टिमुद्रा; महा वादळ ढवळितें मतिसमुद्रा;
काय मानव दानवातुल्य होती? विवेकाची मालवे कशी ज्योती? १२
असे चैत्रीचा चालला बळी तो, मांग त्याला देवळाप्रति वळीतो.
कृषीवलही[7] देतात कसा ऐसा, भला माराया धष्टपुष्ट ह्मैसा? १३
हाडपेरानें असे सुदृढ जाडा, नीट शिंगांचा दिसे भव्य गांडा[8],
शेतकामाला येउनी, सुखांत भला नांदावा धान्यतृणा खात. १४
मानवांच्या विपरीत बुद्धिभावें, व्यसन[9] त्याच्यावरि आज परी यावें!
दयापात्रीं नैष्ठुर्यबुद्धि केली, कोण उकालिल ही गूढ दैवकेली[10]? १५
पुढें मागें बांधिले दोरखंड, जसे मनुजा जखडिती षडरि[11] चंड.
सुटूं देती न, न वधिति एकदांच, परी मरणाधिक दाखविती जाच. १६
दोर बांधोनी यास पुढें पाठी, मांग मारीती तडातडा काठी;
'धांव बहिरी!' फोडिती अशी बांग[12], नसे मनुजाच्या अधोगतिस थांग! १७
जीभ काढी हा लांब एक वीत, धाप टाकी नासिका फेंदरीत,
नयन फिरवी गरगरां लालबुंद, भय क्रोधें होउनी भ्रांत धुंद. १८
स्वैर धांवाया बघे धरुनि नेस[13], मुखा आला शशिकांतिधवल[14] फेस;
अंग थरकुनि राहिले उभे केश, जणूं अवतरला चंड वराहेश[15]! १९

---

१. आत्मचिंतन. २. नाच. ३. अमृताच्या वर्षावांत. ४. प्रेम. ५. शब्दानें. ६. दुष्टाचा. ७. शेतकरीसुद्धां. ८. कडें, वर्तुळ. ९. संकट. १०. दैवाची लीला–कृति. ११. काम-क्रोधादि सहा शत्रु–दुष्ट मनोविकार. १२. आरोळी, हांक. १३. जोर, नेट. १४. चंद्रप्रकाशाप्रमाणें पांढरा. १५. वराहश्रेष्ठ.

धरूनि चित्तीं कां आत्म[1]जीवनाशा मनुज करिती हे अन्य[2]जीवनाशा ?
आज हत्या ही प्रकट मात्र राही, पुढिल सौख्याचा भरंवसाच नाहीं ! २०
देइ कोठुनि कल्याण अकल्याण ? मिळे पापाचें पदर भरुनि वाण.
अमंगळ हे करितात मंगळाला, कसे वसनीं[3] बांधिती विंगळाला[4] ? २१

---

## ३. करुणालहरी.

### श्लोक.

विषानला[5]तुल्य विषादपूर्ण हा, भवाधि[6] जाळी मम धैर्य तूर्ण हा !
न जाणतों मी प्रतिकारहेतुला, कथीतसें हृद्गतसार[7] हें तुला. १
भवानलें[8] मानसवृत्ति गांजली, आलों ह्मणोनी तुजशी कृतांजली[9],
दयासुधाब्धे ! वितरीं यथोचित, प्रसाद ठेवीं मजला न शोचितें[10]. २
भयाण वाटे भव मारवाडसा, अर्जी प्रभो ! या मम चित्तपाडसा,
भयांत मायामृगवारिनें पडे, दयानिधे ! तें तुज येत बापडें, ३
मनोऽलि[11] माझा पदसारसांसि[12] वा, जडे तुझ्या चाखुं सुधारसासवा[13],
अजीं त्यजी चापल शांति-साधनीं मुरे, न जाणे तुजसारखा धनी. ४
त्रिलोकि[14]रक्षाव्रत रे ! हरे ! तुला त्यजोनियां क्षुब्धभवाब्धिसेतुला[15],
तुझ्यापुढें जो करि देह लीन रे ! प्रवेशली त्या यमदेहली[16] नरें. ५
प्रभागुणें अज्ञ जनास जी सजी प्रबोधवीते भुवनत्रयास जी
ती सत्कृपा[17]क्षारुणभा वरीं ! हरी, आतां मदज्ञान[18]विभावरी हरीं. ६
जी सन्मुनि[19]स्वांतचकोरजीवितें प्रतापदुःखां हरि, शांति जी विते[20]
शिरोनि ती त्वन्मुख[21]चंद्रचंद्रिका तमों[22]ऽध चित्तांत हरील तंद्रि[23] का ?
जें सच्चिदा[24]नंदनिधान साजे, अखंड शांती मुनि-मानसा जें

---

१. आपल्या प्राणाची आशा. २. दुसऱ्याच्या प्राणाच्या नाशाला. ३. वस्त्रांत. ४. विस्तवाला, निखाऱ्याला. ५. विषारी अग्नीप्रमाणें. ६. संसाराची चिंता. ७. मनांतील गुप्त इंगित. ८. संसाराच्या वणव्यानें. ९. हात जोडून. १०. दुःखी, कष्टी. ११. मन हाच भुंगा. १२. तुझे पाय हींच कमळें त्यांस १३. अमृतरसाला. १४. त्रैलोक्याचें रक्षण करणें हेंच ज्याचें ब्रीद अशा. १५. तुफान झालेल्या संसाररूपी सागरांतून पार जाण्याच्या साधनाला. १६. यमाची देवडी. १७. उत्तम कृपावलोकन हीच अरुणकांति-अरुणोदयींचा प्रकाश. १८. माझें अज्ञान हीच काळोखी रात्र. १९. मुनिश्रेष्ठांचीं अंतःकरणें हेच चकोर, त्यांच्या प्राणरक्षणाचीं साधनें. २०. प्रसविते, उत्पन्न करिते. २१. तुझें मुख हाच चंद्र त्याचा प्रकाश. २२. अज्ञानानें काळेंकुट्ट झालेलें. २३. भ्रांति किंवा झोंप. २४. सत्य, ज्ञान व आनंद यांचा ठेवा.

असें तुझें निर्मळ तेज दीन मी, विलोकुनी भक्तिगुणें कधीं नमीं ! ८
सुरापगा[1] ज्यास सहर्ष सिंचिते जें सृष्टि-शक्ती वितरीं[2] विरंचितें[3]-
निसर्ग[4] हा सादर ज्यावरी नमी, कधीं तया पाद-रजा[5] वरीन मी ? ९
मदिंद्रियें दौडति अश्व थोर हीं, तुफान, तोडोन विवेक-दोरही,
देखोन आजीं भवदंघ्रि[6]-मंदुरा त्या स्थैर्य येवो, भुवनैक-सुंदरा ! १०
परात्परा ! गा ! पुरुषोत्तमा ! जनीं अगाध तूं, वेदहि मूक वर्णनीं,
अशा तुला सोडुन का दुजा वरी ? मदीय वाणी तव होय किंकरी[7]. ११
सुषुप्ति[8] वा जागृति होउ, सर्वदा स्मरो मती ही तुजलाचि, सर्वदा !
मदीय वाणी परिसोन, सत्य जीं, कृपा करीं, दीन न पाडस त्यजीं. १२

दयामृत-करा हरे ! बुडतसें अगाधीं तमीं,
मला सकल सोडिती, सडतसें दुराधींत मी.
न शांतविसि तूं जरी मम मनःस्थ ही काहली,
न भेद तरि राहिला अमृति आणि हालाहलीं. १३
जरी तव शरीर हें नित धरीत लोकां[9] तिही,
तरी श्रम असे तया न तिळही, विलोका, तिंहीं[10];
हरे ! बघ बरें, स्मरे तव सुरेख पायास हा,
असेच परमाणुसा, जड नसे, न कां या सहा ? १४
पुसें विनयपूर्वक प्रभु-वरा ! प्रबोधाकरा[11] !
करीं मजासि उत्तरा, न चढुनी प्रकोपोत्करा[12],
असे गिरि-करीहुनी सुजड का महा-काय[13] ? हा !
न जो उचलसी, बरा क्रम महा-महा[14] ! काय हा १५
प्रभो ! धन नको, मती न भजते असत्संपदे,
नको हत ममत्व हें, विषय सर्वदा कंप दे,
'कृपामय कटाक्ष दे मज' असें हरीखें[15] वदें,
समग्र मुनिमंडला सतत जो हरी ! खेंव[16] दे. १६
असें अधम मी, मलांबुनिधि[17],निर्गुणा, पाप, गा !
करीं तरि दया, तुझी सदय दृष्टि देवापगा[18].
विषज्वलन[19] फुंकिती अहि, तयांहि आनंद न
न होय, वद, काय गा ! मलयरत्न[20] तो चंदन ? १७

१. पवित्र गंगा. २. देतें. ३. विधात्याला. ४. सृष्टि. ५. पायाच्या धूलीकणाला. ६. तुमचे पाय हेच अश्वशाला. ७. दासी. ८. निद्रास्थिति. ९. तीनही भुवनांना. १०. त्यांनीं,त्या तीन भुवनांनीं. ११. ज्ञानाचा उदय करणाऱ्या. १२. क्रोधराशीला, भयंकर क्रोधाला. १३. स्थूलदेह, जड. १४. महातेजा. १५. हर्षानें. १६. क्षेम, आलिंगन. १७.पापाचा सागर. १८.पवित्र गंगा. १९.विषारी अग्नि. २०.मलय पर्वताचा अलंकार.

अकिंचन बुभुक्षित प्रकट–दैन्य मी हा जन,
पथीं कणहि वेंचितों, मज हरे ! असे लाज न;
परंतु अपवाद कीं ' जन तुझा करी भिक्षुकी, '
न का नवल ? नायका ! रस¹–कटुत्व घे इक्षु कीं. १८
न कर्म मम चोखटें, मज अधो--गती साच ती,
परंतु नरक-व्यथा मज न त्या तशा जाचती.
' अनाथ ' ह्मणती मला जन, परी न तें साहवें,
तुलाच जन-नायका ! मग असें कसें पाहवें ? १९
गत²-त्रप, सुदीन मी, अबळ⁵; तूंच याला तरी;
उणेपण न ये मला नरक-वास आला तरी;
करीं नयन सूक्ष्म, गा ! पतित-पावना ! मा-पते !
तुलाच मग दूषिती, न मजला, जनालापँ ते. २०

---

## ४. आमची मांजरी.

### श्लोक.

शोभे वर्तुळ तोंड गोंडस जिचें, नासा-प्रभा तांबडी,
डोळे नील विलोल गोल दिसती प्रत्यक्ष पाचू-खडी,
जीचे छान लहान कान गमती गोकर्णिकेचीं फुलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. १
भाटी ही, परि नीट लांब फुटती ओंठीं मिशा पांढऱ्या,
अंगीं लोंकर फार ती मृदु, उशा ही सांवरीची खऱ्या,
कोठें लाल, मधून शुभ्र, ठिपके देहीं जिच्या शोभले,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. २
वाटे शेंपुट लांब लाल मृदुसें रेशीम- गोफापरी,
रागानें परि त्रास जीं फुगवितां येते ब्रशाची सरी,
जातां धांवनही कधींहि न जिचीं तीं वाजती पावलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ३
पंजे शुभ्र जिचे असून वरती काळीं नखें भासती,
जेवीं पूर्ण-शशांक-बिंबिं दिसती ते डाग रम्याकृति,
पट्टा चंदन-शुभ्र गंध जणुं हें भाळीं असे रेखिलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ४
आणी दूध जधीं सकाळिं गवळी येई तधीं धांवुनी,

---

१. रसाचा कडूपणा. २. ऊंस. ३. चांगलें. ४. निर्लज्ज. ५. दुर्बळ. ६. तरण्याचें साधन. ७. लोकापवाद. ८. खऱ्या सावरीच्या कापसाच्या.

त्याचे भोंवति नाचुनी शिरुनियां पायीं तनू घांसुनी,
'म्यॉं म्यॉं' ओरडुनी सुखें पय पिई जें भूवरी सांडलें
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ५
येतां अंबररत्नबिंब[1] उदया जाऊन कौलावरी,
घेवोनी नवमित्ररश्मि[2] अपुल्या देहीं, सुखातें वरी,
तेथें निर्मल सर्व अंग करितें जी चाटुनी आपलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ६
नेमें साधुनि भोजनावसरं[3] जी बैसोन पानापुढें,
राही स्वस्थ भली उगाच न पळे पंक्तींत कोहींकडे,
घालूं भूवर भात खात तितका, चित्राहुती ना गिळे,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ७
खोडी एक परंतु होय, तिजला सोडी न तीतें जरा,
नाहीं तूप, न भात खात अगदीं कांहींहि तुह्मी करा;
हुंगोनी नुसतेंच अन्न बसते राही उपाशीं बळें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ८
होतां भोजन अंगणीं मग तनू टाकोनियां आडवी
डोळे झांकुन, शांत निश्चल मनें चारी पदां लांबवी,
साधूनी स्व-समाधि साधुस असें मागें जिनें टाकिलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ९
पाहोनी मग अंगणांत चिमणी घाली झणीं झांपडी
जातां ती उडुनी हताश[4] बनुनी बैसे धरोनी दडी
लावी निश्चल अंगणीं टक, जिचें क्रोधें मन क्षोभलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. १०
येतां ती चिमणी पुनः उचलुनी जी मागले पाय ते
घेई भार पदीं पुढील, उडिला जी नेमकी मारते,
जातां भक्ष्य परी भरारुनि, करी जी तोंड हिमूसलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. ११
केव्हां पुच्छ धरी पुढील चरणीं, चावीं स्व-दंतांकुरें[5]
येतांची कळ तें त्यजी. गरगरां नाचे, स्फुरे, गुरगुरे;
भूमीतें खरडी स्वकीय नखरीं मध्येंच जोरें पळे,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. १२
राहेना पळही कधीं चपळ जी एके स्थळीं सुस्थिर,
धांवे धूम, उडे, मधेंच उसळे, धुंडीत सारें घर,

---

१. सूर्यबिंब. २. बालसूर्याचें किरण. ३. जेवणाची वेळ. ४. निराश. ५ आपल्या बारीक दांतांनीं.

चाळे शाखविते अनेक, धरितों पाठीस जेव्हां मुलें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. १३
कांहीं खुड्खुडलें, तरी धडपडे, नाचे, पडे, बागडे,
कोठें आड दडे, मधें वर उडे, घे धांव चोहोंकडे,
जी झाडावर वेंचतां[1] खग–कुळें होती भय–व्याकुळें,
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. १४
रात्रीं जी न मनीं जुमानित तमा, धैर्यें फिरे मंदिरीं,
टेहाळी करि, संधि साधुनि उडी टाकावया उंदिरीं,
या कृत्यें ज्वर[2]–राज–मानसिं जणूं शैल्यापरी[3] जी सले!
ऐशी सुंदर मांजरी बघुनियां मच्चित्त हें लोभलें. १५

---

## ५. ईशस्तवन.

### पद.

सच्चिन्मूर्ते विश्वकारणा सृष्टीच्या चालका! दावीं सत्पथ या बालका ॥ध्रु०॥ 'अतर्क्य महिमा तुझा असे,' हें वेदवृंद बोलला, माझा पाड किती लागला!। निर्गुण किंवा सगुण अससि तूं, वाद गहन हा भला, मला तो व्हावा कां दुर्बला?।चा.द्रु.। मज दिसे भोंवतीं सर्व तुझी ही कृती। रविविधुग्रहादि त्वद्यश आलापिती। हा निसर्गदर्पण दावी तव आकृती। चा. प। करुणावरुणालया भक्तिनें नमवीं मी मस्तका, दावीं सत्पथ या बालका. १ अक्षयतेजा अगाध-शक्ते! इच्छा तव आकळी, अनंता भुवनांची सांखळी। सजीव तैशी अजीव सृष्टी वागविसी तूं बळी, सकळ हीं रूपें तव आगळीं।चा.द्रु.। तूं ग्रीष्मीं पल्लव देतोसी तरुलते। दलही न कधीं तव इच्छेंविण हालतें। तव कृपा शिळेंतहि मंडूका पाळिते।चा. प.। यथार्थ तूंतें वर्णन करणें प्रभो! असे शक्य का? दावीं सत्पथ या बालका. २ फलित तरुवरी विहंगगण जो आलापा सोडतो, तो तव रूपाशीं जोडतो। मेघध्वनि जो परिसुनि जळधी रोषानें गाजतो, तोही रूप तुझें साजतो। चा. द्रु.। मग तुझी कल्पना जरी मनीं बाणते। तरि शब्दरूप तिस कोण कुशल आणतें। तव समान कवि जो, तोच करिल काज तें। चा. प.। मी तों केवळ अल्पविषयमति, हे भुवनव्यापका, दावीं सत्पथ या बालका. ३.

---

१. चढली असतां. २. ग्रंथिक सन्निपाताच्या मनांत. ३. बाणासारखी.

# दत्तात्रय कोंडो घांटे.

जन्म—इ. स. १८७५. मृत्यु इ. स. १८९९.

रा. रा. दत्तात्रय कोंडो घांटे, बी. ए., यांचीं कांहीं लहान काव्यें आहेत. त्यांपैकीं दोन खालीं दिलीं आहेत.

## १. बघसी अंत किती राजसे !

पद.

चाल—वीरशिरोमणि सकलधनुर्धर—

जिकडे तिकडे प्रेम सांचलें जगांत सारें दिसे,
तयाविण कोठें कांहीं नसे,
प्रवाह सारे धांवत जाती नदीकडे अक्षय,
होती भेटुन तिज तन्मय !
निशिदिन रानीं वनीं चालुनी तटिनीही झरझरा,
देती आलिंगन सागरा,
या पुष्पवल्लरी तरुसंगें क्रीडती,
शशिसंगें रमते सदा कौमुदी सती,
अंबरीं समीरण सारे सम्मीलती,
प्रेमावांचुन जीवित निष्फळ ठावें तुजला असे,
बघसी अंत किती राजसे ! १
तुंग महीधर गगनश्रीच्या वदनाला चुंबिती,
शशिकर जललहरी कर्षिती,
दिनमणि येतां घरीं प्रेमला पूर्वदिशा सुंदरी,
फुलते कदंबकुसुमांपरी !
हांसत हांसत प्रफुल्ल वदनें तारागण खेळती,
अंबरीं परस्परां ओढिती,
रवि येतां उघडी नेत्रांतें कमलिनी,
शशि दिसतां हांसे आनंदुनि कुमुदिनी,
वनलक्ष्मी नटते मधु आला पाहुनी,
चंचल चपला परि ती मेघा सोडुन दूर न वसे !
बघसी अंत किती राजसे ! २
शाल, दुशाला नको; नको मज मंदिलही भरजरी !
त्याहुन कंथा माझी बरी !
सुरेंद्रनगरी नको, तुजसवें राहिन मी काननीं,
तुझें धन नको मला तुजहुनी !

ओंवाळुन टाकिन तुजवरुनी साठ कोटि अप्सरा !
नको मज विष्णूची इंदिरा !
तुज शोधित फिरलों जनीं, स्मशानीं, वनीं !
तरु—वल्ली—विहगां विचारिलें जाउनी !
गिरि, सरिता, उडुगण नाहीं सांगत कुणी !
काय करूं ? तुज कोठें पाहूं ? तुजविण भरलें पिसें !
बवसी अंत किती राजसे ! ३
झुळ झुळ वाहे प्रावृष जल गे एकसारिखें जसें,
माझें आयु चाललें तसें !
तुजविण दिसती शून्य दशदिशा ये लौकर धांवुनी
धर मज बळकट आलिंगुनी !
सुमनभूषणें रचुनि परोपरि तनुलतिका मंडिन,
गुंफुनि अलंकार देइन,
नवकाव्यमाळ वेणींत तुझ्या घालिन,
नवरसीं सुरस मिष्टान्न तुला चारिन,
या कविकुंजांतच तुजसंगें राहिन,
सखये कविते, दर्शन दे मज तुजविण भरलें पिसें,
बवसी अंत किती राजसे ? ४
शास्त्राभ्यासा करुनी विटलों, विटलों विद्यालया,
यानें जाइन लवकरि लया,
महापरीक्षा झाली, आली विद्या किंवा कला,
तरी मी तुजवांचुनि एकला,
प्रेमदृष्टि तूं ठेव मजवरी मग सारें तत्क्षणीं,
देइन हांकुनि हृदयांतुनी,
ही विद्या साधिल तव पदसंवाहन,
ही कला करिल तव तनुलतिकामंडन,
नव काव्य करुनि हा दास करिल रंजन,
तव चरणीं सर्वस्व वाहिलें, येउनि त्या घे कसें,
बवसी अंत किती राजसे ? ५

---

## २. मुग्ध कलिका.

चाल—भूपती खरे ते वैभवसुख—

ही कलिका—छे, ही सौंदर्याची खाण,
ही मूर्तिमती मृदुलता होय निर्माण,
ही मुग्धावस्था आली कां लोकीं या,
तारुण्यविलासां अमुच्या अवलोकाया,

ही इंद्रलोकिंची काय अप्सरा आली,
कीं दुर्जी ऊर्वशी शापें कलिका झाली,
कुसुमायुध निष्फळ सोडुनि पांचहि बाण,
धरि करीं हिला कां घ्याया अमुचे प्राण,
कीं कविभक्तांची कुलदेवी अवतरली,
कीं साधुयशाची धवल कळी ही बनली,
कीं मधुमाधवश्री कलिकारूपें आली,
कीं परिमललक्ष्मी लतिकेवरि या बसली,
कीं उपवनदेवी प्रदोषपूजा करिते,
कीं दावुनि हीतें कुमारिकामद हरिते,
कीं धवलत्वाची परमावधि ही झाली,
कीं सुता लतेची कलिका जन्मा आली,
हीं लतिका हातीं घेउनि दुहिता अपुली,
या वसंतराया कीं अर्पाया आली,
ही आभरणाचें हृदयंगम आभरण,
कीं उपमानाचें अनुपम ही उपमान,
हीं अनुमानाचें श्रेष्ठ असें अनुमान,
मज क्षणांत शिकवी दुर्लभ ब्रह्मज्ञान.
प्रिय कलिके, तुजला हीच प्रार्थना बाई,
तूं फुलूं नको कधिं अशिच निमीलित राहीं,
तव कोमल काया छळितिल मधुकर काळे,
लुटितील क्षणार्धीं यौवनरस वेल्हाळे,
छे लतिका-अंकीं बहुधा तूं फुलशील,
तेथूनि गळुनि मग सुकुनि धुळिस मिळशील.
चल कलिके, तुजला ठेविन मी सुस्थानीं,
कवितारमणीच्या कुंतलांत गुंफोनी !
मग तिथें राहिं तूं आनंदें चिरकाल;
तेथूनि काळही कधिं न तुला हलवील.
चल कलिके बाई, मजसंगें चल आतां,
भूवी सुमनस्नेहाळ कवीची कविता.
गे लते, क्षमा कर निर्दय या हाताला,
तुज पासुनि तोडुनि नेई जो दुहितेला !
दुहिताजन हें धन परक्याचें तुज ठावें,
मनिं करुनि विवेका दिवस लते कंठावे.
माताकर सोडी, तोडी मायाजाळ.
चल कलिके, चल गे झाली सायंकाळ.

# श्रीमती हिराबाई पेडणेकर.

जन्म–इ. स. १८८५.

श्रीमती हिराबाई पेडणेकर यांनीं जयद्रथविडंबन, झुंजारराव, आणि दामिनी हीं संगीत नाटकें रचिलीं आहेत. यांपैकीं पहिलें प्रसिद्ध झालें असून बाकीचीं अमुद्रित आहेत. याशिवाय प्रस्तुत कवयित्रीची थोडीशी स्फुट कविताही आहे.

## १. कवि आणि गुलाबकळी.

### पद.

चाल–हे प्रभो विभो अगाध किति तव करणी—

कविः– किति दशा तुझी गुलाबकलिके ! झाली,
स्थिति दीना कां तुज आली ? ॥ ध्रु० ॥
तूं असतां तव गेहासी, शोभवील उद्यानासी,
सुखविलेंस जन–नयनांसी, ती मोहकता तव गेली ! १
सोडुनी उपवनें खाशीं स्थलीं या कां धावुनि येसी ?
जनपदताडन कां घेसी स्थिति ही कां तुज आवडली? २
तव गंध रूप मृदुताही लोपुनी कशी वद जाई ?
प्रिय होतिस मग कां येई तुज बघुन वीट या कालीं ? ३
कलिकाः– कथुं कसें बांधवा वाचे दुःख जें असे हृदयींचें !
फल हें मन विश्वासाचें मीं स्वकरीं गति ही केली ! ४
मी असतां निज सदनाला नर एक धावुनी आला,
मम रूपा मोहित झाला प्रेमें मज घेई जवळीं. ५
स्पर्श दे दुःख मम त्यासी जरि कंटक रुतति करासी,
तरि धांवे मत्प्राप्तीसी कवनेंही मजवरी केलीं ! ६
तन्मधुर वचन ऐकोनी आलें मी त्याच्या सदनीं,
आदरील तो मज म्हणुनी स्थिति खरि परि सांप्रत कळली. ७
परिमलादि गुण सेवोनी निज हौस तये पुरवोनी
टाकिलें मग अशा स्थानीं कठिणता अतां बघ वरिली ! ८
मम लाभ कठिण जयिं होतां प्राप्तिसी झटत तयिं होता;
परि अतां सुलभ मी असतां धिक्कारी मज या कालीं ! ९
दुष्प्राप्य वस्तु जी वाटे तिजविषयिं लोभ मनिं दाटे,
ती प्राप्त होय तरि आटे उत्कंठा मनिंची सगळी. १०

## २. प्रेमाला उद्देशून.

### पद.

चाल–चंद्रकांत राजाची कन्या–

वा प्रेमा! तव अतर्क्य किति हा गमत असे महिमा!
भुलत असे हें मानस मधुतर परिसुनि तव नामा.
कोण अससि तूं? रूप कसें तव? मुळिं नच जरि ठावें;
मनुजवृंद हा प्राप्तिस्तव तव सतत परी धांवे.
जरी म्हणावें सज्जन तुजला, निंद्य कृतिहि करिसी;
नीच गणावें, श्रेष्ठाहुनि तरि थोरहि तूं दिससी.
ज्ञानवंत मानिलें तरी तूं पात्रता न बघसी;
मूढ ह्मणुं तरी अविचार असा बहु स्थलिं न करिसी.
सदय ह्मणावें ये परि तुजला कींव न शरणाची;
अदय ह्मणावें वृष्टि करिसि तरि प्रियजनिं करुणेची.
निष्कपटी तुज जरी ह्मणावें तरि परमन हरिसी;
कपटी गणिलें तरी परासी सर्वस्वचि देसी.
धिक्कारिसि तूं जो तुज ठेविल हृदयीं आदरुनी;
वांछिसि जो त्या त्यजिसि न जरि तो ताडिल चरणांनीं!
सद्गुण, दुर्गुण जेवीं दिसती समान तव ठायीं;
तेवीं मनुजा सौख्य, दुःख सम तुजयोगें होई.
स्थिर न एक गुण तवांगिं, ह्मणुनि साधु तुला त्यजिती;
अनुभव येइल तव ज्या, त्यांची होइल तीच गती!

---

## ३. उद्यान.

### पद.

चाल—नंदनवनदेवीनें माझा—

नवपल्लवयुत वृक्ष कसे हे गगन धरूं बघती,
नरांस युवती तैशा लतिका तरुंना शोभविती,
समयातें अनुरूप कोकिला गान मधुर करिती;
सुमनांचे रज सेवायातें अलि भ्रमण करिती;
आनंदानें मोर मयूरी रमती एकांतीं,
तुच्छ दिसाति मज राज्यभोगही या सौख्यापुढती. १

जयद्रथविडंबन.

---

### ४. रुष्ट प्रियकरास.

दिंड्या.

प्रेमपत्र न कां आज तुझें आलें ? प्राणनाथा ! मन रुष्ट कां जहालें ?
प्रेम मजवरिचें काय लया गेलें ? ह्मणुनि वर्तन हें आज कठिण केलें ? १
वास असला जरि तुझा हृदयदेशीं, मूर्ति सोडि न जरि पळहि लोचनांसी,
हस्तलिखित प्रतिदिवशिं पाहण्यासी, होय उत्कंठित सदा दीन दासी. २
मूढ ह्मणुनी मीं व्यर्थ कोप केला, खेद त्याचा वरि होतसे मनाला ?
प्रकट करुं तो मीं कोणत्या वचानें ? साक्ष द्यावी तव विमल मानसानें. ३
मृदुल हृदय तव कळुनी पापिणीनें, व्यथित केलें तव वृथा वचनबाणें;
परिचयानें मम सौख्य नच मिळालें, दुःख द्याया मात्र मी सज्ज झालें ! ४
कोप हृदयींचा कसा तुझ्या जाई, सतत चिंता ही वसत मनीं पाही;
परी कांहीं सदुपाय दिसत नाहीं, भ्रंश मतिचा मम आज कसा होई. ५
खेद होउनि मनिं नयनिं अश्रु येती, करुत सदया ! तव तेच कोपशांती;
अधिक शासन जरि दुःखितेसि देसी, जाण अंतरली खचित दीन दासी ६
पदरिं घेतलि जी दीन हीन दासी, मूढ ह्मणुनि त्यजुं नये ज्ञानराशी,
शरण चरणीं तिस अभयदान द्यावें, सदयपण मनिचें पूर्णतेस न्यावें. ७
चित्त शांतविण्या यत्न बहुत केले, परी सकलहि ते पहा व्यर्थ गेले,
मूर्ति नयनांतुनि पळभरी ढळेना, काय होतें हृदयांत तें कळेना. ८
गमति दुर्दिन हे खचित मला पाहीं, पत्र जोंवरि मम करिं न तुझें येई;
विनति गुणवंता ! करितसें पदाला, मधुर वचनांनीं शांतवीं मनाला. ९

---

## बालकवि लक्ष्मीनंदन.

जन्म—इ. स. १८९१.

बालकवि लक्ष्मीनंदन यानें लहान लहान अनेक काव्यें लिहिलीं आहेत. त्यांपैकीं खालचें नमुन्यादाखल येथें दिलें आहे.

### १. गोंडेदार चाबूक.

साक्या.

“नवी, चपळ बैलाची जोडी, छकडा तोहि नवीन,
राजा मी हो पाटलांतला ! मजपुढतीं ते दीन !” १
बोले पाटिल, ज्याला त्याला वैभव दावी अपुलें;
क्षुद्र हृदय तें क्षुद्र आसिनें विनयविवेकां मेलें ! २
परी वैभवीं अजून त्याच्या होती एक उणीव,

मनासारखा चाबुक नव्हता; कवणा येना कींव ! ३
दुप्पट तिप्पट देउन पैसे प्रसन्न करुन सुतार,
दांडी केली रंगित सुंदर, मूठ खुबीची फार ! ४
चांभाराची बहु मनधरणी करून वाद्या दोन,
अशा लाविल्या, कीं जन करितिल नवल तयांस बघोन. ५
गोंडे लावुन वरती केली सौंदर्याची पूर्ती !
हातीं घेउन चाबुक निरखे अभिमानाची मूर्ती ! ६
सर्व विसरला धंदे, उरलें त्यास कशाचें भान,
घरांत वाजे नकारघंटा, परी ऐकतो कोण ? ७
गृहिणी त्याची सुशील त्याचा निषेध मधुवचनांहीं
करी, परी त्या गर्वांधाला दिसे न पुढचें कांहीं. ८
" चुलीजवळ गे ज्ञान तुझें तूं मिरवीं, माझ्यावाटे
जाउं नको, शिकाविणें पतीला पत्नीनें उफराटें ! " ९
वदे असें तो तिला, ती बसे ऐकुन चूप बिचारी,
ठाउक होतें तिला चांगलें कडक किती ती स्वारी ! १०
एक दिवस तो गाडी घेउन निघे पहा नगराला,
येइल घेउन खाऊ ऐशी आशा लघु बाळांला. ११
पेढेबरफी, चेंडूदांडू, चिमणी, टिमकी, बाजा !
नवी बाहुली ! मुलें करीती अशा मनोमय राज्या ! १२
होतें ठाउक आइस त्यांच्या काय घरीं येणार;
" खुशाल येवो स्वारी परतुन, लाभ हा " वदे " फार " १३
" झोडिल हा बैलांना वेडा डौल जगा दावाया,
लागतील ते सैरावैरा भीतीनें उधळाया, १४
पडेल जाउन खाचेमध्यें " अशा कल्पना येती,
त्या अबलेच्या मनीं; प्रीतिच्या मागें सदैव भीती. १५
जवळ न अडका, उगाच धडका गेला तो बाजारा,
वृथाभिमानें पुढचें न दिसे किति मुकले संसारा! १६
पाणिदार बैलांची जोडी, छकडा नवा सुरेख,
रंगित चाबुक कृषीवल म्हणे ज्याला त्याला " देख ! " १७
सर्व नगरभर सर्व दिवसभर दिमाख दावित फिरला,
तसाच उरला परि तो चित्तीं नाहीं लवही जिरला. १८
सायंकालीं निघे घराला जायाला परतोनी,
" जवळ न कांहीं " म्हणे " कशाला व्हावें सोबत कोणी ? " १९
तीन कोस तें नगर राहिलें, गांव दूर दोकोस,
पडे तोंच अंधार, पडे जणुं कज्जलिचा पाऊस ! २०

दमले भारी बैल, परंतु क्रूर तयांना मारी,
उरली मनिची हौस घ्यावया पाही पुरवुन सारी! २१
पशू खरे ते, तथापि दुःसह तयां यातना होती;
मला वाटसें श्वासागणती शाप तया ते देती! २२
मुकें जनावर पोटावारीं दास करोनी घ्यावें,
लीनपणें तें मान्य अशाही दासपणाला व्हावें, २३
केव्हां केव्हां ममत्व त्याच्या मनामधें उपजावें
ह्या अन्याया विसरुन त्यानें धन्यास तुष्ट करावें! २४
स्वार्थपरायण, मदांध मानव कृतघ्न होतीं छळिती!
पशुद्विजांना वृथा दुखविती मौजेसाठीं वधिती! २५
असो नांदिना झोडित झोडित शिव्या देत भलत्याशा,
पाटिलबोवा घरा चालले धरुनी चित्तीं आशा. २६
सांगें पुढतीं चढण उरावर आली, मध्यें नाला,
अशा स्थलीं तें ववती नयनीं चार पांच चोरांला! २७
हाणिति बैलां, परंतु दमले, त्यांत पुढें ती चढण,
पाटलास त्या वाटे आलें जवळ आपुलें मरण! २८
"खडे रहो बे! बताव हमको क्या है तेरे पास!"
ह्मणत तयांनीं एक हाणिली आर्धी काठी त्यास! २९
"म-म-म-म-माझ्या ज-ज-ज-ज-जवळीं क-क-क-क कवडी नाहीं!"
वदे असें तो, भलत्या सलत्या भिऊनि शपथा वाही! ३०
"सांगत नाहीं खरें हा असा," ह्मणून त्या चोरांहीं,
तयाचाच तो चाबुक घेउन मार दिला त्या पाहीं! ३१
रंगित सुंदर तो गोंड्यांचा चाबुक लागे कैसा,
अनायास पाटला समजलें आला अनुभव खासा! ३२
रडे ओरडे धनी आपला पाहुन तें बैलांहीं,
हंबरडा फोडिला, ममत्वा त्यांच्या सीमा नाहीं! ३३
नेसूं धोतर मात्र राहिलें, बाकी सारें गेलें!
रडत कण्हत तें सोंग घराला गाडी घेउन आलें! ३४
गेला चाबुक, त्यासह त्याचा मर्दही अवघा गेला,
देव पावला खरोखरी त्या क्रूराच्या बैलांला ३५
मुलें विचारिति, "काय आणिला, बाबा, आह्मां खाऊ?"
ह्मणे "पोटभर मीच भक्षिला! काय तुह्मांला देऊं?" ३६
जगून आला पती आपला ह्मणून भार्या त्याची,
अनन्यभावें स्तुती करीती झाली परमेशाची! ३७
त्या मारानें पाटिल अमुचा महिनाभर तो निजला,
देह न केवळ परंतु आत्मा मऊ तयाचा झाला! ३८